# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२० / माघ १७ , १९४१ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**११**. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, २०१९ चे चतुर्थ (हिवाळी) सत्र शनिवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी संस्थगित झाले. उपरोक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शिवल्यानुसार लक्षवेधी सुचनांसंदर्भातील जोडपत्रामधील एकूण **७१** स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी **१५** निवेदने मा. सदस्यांना टपालखणाव्दारे वितरित करण्यात आलेली आहेत व **५६** निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी **३७** निवेदने आता प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत. प्रलंबित **१९** निवेदनांबाबत संबंधित मंत्रालयीन विभागांकडे पाठपुरावा करण्यात येत असून सदर निवेदने प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या प्रती वितरीत करण्यात येतील.

**विधान भवन**,
**मुंबई,**
दिनांक : ०६ फेब्रुवारी,२०२०

**राजेन्द्र भागवत**
सचिव (कार्यभार)
महाराष्ट्र विधानसभा.

**प्रती प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०१९ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान)**

**लक्षवेधी सूचना क्र.**

**सर्वश्री मंगेश कुडाळकर, श्रीमती सुलभा खोडके, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री कुणाल पाटील, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री वैभव नाईक, चेतन तुपे, दत्तात्रय भरणे, अशोक पवार, संजय गायकवाड, अजित पवार, बाळासाहेब पाटील, शेखर निकम, यशवंत माने, प्राजक्त तनपूरे, नवाब मलिक, सुनिल शेळके, दौलत दरोडा, रोहित पवार, सुनिल राऊत, ज्ञानराज चौगुले, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत नवघरे, किशोर जोरगेवार, भारत भालके, वि.स.स.**

"तत्कालीन शासनाने कंत्राट देऊन नियुक्त केलेल्या कंपनीने महापरिक्षा पोर्टलमार्फत परिक्षा घेण्यासाठी नियुक्त केलेल्या कंपनीने केलेले गैरप्रकार त्यामुळे सामुहिक कॉपी, अभ्यासक्रमानुसार परिक्षा न होणे, प्रश्नांची पुनरावृत्ती होणे, परिक्षा केंद्रात मोबाईल व इलेक्ट्रोनिक उपकरणाचा सर्रास वापर होणे, परिक्षा केंद्रावर बैठक व्यवस्था निट नसणे, शेवटच्या क्षणी परिक्षा रद्द होणे, हजेरी बायोमेट्रीक पध्दतीने न होणे, डमी उमेदवार पकडल्यानंतर त्याच्यावर पोलीस कारवाई न होणे, इत्यादी अनेक प्रकारामुळे उमेदवारांचे मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान टाळण्यासाठी महापरिक्षा पोर्टल बंद करण्यासाठी राज्यातील जिल्हा- तालुका स्तरावर ७० पेक्षा जास्त आंदोलने होणे, सरकारी नोकऱ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षा 'महापोर्टल' ऐवजी 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत' (एमपीएससी), घेण्यात याव्यात, त्या अनुषंगाने शासनाने महापरिक्षा पोर्टल रद्द करण्याची आवश्यकता याबबात शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

**मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन**

राज्यात शासनाचे सर्व प्रशासकीय विभाग व अधिनस्त कार्यालयांच्या गट क व गट ड पदांसाठीच्या भरती व सेवा प्रवेश परीक्षा सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान) शासन निर्णय क्रमांक.मातंस-०८८/२७/२०१६ ,दि.१९ संप्टेबर, २०१७ अन्वये ऑनलाईन पध्दतीने महापरीक्षा पोर्टलव्दारे घेण्यात येतात.सदर परीक्षांचे आयोजन महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) यांचेकडून करण्यात येते. सदर प्रणाली विकसित करण्यासाठी तांत्रिक आणि आर्थिक मुल्यमापनानंतर यु.एस.टी. ग्लोबल, मुंबई या संस्थेची समितीमार्फत निवड केली गेली व दिनांक १७ जुलै २०१७ रोजी सदर संस्थेला कार्यादेश देण्यात आला होता.

आतापर्यंत घेण्यात आलेल्या परिक्षा सत्रांमध्ये सामूहिक कॉपी संबंधित केवळ एकदाच नगर पालिका प्रशासन संचालनालयाच्या (Directorate of Muncipal Administration) नागपूर या परिक्षा केंद्रावर दिनांक १९ सप्टेंबरला २०१८ झालेल्या परिक्षेबाबत तक्रार प्राप्त झाली आहे. या तक्रारीच्या तपासणीअंती ते सत्र रदद करण्यात आले होते व पुन:परीक्षा घेण्यात आली.

ज्या विभागांच्या परीक्षा घेण्यात येतात, त्या संबंधित विभागाकडून अभ्यासक्रम घेण्यात येवून प्रश्नसंच / प्रश्नपत्रिका तयार केले जातात. विषय तज्ञांमार्फत प्रश्नांची निर्मिती केली जाऊन विषय तज्ञांच्या वेगळया तुकडीकडून प्रश्नांचे पुनर्परिक्षण (Peer review) केले जाते. प्रत्येक परीक्षेसाठी एकापेक्षा अधिक प्रश्न संच तयार केले जातात. सॉफटवेअरमधील सोयीमुळे प्रश्नांची पुनरावत्ती होत नाही.

सर्व परीक्षा केंद्रे ही सीसीटीव्हीने सुसज्ज आहेत. परीक्षेदरम्यानच्या सर्व हालचाली रेकॉर्ड केल्या जातात आणि त्यांचे परीक्षण केले जाते. सीसीटीव्ही देखरेखीखाली आयोजित करण्यात आलेल्या परीक्षा केद्रांमध्ये प्रवेश करण्यापूर्वी उमेदवारांची पूर्ण तपासणी केली जाते. करारानुसार मेटल डिटेक्टर्स सर्व परीक्षा केंद्रांवर संपूर्ण सुरक्षा राखण्यासाठी देण्यात आले आहेत. परीक्षेदरम्यान सर्व परीक्षा केंद्रांवर पोलीस संरक्षण उपलब्ध असते. MAHAIT चे

कर्मचारी प्रत्येक परीक्षा केंद्रावर निरीक्षण व नियंत्रणाकरिता उपस्थित असतात. ज्या विभागाची परीक्षा घेण्यात येत आहे त्या विभागाचे प्रतिनिधी परीक्षा निरीक्षण आणि नियंत्रणासाठी (Controller of Examination) Command Centre वर उपलब्ध असतात. विभागाचे प्रतिनिधी निरीक्षक (Observer) म्हणून सर्व परीक्षा केंद्रावर देखील उपस्थित असतात.

परीक्षा केंद्रे ही सुसज्ज असल्याची खातरजमा करण्यात येते व परीक्षेच्या ३ दिवस आधी सर्व परीक्षा केंद्रावर आवश्यक असणाऱ्या सुविधांची तपासणी करण्यात येते. जर कुठे काही कमतरता असेल तर त्या बाबींची पूर्तता केली जावे. परीक्षा व्यवस्था आणि कंप्यूटरप्रणाली इत्यादी तपासून घेऊन Mock Test घेऊन परिक्षा केंद्रांच्या सज्जतेचा दाखला संबंधीतांकडून प्राप्त केला जातो. असे असतानाही अपरिहार्य तांत्रिक कारणास्तव परिक्षा थांबल्यास त्याच दिवशी उर्वरित वेळ देऊन किंवा सदर सत्र पुन: आयोजित करुन परिक्षार्थिंना पेपर देण्याची संधी देण्यात येते. पुन: आयोजित सत्रांसाठी परिक्षार्थींना प्रवास व महागाई भत्याच्या स्वरुपात रु.५००/- देण्याची व्यवस्था सद्या केली जाते. याच बरोबर कंपनीला दंड ही आकारला जातो. डमी उमेदवाराबाबतच्या चार तक्रारी प्राप्त असून त्याबाबत पोलीस ठाणेमध्ये FIR दाखल करण्यात आलेले आहेत.

महापरिक्षा पोर्टलद्वारे आतापर्यंत २५ विभागांच्या ३२ परिक्षांदवारे ११,०२१ रिक्त पदे भरण्यासाठी घेतलेल्या परिक्षा सत्रात १७,९९,५५३ एवढ्या उमेदवारांनी परीक्षा दिली आहे. महापरीक्षा पोर्टल व त्याद्वारे घेण्यात येणाऱ्या परीक्षांसंदर्भात सुसज्जतेबाबत प्रधान सचिव,माहिती तंत्रज्ञान यांचे स्तरावर आतापर्यंत संबंधीत अधिकाऱ्यांसोबत वेळोवेळी बैठका घेण्यात येऊन परीक्षा पध्दतीत आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत वेळोवेळी निदेश देण्यात आले आहेत. तसेच याबाबत दिनांक २८/११/२०१८ रोजीच्या शासन परिपत्रक क्रमांक मातंसं-००८८/२७/२०१६-DIR IT (MH) अन्वये सूचना (SoP) देण्यात आल्या. तसेच सदयस्थितीत मा.मुख्यमंत्री यांनी महापरीक्षा पोर्टलद्वारे होणाऱ्या भरती प्रक्रीयेला स्थगिती देण्यात आली असून याबाबत प्राप्त सूचना व तक्रारीचे विश्लेषण करुन सिस्टीममध्ये योग्य ते सर्व समावेशक बदल करण्यात येतील. तरी महापरीक्षा पोर्टलद्वारे परीक्षा घेण्याबाबत विदयार्थी उमेदवारांचे मोठया प्रमाणात नुकसान होते अशी वस्तुस्थिती नाही.

-------------------------

सन-२०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन लक्षवेधी सूचना

**सर्वश्री. किसन कथोरे, गणेश नाईक, संजय केळकर, श्रीमती मंदा म्हात्रे, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. गणपत गायकवाड, प्रमोद पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"ठाणे जिल्ह्यातील २७ गावांची स्वतंत्र नगरपालिका व्हावी अशी मागणी असताना या सर्व गावांचा समावेश कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत केलेला असणे, वास्तविक भौगोलिक रचना, क्षेत्रफळ, लोकसंख्या व स्थानिक भूमिपुत्रांची मागणी डावलून सदर गावांचा केलेला समावेश, दि.२६ मे २०१५ रोजी तत्कालीन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कल्याण यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना दिलेल्या अहवालामध्ये २७ पैकी केवळ ४ ग्रामपंचायतींनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट होण्यास होकार दिलेला असणे, तर उर्वरीत २३ ग्रामपंचायतींनी स्वतंत्र नगरपालिका असावी असा दिलेला ठराव, २७ गावांतील नागरिकांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट होण्यास विरोध केल्यानंतर दि.७ सप्टेंबर २०१५ रोजी महाराष्ट्र शासनाने राजपत्र काढून महापालिकेच्या बृहद नागरक्षेत्रातून या गावांना वगळण्याबाबत दिलेला तपशील, तत्कालीन नगरविकास राज्यमंत्री यांनी २७ गावांना कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातून वगळून स्वतंत्र नगरपालिका गठीत करणे संदर्भात मा.कोकण विभागीय आयुक्तांनी हरकती व सूचना घेऊन सविस्तर अहवाल सादर करावा असे दिलेले आदेश, २७ गावांतील ग्रामपंचायतींनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी व संघटनांनी हरकती व सूचना कोकण आयुक्तांना सादर केलेल्या असणे, सदर आदेश देऊन दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटूनही मा.कोकण विभागीय आयुक्तांकडून कोणताही अहवाल शासनास सादर केलेला नसल्याची बाब दि.५ डिसेंबर २०१९ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, वास्तविक कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेली असणे, विशेष म्हणजे हद्द वाढ करताना हद्द वाढ निधी देण्याचे आश्वासन दिले असतानाही, अद्यापही निधी दिलेला नसणे, त्यामुळे या २७ गावांचा समावेश महानगरपालिकेत केल्याने गावांचा थांबलेला विकास, स्वतंत्र नगरपालिका करण्यास शासनाकडून होत असलेल्या विलंबामुळे नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र नाराजी पाहाता, या प्रकरणी तात्काळ दखल घेऊन २७ गावांच्या शास्वत विकासासाठी स्वतंत्र नगरपालिका गठीत करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

शासन अधिसूचना दि.२६.०९.१९८३ अन्वये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत कल्याण नगरपालिका, अंबरनाथ नगरपालिका, डोंबिवली नगरपालिका, कल्याण तहसिल मधील ५६ गावे व उल्हासनगर तहसीलमधील २५ गावे यांचा समावेश करून दि.०१.१०.१९८३ पासून कल्याण-डोंबिवली महानगरपालिका अस्तित्वात आली.

शासन अधिसूचना दि.१२.०७.२००२ अन्वये कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून वगळण्यात आली. सदर गावांचे होणारे नागरीकरण विचारात घेऊन राज्य शासनाने दि.११.०३.२०१५ रोजी उपरोक्त २७ गावे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट करण्याबाबत प्रारुप अधिसूचना प्रसिद्ध केली. सदर अधिसूचनेस अनुसरून प्राप्त हरकती व सूचनांबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना

अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अवालानुसार २७ गावांपैकी २३ गावातील प्रतिनिधींनी व संघर्ष समितीने ही गावे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये समाविष्ट होण्यास विरोध दर्शविला होता तर चार गावातील प्रतिनिधींनी समाविष्ट होण्यास अनुकुलता दर्शविली होती. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांची उपरोक्त २७ गावे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्याची शिफारस विचारात घेऊन शासन अधिसूचना दि.१४.०५.२०१५ अन्वये सदर २७ गावांचा दि.०१.०६.२०१५ पासून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या बृहत नागरी क्षेत्रात पुन्हा समावेश करण्यात आला.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून सदर २७ गावांच्या क्षेत्रामध्ये मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देऊन नियोजनबद्ध विकास करण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत असले तरी, या २७ गावांसाठी स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्याबाबत तेथील सर्वपक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीने शासनाकडे मागणी केली.

या पार्श्वभूमीवर कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातून २७ गावे वगळून या गावांच्या क्षेत्राकरीता स्वतंत्र नगरपरिषद घटीत करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने दि.०७.०९.२०१५ रोजी प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. या प्राथमिक अधिसूचनेच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांस अनुसरून अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना प्राधिकृत करण्यात आले.

या अधिसुचित क्षेत्रातील कल्याण तालुक्यातील १० गावांमधील सुमारे १०८९ हेक्टर क्षेत्रावर ग्रोथ सेंटर उभारण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर ग्रोथ सेंटर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार नगररचना परियोजनेच्या माध्यमातून विकसित करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात आली आहे. त्यानुसार सद्यस्थितीत सदर क्षेत्रासाठी परियोजनेचा मसुदा (Draft Scheme) तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात उपरोक्त २७ गावांचा दि.०१.०६.२०१५ पासून समावेश झाल्यापासून आजपर्यंत हद्दवाढ निधी शासनाकडून महानगरपालिकेस प्राप्त झाला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे उपरोक्त नमूद प्राथमिक अधिसूचनेच्या अनुषंगाने २६ गावाकडून एकूण २५७५४ एवढे हरकती व सूचनांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर हरकती व सूचनांचे अनुषंगाने विभागीय आयुक्त, यांनी दि.१६.१०.२०१५ व दि.१७.१०.२०१५ रोजी सुनावणी लावली होती. तथापि, मा.निवडणूक आयोगाने दि.१३.१०.२०१५ रोजी निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या परवानगीशिवाय सुनावणी घेण्यात येऊ नये, असे विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना निर्देश दिले. सदर प्राथमिक सूचनेच्या अनुषंगाने प्राप्त हरकती व सूचनांवर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे स्तरावर कार्यवाही सुरू आहे. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडून अहवाल प्राप्त झालेनंतर सदर २७ गावांच्या बाबतीत शासन स्तरावरून पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

* * * * * *

निवेदनाचा दिनांक :-

लक्षवेधी सूचना

**श्री.राहूल कुल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र** विधानसभा नियम-१०५ अनुसार **दिलेली लक्षवेधी** सूचना पुढील प्रमाणे आहे :-

**"पाटस (ता.दौंड, जि.पुणे) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची भिंत कोसळून दिनांक ४ डिसेंबर २०१९ वा त्यासुमारास अपघात झाल्याची निदर्शनास आलेली धक्कादायक बाब, सदर शाळा दुरुस्तीसाठी नागरिकांनी वारंवार मागणी करुन देखील प्रशासनाने केलेल्या दुर्लक्षामुळे अपघात घडल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले असणे. याच इमारतीचा काही भाग यापूर्वी ८ ऑगस्ट, २०१९ रोजी देखील कोसळून अपघात झालेला असणे, याच वेळी शाळेच्या मुख्याध्यापकांनी प्रशासनाला लेखी पत्राद्वारे इमारत धोकादायक झाल्याची बाब पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना कळविली असणे, तसेच दौंड तालुक्यातील अंगणवाडी इमारतींची देखील मोठया प्रमाणावर झालेली दुरावस्था, तालुक्यातील अनेक ठिकाणी जिल्हा परिषदेच्या शाळांची व आंगणवाडी इमारतींची दुरावस्था झाली असून त्याची दुरुस्ती करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, उक्त खराब झालेल्या अंगणवाडी इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी जिल्हा नियोजन मंडळाकडून निधी उपलब्ध करुन देण्याचे तत्कालीन मंत्री यांनी आश्वासन दिलेले असूनही अद्यापर्यंत प्राथमिक शाळा व अंगणवाडी दुरुस्तीसाठी शासन स्तरावरुन कोणताही निधी उपलब्ध न झाल्यामुळे तालुक्यातील अनेक वर्गखोल्यांची दुरुस्तीची कामे प्रलंबित असून यामुळे विद्यार्थ्यांना झाडाखाली व इतर खाजगी ठिकाणी शिक्षण घ्यावे लागत असल्यामुळे पालकांमध्ये पसरलेली नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची व उपाययोजना"**

---

मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे निवेदन

जिल्हा परिषद शाळा तामखडा (पाटस) या शाळेच्या एका वर्गखोलीचा बाहेरील काही भाग दिनांक ६.८.२०१८ रोजी पडलेला होता. त्यानुसार मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तामखडा यांनी दिनांक ८.८.२०१८ रोजी गट शिक्षणाधिकारी यांना सदर इमारत दुरुस्त करण्याबाबत लेखी पत्राद्वारे कळविले होते. तेव्हापासूनच जिल्हा परिषद शाळा, तामखडा (पाटस), ता.दौंड, येथील पडलेल्या खोलीचा अध्यापनासाठी वापर करण्यात येत नव्हता व सदर खोलीत विद्यार्थ्यांना बसविण्यात येत नव्हते. तातडीचे बाब म्हणून सदर खोलीच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद निधीतून रुपये ५ लक्ष इतकी तरतूद करण्यात आली होती व त्यास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली होती.

दिनांक ४.१२.२०१९ रोजी वापरात नसलेल्या खोलीचा छताजवळील काही भाग पडलेला आहे. सदर भाग पडलेला असताना कोणत्याही विद्यार्थ्यांना/ शिक्षकांना धोका व जिवितहानी झालेली नाही. तसेच, या शाळेच्या दुरुस्तीचे काम तात्काळ सुरु करण्यात आलेले आहे.

जिल्हा परिषदेने सन २०१८-१९ मध्ये जिल्हा परिषद निधीतून दौंड तालुक्यातील शाळा दुरुस्तीसाठी एकूण २३ शाळांसाठी ७९.११ लक्ष इतकी तरतून करण्यात आलेली असून, शाळा दुरुस्तीला मंजूरी दिलेली आहे. तसेच, दौंड तालुक्यातील २८ शाळांसाठी संरक्षण भिंती बाधण्यासाठी एकूण रुपये १०७.२४ लक्ष इतकी तरतूद करण्यात आली असून, संरक्षण भिंतीला मंजूरी दिलेली आहे. तसेच, दौंड तालुक्यातील जिल्हा नियोजन निधी अंतर्गत शाळा दुरुस्तीसाठी एकूण २२ शाळांना रुपये ६६.३७ लक्ष अतकी तरतूद करण्यात आलेली असून, शाळा दुरुस्तीला मंजूरी देण्यात आलेली आहे. सन २०१९-२० मध्ये जिल्हा नियोजन समितीकडून नवीन २६ वर्ग खोल्यांसाठी रुपये १८२.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यात अंगणवाडीसाठी दोन प्रकल्प आहेत. या दोन प्रकल्पात एकूण ४३३ अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. त्यापैकी २६७ अंगणवाडी केंद्रांना स्वत:च्या इमारती असून, उर्वरित १६६ अंगणवाडी केंद्रे जिल्हा परिषद मालकीच्या समाजमंदिर, प्राथमिक शाळा, ग्रामपंचायती तसेच खाजगी ठिकाणी भरत आहेत. सन २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये दौंड तालुक्यातील अनुक्रमे ३४ व ३० असे एकूण ६४ दुरुस्तीचे प्रस्ताव प्राप्त झाले असून, सदर सर्व कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे. सन २०१९-२० मध्ये आंगणवाडी दुरुस्तीची आवश्यकता नसल्याने मंजूरी देण्यात आलेली नाही. सद्य:स्थितीत सन २०१७-१८ मधील एकूण दुरुस्तीच्या ३४ कामांपैकी २० कामे पूर्ण झालेली असून, उर्वरित १४ कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०१८-१९ मधील एकूण दुरुस्तीच्या ३० कामांपैकी ६ कामे पूर्ण झालेली असून, उर्वरित २४ कामे प्रगतीपथावर आहेत. त्याचप्रमाणे जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेअंतर्गत सन २०१७-१८ ते सन २०१९-२० या कालावधीत आवश्यकता व उपलब्ध निधीनुसार दौंड तालुक्यातील एकूण ४१ नवीन अंगणवाडी इमारत बांधकामे मंजूर केलेली आहेत. सदर सर्व मंजूर कामांना अंदाजपत्रकाप्रमाणे व उपलब्ध निधीच्या प्रमाणात नवीन अंगणवाडी बांधकाम व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत दौंड तालुक्यातील एकही अंगणवाडी झाडाखाली भरत नाही.

***********

**महाराष्ट्र विधानसभा सन २०१९ चे प्रथम (हिवाळी) अधिवेशन**

**श्रीमती यामिनी जाधव, आदित्य ठाकरे, जितेंद्र आव्हाड, मंगेश कुडाळकर, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. तमील सेल्वन, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री संतोष दानवे, प्रकाश फातर्पेकर, किशोर जोरगेवार वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे:-**

**"मुंबई शहरातील कुर्ला परिसरात सहा वर्षाच्या बालीकेवर एका नराधमाने बलात्कार केल्याची घटना माहे डिसेंबर, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, याप्रकरणी कुर्ला येथील विनोबा भावे नगर पोलीसात आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात येणे, कुर्ला पश्चिमेकडील विजय महल चाळीजवळील एका दुकानदाराने चॉकलेट देण्याच्या बहाण्यानं तिथे खेळणा-या सहा वर्षाच्या मुलीला दुकानात बोलावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे उघडकीस येणे, वेदना असह्य होत असल्याने मुलीने हा सर्व प्रकार आईला सांगितल्यानंतर तिला डॉक्टरकडे नेले असता, लैंगिक अत्याचार झाल्याचे निष्पन्न होणे, परिणामी देशातील सर्वाधिक सुरक्षित शहरांपैकी एक अशी ओळख असलेल्या मुंबई शहर ही आता अल्पवयीन मुली मुले व महिलांसाठी असुरक्षित बनू लागल्याचे स्पष्ट होत असणे, महिला व बालकल्याण मंत्रालय अहवालात महिला अत्याचारांच्या बाबतीत महाराष्ट्र दुस-या स्थानावर असल्याची उघडकीस आलेली धक्कादायक बाब, महिलांच्या सुरक्षेसाठी निश्चित करण्यात आलेला निर्भया निधी पाच वर्षात सरकारने खर्च केला नसल्याची उघडकीस आलेली बाब, मुंबईत सन २०१८-१९ या वर्षात बलात्काराच्या घटना २२ टक्के, तर विनयभंगाच्या गुन्ह्यांमध्ये ५१ टक्के वाढ झालेली असणे, विशेषत: या सर्व घटनांमध्ये अल्पवयीन मुलीची संख्या सर्वाधिक असणे, मुंबईसह राज्यात दिवसेंदिवस बलात्काराचे, लैंगिक छळाचे वाढते प्रकार, परिणामी राज्यातील महिला, तरूणी व अल्पवयीन मुलं मुली यांच्या सुरक्षिततेबाबत निर्माण झालेला गंभिर प्रश्न, लहान मुलांचे वेगवेगळ्या प्रकारे होणारे शारीरिक शोषण आणि त्याबाबत दाद मागण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्याची माहिती पालकांना नसणे, या सर्व वाढत्या प्रकारामुळे सर्वसामान्य जनमाणसात पसरलेला असंतोष, शासनाने राज्यातील बलात्कार, लैंगिक अत्याचार याबाबतचे खटले जलदगती न्यायालयात चालवून दोषी नराधमांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, व शासनाची भूमिका"**

.................................................................................................................................

**मा. गृहमंत्री महोदयांचे निवेदन**

फिर्यादी यांनी दि. ०३.१२.२०१९ रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांच्या अल्पवयीन मुलीवर तीन दिवसांपूर्वी दि.०१.१२.२०१९ रोजी घराच्या बाजूच्या गल्लीमध्ये असणा-या किराणा दुकानदाराने चॉकलेट खायला देण्याच्या बहाण्याने दुकानाच्या आत बोलावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याबाबत प्राप्त तक्रारीनुसार विनोबा भावे नगर पोलीस ठाणे, कुर्ला येथे दि. ०४.१२.२०१९ रोजी गु.र.क्र. ३००/२०१९ कलम ३७६, ३७६ (२) (आय) भा.द.वि. सहकलम ४,६,८,१२ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ (पोक्सो ॲक्ट) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दाखल गुन्ह्यातील आरोपीस दि. ०४.१२.२०१९ रोजी अटक करण्यात आली असून, सध्या आरोपी हा न्यायालयीन कोठडीत आहे. सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचा पोलीस तपास सुरू आहे.

सन २०१७ च्या Crime in India अहवालानुसार राज्यातील महिलांवरील अत्याचाराच्या अनुषंगाने भारतीय दंड विधान संहिता व स्थानिक कायद्यांच्या अंतर्गत एकूण दाखल झालेल्या ३१९७९ गुन्ह्यांच्या संख्येनुसार महाराष्ट्र

दुस-या क्रमांकावर आहे. परंतु लोकसंख्येच्या प्रमाणात दाखल गुन्हे विचारात घेतल्यास (क्राईम रेटनुसार) महाराष्ट्र राज्य चौदाव्या क्रमांकावर आहे.

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात माहे जानेवारी ते नोव्हेंबर, २०१८ या कालावधीत बलात्काराचे ८१० गुन्हे तर माहे जानेवारी ते नोव्हेंबर, २०१९ या कालावधीत बलात्काराचे ९१३ गुन्हे दाखल झाले आहेत. तसेच माहे जानेवारी ते नोव्हेंबर, २०१८ या कालावधीत विनयभंगाचे २४०१ गुन्हे तर माहे जानेवारी ते नोव्हेंबर, २०१९ या कालावधीत विनयभंगाचे २३९३ गुन्हे दाखल झाले आहेत. केंद्र शासन निर्भया निधी अंतर्गत मुंबई शहराकरिता महिला सुरक्षा पुढाकार योजना सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या तीन वर्षाकरिता राबविणार असून याकरिता रू. २५२.०० कोटी एवढा निधी उपलब्ध करून देणार आहेत. सदर योजनेमध्ये केंद्र/राज्य हिस्सा ६०:४० या प्रमाणात असणार आहे. सदर योजनेअंतर्गत मुंबई शहरात सध्या अस्तित्वात असलेल्या सीसीटीव्ही चालनाधा उपक्रम वाढविण्यासाठी, शहरातील विविध लोकसंख्येचे प्रतिनिधीत्व करणा-या महिला व किशोर वयीन मुले आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारासह लक्ष गटांचे सामाजिक सर्वेक्षण आणि प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट्स च्या कार्यासाठी व इतर बाबींसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये रू. १६५.६३ कोटी एवढा निधी खर्च होणे अपेक्षित आहे.

<u>मुंबई तसेच राज्यातील महिलांवरील व बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना आहेत-</u>

- महिला व बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी महिला व बाल अपराध प्रतिबंधक कक्षाची स्थापना करण्यात आली असून विशेष पोलीस महानिरीक्षक हे विभागाचे प्रमुख आहेत.
- महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी राज्यात २७ विशेष न्यायालये व २५ जलदगती न्यायालये स्थापन करण्यात आलेली आहेत.
- जिल्हा/आयुक्तालय पातळीवर तसेच पोलीस ठाणे पातळीवर महिला सुरक्षा समित्या व महिला सहाय्य कक्षाची स्थापन करण्यात आलेल्या आहेत.
- छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी पायी पेट्रोलिंग,शाळा कॉलेजच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना,नाकाबंदी, महिला सुरक्षा व छेडछाड पथकाची स्थापना करण्यात आली आहे.
- महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तपासासाठी आणि त्यावर वेळोवेळी आढावा घेण्यासाठी दिनांक १२ ऑक्टोंम्बर २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील प्रत्येक जिल्हा स्तरावर विशेष तपास पथक गठीत करण्याबाबतच्या सुचना देण्यात आल्या आहेत.
- राज्यात,मुंबईसह पुणे शहर, ठाणे शहर, नागपूर शहर, पुणे ग्रामिण, यवतमाळ, अहमदनगर येथे Investigation Units for Crime Against Women (IUCAW) स्थापन केली आहेत.
- मुली व महिलांवर होत असलेल्या अत्याचाराबाबत जागृती होऊन त्यास प्रतिबंध होण्यासाठी त्यांच्या सुरक्षिततेची योग्य ती खबरदारी घेण्याबाबत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी विविध उपक्रम राबविले असून, सर्व वरीष्ठ अधिका-यांना त्याच्या अंमलबजावणी बाबत नियमित सूचना देण्यात आल्या आहेत.
- बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाअंतर्गत सर्व पोलीस ठाणेस एकूण ९४ महिला व बालसुरक्षा गस्त पथके तयार करण्यात आलेली आहेत.
- बृहन्मुंबई मध्ये जास्तीत जास्त ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबत उपाययोजना कार्यान्वित आहेत.
- समस्याग्रस्त महिलांचे समुपदेशन करण्यासाठी पोलीस ठाण्यामध्ये महिला पोलीस कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. मा. धर्माधिकारी समितीच्या शिफारशीनुसार राज्यातील रेल्वेस्टेशन परिसर व एस.टी. स्टॅन्ड ३६४ महिला मदत केंन्द्रे सुरु करण्यात आली आहेत.

- संकटात सापडलेल्या महिलांच्या मदतीकरिता टोल फ्रि हेल्पलाईन क्र. "१०३" मुंबई,ठाणे व नवी मुंबई यांचेकरिता व उर्वरित महाराष्ट्र राज्याकरिता "१०९१" सुरु करण्यात आली आहे. रेल्वे पोलीस घटक, मुंबई व पुणे ९८३३३३११११, नागपुर ०७१२-२७४३९८४ व बृन्हमुंबई पोलीस घटकात २४ तास कार्यरत असणारी हेल्पलाईन सेवा कार्यरत आहे. या शिवाय www.mumbaipolice.org व comcell.mum.crime@mahapolice.gov.in या वेबसाईटवर online तक्रार करता येते.
- Criminal Law Amendment No.२ of २०१८ च्या नुसार बलात्कारांच्या गुन्हयांच्या शिक्षेत केलेली वाढ व तपासाबाबत नवी सुधारणांच्याबाबत सुचना ०९.०७.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.
- राज्यात दि.०१ जुलै, २०१५ ते दि. ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत राबविण्यात आलेल्या ६ ऑपरेशन मुस्कान/स्माईल मोहिमेंअंतर्गत एकूण २३,७९५ हरविलेल्या बालकांचा शोध लावण्यात आलेला आहे.
- बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण अधिनियम, २०१२ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.
- फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम, २०१८ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम, १७३ (१ A) अंतर्गत केलेल्या तरतूदीनुसार बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२/भा.द.वि. कलम ३७६ (AV,DA,DB) अंतर्गत दाखल गुन्ह्यांचा तपास दोन महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावे. तसेच कलम ३०९ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार सदर कलमाअंतर्गत दाखल गुन्ह्यांबाबतचा खटला शक्यतो दोन महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्याबाबत सर्व पोलीस घटक यंत्रणांना सूचना देण्यात आल्या आहेत.

******************************************

लक्षवेधी सुचना

गृह विभाग

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०१९ चे (हिवाळी)अधिवेशन

**श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे.

"मुंबई महापालिकेच्या, दि म्युनिसिपल को.ऑप.बँकेच्या मुलुंड शाखेमधील शिपायाने बनावट खात्याद्वारे, सुमारे ३ कोटी ४९ लाख रूपयाचा आर्थिक घोटाळा केल्याचा दि.११.१२.२०१९ रोजी उघडकीस आलेला प्रकार, सदरहू बँकेत सर्वसाधारण चर्तुथ श्रेणीतील कामगारांची मोठया प्रमाणात खाती असणे, सदरहू आर्थिक घोटाळ्याची रक्कम प्राथमिक चौकशीतून उघड होणे, सखोल चौकशी केल्यास हा आकडा वाढण्याची शक्यता असणे, सदरहू बँकेत काम करणारा शिपाई शाखा व्यवस्थापक आयडीचा वापर करत बँकेतील अनामत रकमेवर येणाऱ्या एकत्रित व्याजाची रक्कम परस्पर बनावट शुन्य ठेवीचे खाते तयार करून, त्यात एनईएफटीद्वारे वळते करीत असणे, सदरहू प्रकार गेले दिड वर्षापासून सुरू असून, यामध्ये शिपायासोबात काही वरिष्ठ अधिकारी आणि काही संचालकांनी संगनमताने केलेला गैरव्यवहार, सदरहू बँकेमध्ये गोरगरीब कामगार कर्मचारी यांचे कष्टाचे पैसे असल्याने,त्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये याकरिता, सदर प्रकरणाची उच्च स्तरावरून सखोल चौकशी करून यातील दोर्षीविरूध्द सक्त कारवाई करण्याकरिता, शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी मुंबई महापालिकेच्या दि. म्युनिसिपल को.ऑप बँकेच्या २२ शाखामध्ये आर्थिक गुंतवणूक केलेल्या चर्तुथ श्रेणी कामगार कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया "

---

## मा.गृह मंत्री यांचे निवेदन

प्रस्तुत प्रकरणी मुलुंड पोलीस पोलीस ठाणे येथे अर्जदार यांनी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १२.१२.२०१९ रोजी सविस्तर जबाब नोंदविण्यात आला आहे. बँकेकडून सदरच्या अपहाराच्या अनुषंगाने अंतर्गत चौकशी सुरु होती. बँकेच्या मुख्यालयातील संगणक तज्ञांनी पडताळणी करुन १० व्यक्तिंच्या नावे १९६ बनावट खाती तयार करुन त्यामध्ये एकूण रु. ३,६१,११,०६० (तिन कोटी एकसष्ट लक्षअकरा हजार साठ) इतक्या रकमेचा अपहार झाल्याचा अहवाल दिल्याने मुलुंड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५०९/२०१९ भा.दं.वि. कलम ४०९, ४२०, ४६५, ४६८, ४७१ व ३४ अन्वये बँकेचा लिपिक व त्याच्या साथीदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी नामे मिलिंद रमेश निकम यास अटक करण्यात आली असून दिनांक २३.१२.२०१९ पर्यंत मा. न्यायालयाने आरोपीताची पोलीस कोठडी रिमांड मंजूर केलेली आहे. सद्यस्थितीत पुढील तपास सुरु आहे.

रोटा/एच ११२ [६५०-१-२०२०]

**************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन
श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-

"जि.ठाणे, शहाड जवळील, सेंच्युरी रेयॉन कंपनीत, नाईट शिफ्ट सुरु असताना, स्पिनिंग प्रोडक्शन डिपार्टमेंटमध्ये, ग्लास पॉटचा स्फोट झाल्याची घटना दिनांक २९.११.२०१९ रोजी घडणे, सदरहू स्फोटात ५ हून अधिक कामगार गंभीररित्या जखमी होणे, सदरहू दुर्घटनेत कामगारांच्या शरिरात काचांचे तुकडे घुसणे, या घटनेमुळे कामगारांच्या सुरक्षिततेबाबत ऐरणीवर येणे, अवघ्या तीन दिवसापूर्वी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ रोजी, सदरहू कंपनीत अंकित सिंग हा कामगार सल्फ्युरिक ॲसिड प्लॅण्टची साफसफाई करत असताना, पाईपलाइनचा नटबोल्ट निघून त्यातुन ॲसिडचा फवारा उडून अंकितसह ४ कामगार होरपळल्याची घटना घडणे, कंपनी व्यवस्थापनातर्फे कामगारांच्या सुरक्षेबाबत कोणतीही उपाय योजना करण्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, यामुळे सदरहू कंपनीत काम करणाऱ्या कामगारांच्या जीवितास निर्माण झालेला गंभीर धोका, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, परिणामी कामगारांमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

मे. ग्रासिम इंडस्ट्रिज लि., (युनिट - सेंच्युरी रेयॉन) ही कंपनी शहाड येथे मुरबाड रोडवर सन १९५६ पासून सुरू असून या कंपनीत ४६३९ कामगार कार्यरत आहेत. या कारखान्यात स्पिनिंग विभागात रेयॉन यार्नचे उत्पादन केले जाते. दि.२९/११/२०१९ रोजी साधारणपणे सायंकाळी ४.३० च्या सुमारास कामगार श्री. लक्ष्मण यादव यांनी कारखान्यातील स्पिनिंग मशिन क्र. ५ वर Reinforced carbon fiber या मटेरिअलने बनलेले रिकामे स्पिनिंग पॉट मशिनवर लावले होते. त्यानंतर कामगाराने मशिन चालू केली त्याचवेळी सदरील स्पिनिंग पॉट हे मशिनच्या स्पिंडलवर व्यवस्थित न बसल्याने ते पॉट फुटुन त्याचे काही तुकडे श्री. लक्ष्मण यादव, श्री विकास मोरे, श्री. आर. एल. शुक्ला व श्री. गोरख जिरामली या चार कामगारांच्या हातांवर व खांद्यावर उडुन किरकोळ जखमा झालेल्या होत्या.

जखमी कामगारांना ताबडतोब याच कारखान्यातील हॉस्पिटलमध्ये प्रथमोपचार देऊन लगेचच घरी सोडण्यात आले. जखमी कामगारांना डॉक्टरांकडुन फिटनेस सर्टिफिकेट मिळाल्यानंतर दुसऱ्या दिवशी दि. ३०/११/२०१९ रोजी कारखान्यात पुर्ववत कामावर रुजु झालेले आहेत. या प्रकरणी केलेल्या चौकशी दरम्यान असे आढळुन आले की, सदर अपघात किरकोळ

स्वरुपाचा असुन जखमी कामगार हे ४८ तासांच्या आत कारखान्यात पुर्ववत कामावर रुजु झाले आहेत. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळणे करिता व्यवस्थापनास सुरक्षिततेबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत.

तसेच दि. २७ नोव्हेंबर, २०१९ रोजीच्या अपघाताची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, कल्याण यांचे मार्फत त्याच दिवशी करण्यात आली असून चौकशीत असे निदर्शनास आले आहे की, दिनांक २७/११/२०१९ रोजी सदर कारखान्यामध्ये सल्फ्युरीक ॲसीड प्लान्टचे दुरुस्तीचे काम चालू होते. सल्फ्युरीक ॲसीड लाईन रिकामी करुन त्यामध्ये सेन्सर बसविण्याचे काम करावयाचे होते. त्याकरीता ऑपरेटर श्री. अंकीत सिंग यांनी लाईनचा व्हॉल उघडला असता अचानक फ्लॅन्ज जॉईंटमधुन सल्फ्युरीक ॲसीड (Corrosive Chemical) बाहेर पडले व तेथे काम करीत असलेल्या श्री. अंकित सिंग, श्री. पंकज सिंग, श्री. केतन जाधव व श्री. अनिल कनसे या चार कामगारांच्या अंगावरती पडुन त्यांना भाजल्याच्या जखमा झाल्या.

सल्फ्युरीक ॲसीड हे रसायन Corrisive स्वरुपाचे असुन ते हाताळतांना कामगारांना वैयक्तिक सुरक्षा साधने दिलेली नव्हती. तसेच ज्या पाईपलाईनमधुन सल्फ्युरीक ॲसीड वाहुन नेले जात होते, त्या पाईपलाईनच्या एका फ्लॅन्जला फ्लॅन्जगार्ड बसविलेले नव्हते. त्यामुळे त्या फ्लॅन्जमधुन सल्फ्युरीक ॲसीड उडुन चार कामगारांच्या अंगावर पडले व भाजल्याच्या जखमा झाल्या. जखमी कामगारांना ताबडतोब प्रथमोपचार देऊन मसिना हॉस्पिटल, भायखळा, मुंबई येथे दाखल करण्यात आले. तेथे दोन कामगारांना उपचारानंतर त्याच दिवशी घरी सोडण्यात आले. उर्वरीत दोन कामगारांवरती मसिना हॉस्पिटल, भायखळा, मुंबई येथे उपचार सुरु आहेत. जखमी कामगारांपैकी दोन कामगार नामे श्री. पंकज सिंग व श्री. केतन जाधव कामावर रुजु झालेले आहेत.

सदर अपघातामध्ये कारखाने अधिनियम, १९४८ च्या नियम ११४ च्या शेड्युल १२ च्या क्लॉज ३ (अे) चा भंग व नियम ११४ च्या शेड्युल १२ च्या क्लॉज ८ (अे) चा भंग आढळुन आला आहे. सदरील भंगाकरीता भोगवटादारास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असुन मा. मुख्य न्याय दंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात दि.१७.१२.२०१९ रोजी खटला दाखल करण्यात आला आहे.

******

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

मा.श्री. मोहन मते, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे :-

"पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'अमृत' योजनेत मलनिस्सारण वाहिनीच्या कामासाठी खोदलेल्या खड्डयात पडून दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी दोघांचा मृत्यू झाल्याची घडलेली दुर्दैवी घटना, सुमारे तीस फुट लांबीचा आणि तेवढयाच खोलीचा खड्डा खणताना सुरक्षिततेसाठी काळजी न घेतल्याने हा दुर्दैवी प्रकार घडलेला असणे, संबंधित यंत्रणा आणि ठेकेदार यांच्या हलगर्जीपणाचे हे बळी असणे, सदरहू ठिकाणी त्यादिवशी सायंकाळी सहाच्या सुमारास नागेश कल्याणी जमादार हा मजूर खड्ड्यात पडल्याने त्याला वाचविण्यासाठी अन्य दोन कामगारही खड्डयात उतरलेले असणे, तसेच अग्निशामक दलानेदेखील मदत सुरु करणे, खड्डा खणून काढलेल्या मातीचा ढिगारा खड्यापासून दुर ठेवण्याचा नियम असतानाही, तो तिथेच ठेवण्यात आला असणे, या मातीच्या ढिगाऱ्यावर बचावकार्य पाहण्यासाठी बघ्यांची गर्दी जमल्याने मातीचा ढिगारा बचावकार्य करणाऱ्यांवर पडून तेही खड्डयांत अडकने, सरतेशेवटी "राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाला" (एनडीआरएफ) पाचारण करून तब्बल नऊ तास हे बचावकार्य सुरु ठेवण्यात येणे, जमादार आणि अग्निशामक दलाचे जवान विशाल जाधव हे दोघे या दुर्घटनेत मृत्युमुखी पडले असणे. तर उर्वरीत पाच जणांना सुखरुप बाहेर काढण्यात येणे, या दुर्घटनेने महापालिका, संबंधित यंत्रणा आणि ठेकेदार यांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असणे, अशा प्रकारची कामे करताना सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे पालन होत नसल्याचे विदारक सत्य समोर येणे, यास्तव या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत आणि अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही , उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया"

### मा.मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत पिंपरी-चिंचवड शहराच्या रु.१४७.८४ कोटी किंमतीच्या मलनिस्सारण प्रकल्पास शासन निर्णय, दिनांक १२.१०.२०१७अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या निविदेप्रक्रियेअंती सदर योजनेचे कार्यादेश मे. पाटील कन्स्ट्रक्शन व इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी देण्यात आले आहेत.

अमृत अभियानांतर्गत मलनिस्सारण योजनेतील कामांतर्गत दापोडी येथील ड्रेनेज लाईनच्या खोदाई दरम्यान दोन व्यक्तींचा मृत्यु दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी झाला आहे, हे खरे आहे.

अमृत अभियानांतर्गत मलनिस्सारण योजनेतील दापोडी येथे ड्रेनेज पाईप टाकण्यासाठी १७ मीटर लांबीची व ६ मीटर खोलीची खोदाई केली होती. सदर ठिकाणी त्यादिवशी खोल खड्डयात कामगार श्री. नागेश कल्याणी जमादार हे काम करीत असताना वरुन माती पडल्याने ते खड्डयात अडकले होते.

श्री. जमादार यांना खड्ड्यातून बाहेर काढण्यासाठी अन्य २ कामगार खोदाईमध्ये उतरले होते. तथापि, खड्डयात चिखल असल्यामुळे व श्री. जमादार हे मातीत अडकल्यामुळे त्यांना श्री जमादार यांना बाहेर काढण्यामध्ये यश आले नाही. यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले व त्यांच्यामार्फत मदतकार्य सुरु करण्यात आले.

अग्निशमन विभागामार्फत मदतकार्य सुरु असताना खड्ड्याच्या भोवती असलेल्या बघ्यांच्या गर्दीमुळे माती खड्ड्यामध्ये कोसळल्यामुळे अग्निशमन विभागातील जवान श्री. विशाल जाधव यांना गंभीर अवस्थेत खड्ड्यातून बाहेर काढून खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तथापि डॉक्टरांनी श्री जाधव यांना मृत घोषित केले. बचाव कार्यामध्ये अग्निशमन दलाबरोबर एनडीआरएफ. व बीईजी (सैन्य दल) यांना पाचारण करण्यात आले. यामध्ये सदर बचाव कार्यात सहभागी झालेल्या व खड्ड्यात अडकलेल्या ५ जणांना वाचविण्यात यश आले. तथापि, ठेकेदाराकडील कामगार श्री. नागेश जमादार यांचा मृत्यु झाला. बचाव यंत्रणामार्फत त्यांचा मृतदेह दिनांक २ डिसेंबर, २०१९ रोजी, पहाटे ३:३० वाजता बाहेर काढण्यात आला.

याप्रकरणी मयत श्री. नागेश जमादार यांचे वडील श्री. कल्याणी जमादार यांनी भोसरी पोलिस स्थानकात दिनांक २ डिसेंबर, २०१९ रोजी गुन्हा दाखल केला असून त्याअनुषंगाने पुढील चौकशीची कार्यवाही त्यांच्या स्तरावर सुरु आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार योजनेच्या ठेकेदाराने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता तसेच महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व जलनिस्सारण खात्याच्या कोणत्याही अभियंत्याला कामाची पूर्वकल्पना न देता रविवार, दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी ड्रेनेज लाईन टाकण्याचे खोदाईचे काम घटनास्थळी चालू केले. अमृत अभियानांतर्गत मलनिस्सारण कामाच्या संबंधित ठेकेदाराने प्रकल्पाच्या कार्यादेशानुसार कामाच्या ठिकाणी आवश्यक असलेल्या पुरेशा सुरक्षा व्यवस्थेची पूर्तता न केल्याने तसेच निविदा अटी व शर्तीचे पालन न केल्याने सदर दुर्घटनेस संबंधित ठेकेदार व प्रकल्प कामावर देखरेख करणारे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार जबाबदार असलेबाबत अहवाल पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सादर केला आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सदर दुर्घटनेची सखल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याकरिता दोन सदस्यीय समितीची स्थापना दिनांक ४ डिसेंबर, २०१९ च्या आदेशान्वये केली आहे. भविष्यामध्ये यास्वरुपाच्या घटना घडू नये यासाठी सदर कामाच्या निविदा अटी व शर्तीनुसार सुरक्षाविषयक उपाययोजना राबविण्यासाठी आवश्यक खबरदारी घेऊन कार्यवाही करणेबाबत विस्तृत स्वरुपाचे निर्देश पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत दिले आहेत. ठेकेदाराबरोबर वेळोवेळी पार पडलेल्या बैठकांमध्ये सुरक्षा विषयक उपाययोजना करणेबाबत पिंपरी-चिंचवड मनपामार्फत सुचित करण्यात आले आहे.

सदर दुर्घटनेमध्ये मृत्युमुखी पडलेले अग्निशमन दलाचे जवान श्री. विशाल जाधव यांना "शहीद" दर्जा देऊन शहीदांना अनुज्ञेय असणारे सवलती व फायदे देणेबाबत ठराव पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीने केला असून त्यानुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महासभेची मान्यता घेण्याची कार्यवाही पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

याव्यतिरिक्त सदर दुर्घटनेमध्ये मृत्यमुखी पडलेल्या ठेकेदाराच्या कामगाराच्या कुटुंबातील एका व्यक्तीस व महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील श्री जाधव यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये नोकरी देणेबाबतची कार्यवाही पिंपरी-चिंचवड मनपा स्तरावरु सुरु आहे. तसेच मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना ठेकेदारामार्फत थर्ड पार्टी इन्शुरन्स ची रक्कम देणेबाबतची कार्यवाही पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

**********

लक्षवेधी सुचना

गृह विभाग

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०१९ चे चतुर्थ (हिवाळी)अधिवेशन

**सर्वश्री. मोहन मते, अमित साटम, प्रशांत ठाकूर, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.अतूल भातखळकर, ॲड.आशिष शेलार, ॲड.पराग अळवणी, कॅप्टन आर.तमिल सेल्वन, श्री.संजय केळकर, ॲड.राहूल नार्वेकर, सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, योगेश सागर, अबू आझमी, रईस शेख, अजित पवार, बाळासाहेब पाटील, शेखर निकम, यशवंत माने, प्राजक्ता तनपूरे, नवाब मलिक, दत्तात्रय भरणे, सुनिल शेळके, दौलत दरोडा, श्रीमती यामिनी जाधव, सर्वश्री. सुनिल प्रभू, भारत भालके वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे.

"मुंबईतील 'कापड बाजार आणि दुकाने मंडळ' या माथाडी कामगारांच्या मंडळाच्या नावाने बनावट लेटर हेड, शिक्के व मंडळाचे अधिकृत अधिकारी यांच्या खोट्या सह्यांची कागदपत्रे, बनावट एफ.डी. आरच्या पावत्या तयार करून साकीनाका, मुंबई येथील इंण्डियन ओव्हरसिज बँकेत २३ महिन्यांच्या कालावधीकरिता ठेवण्यात आलेल्या सुमारे ३ हजार १६१ माथाडी कामगारांच्या पाच कोटी एक लाख ३१ हजार ५०६ इतक्या रकमेच्या कायम ठेवी लंपास करण्यात आल्याची दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ रोजी उघडकीस आलेली घटना, महाराष्ट्र माथाडी हमाल अधिनियम १९६९ च्या कलम ६ अन्वये स्थापम करण्यात आलेल्या सदरहू मंडळावर शासनाचे नियंत्रण असणे या मंडळातील गोरगरीब कामगारांनी केलेल्या कामाची मजुरी व ठेवी मंडळाकडे जमा करून त्यातून मंडळाकडून कामगारांना वेतनवाटप केले जाणे, सदयस्थितीत कापड बाजार आणि दुकाने मंडळाकडे साडेचार हजार मालकांची नोंद असून ३ हजार १६१ कामगार कार्यरत असणे, कामगारांना देण्यात येणाऱ्या मजुरी सोबत मिळणाऱ्या ठेवी, भविष्य निर्वाह निधी, उत्पादन निधी, घरभाडे, प्रवास भत्ता, वैदयकीय सेवा, पगारी रजा, रजेचे वेतन, बोनस इत्यादींचा समावेश असून वेतन देऊन शिल्लक असलेली रक्कम राष्ट्रीयीकृत बँकामध्ये ठेवीच्या स्वरूपात गुंतवणे या मंडळाला बंधनकारक असणे, त्यानुसार दिनांक १९ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास या मंडळाच्या वतीने पाच कोटी रुपये कायम ठेव म्हणून साकीनाका, मुंबई येथील इंडियन ओव्हरसिज बँकेत २३ महिन्यांच्या कालावधीकरिता जमा करण्यात येणे, ही रक्कम कोणालाही हस्तांतरण करण्यात येवू नये, तसेच या कायम ठेवीवर कोणालाही कर्ज देण्यात येवू नये, असे मंडळाच्या वतीने बँकेला कळविण्यात आलेले असणे, तरी देखील विजया बँक भांडुप, येथे या मंडळाच्या नावे तयार केलेल्या बनावट खात्यात कामगारांची कोट्यवधी रुपयांची रक्कम वटवून घेतल्याने हजारो माथाडी कामगार हवालदिल होणे, याबाबत सहायक कामगार आयुक्त यांनी पोलिसांत गुन्हा नोंदविलेल्या असून सदर प्रकरणी पोलीस तपास संथ गतीने सुरु असल्याने आर्थिक विवंचनेत सापडलेल्या हजारो माथाडी कामगारांत पसरलेली नैराश्याची भावना, याबाबत शासनाने सदर प्रकरणाचा तपास स्वतंत्र पथक नेमून तातडीने करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया"

---

## मा.गृह मंत्री यांचे निवेदन

साकीनाका पोलीस ठाणे येथे कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई यांनी अशी तक्रार दिली की यांच्या मंडळाच्या नावाने बनावट कागदपत्रे बनवुन त्याव्दारे इंडियन ओव्हरसिज बँक शाखा, साकीनाका येथुन मंडळाच्या ठेवी मुदत पुर्व रद्द करून त्यां व्दारे पाच कोटी रकमेची फसवणूक केली त्यामुळे मंडळाचे अध्यक्ष यांच्या तक्रारीवरून साकीनाका पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ९४५/१९ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०९, १२० (ब) व ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात इंडियन ओव्हरसिज बँकाचा मॅनेजर व एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे.

रोट./मुद्र. ९०९ (दि.१०-१-२०२०). **************

सन्माननीय विधानसभा सदस्य सर्वश्री. देवेंद्र भुयार, बच्चू कडू, राजकुमार पटेल, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :

"सन २००२ पासून मागील १८ वर्षे वरुड मोर्शी मतदारसंघातील १८० गावांचा ड्राय झोन युक्त परिसर म्हणून घोषणा करण्यात येणे. या गावांतील पाण्याची पातळी ही १२०० ते १५०० फुट खोलवर गेलेली असणे. त्यामुळे संत्रा व इतर पिकांचे ओलीत करून शेतजमीन/बागायती जमीन सिंचनाखाली आणण्यात अडचणी निर्माण होणे. भूगर्भातील उपलब्ध असलेल्या दूषित पाण्यामुळे शेतीला नुकसान होण्याबरोबरच स्थानिक नागरिकांना सुध्दा विविध आजारांचा सामना करावा लागणे. राजस्थान राज्यापेक्षाही भयावह परिस्थिती निर्माण झालेल्या वरुड मोर्शी तालुक्यात ड्राय झोन युक्त परिसर म्हणून घोषित असल्याने तालुक्यात विहीरींची कोणतीही योजना वा अनुदाने उपलब्ध न होणे, तालुक्यात अनेक जलसिंचन प्रकल्प पूर्ण आणि काही अपूर्ण अवस्थेत असले तरी तालुक्यातील सिंचन प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध असतांनाही वरुड मोर्शी तालुका ड्राय झोन म्हणून घोषित करण्यात येणे. यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेती आणि बागायती उत्पन्नात लक्षणीय घसरण होणे, नागरिकांच्या आरोग्याला बाधा निर्माण होत असल्याने राज्यातील संबंधित यंत्रणांकडून झालेल्या भूगर्भजल सर्वेक्षणाबाबत तांत्रिक दृष्ट्या शंका निर्माण होत असल्याने केंद्रीय यंत्रणांकडून पारदर्शीपणे नव्याने सर्वेक्षणाची करण्याची निर्माण झालेली गरज, मात्र त्याअगोदर वरुड-मोर्शी तालुका जि. अमरावती हा ड्रायझोनमुक्त व्हावा म्हणून आवश्यक आणि योग्य तऱ्हेने उपयुक्त अशा भूगर्भजलाची पातळी वाढविण्याकरिता तालुक्यामधील बाधित १८० गावांमध्ये जलसंधारणाची कामे सुरू करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना, व शासनाची प्रतिक्रिया"

### मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन

भूजल मूल्यांकन करण्याकरिता केंद्र शासनाद्वारे कार्यप्रणाली निश्चित करण्यात आली असून ती संपूर्ण देशाला लागू आहे. पाणलोट क्षेत्र निहाय भूजलाची उपलब्धता तपासण्याकरिता भूजल मूल्यांकन करण्यात येते. भूजल मूल्यांकनामध्ये भूजल पुनर्भरणाची व भूजल उपशाची तुलना केली जाते. या तुलनेच्या आधारे पाणलोटाची भूजल विकासाची टक्केवारी (Stage of Development ) काढण्यात येते. ज्या क्षेत्राची विकासाची टक्केवारी १०० टक्के पेक्षा जास्त असते अशा क्षेत्रांला अतिशोषित क्षेत्र संबोधले जाते.

वरुड व मोर्शी तालुक्याचा संपूर्ण भूभाग बेसाल्ट खडकाने व्यापलेला आहे. बेसाल्ट या खडकाची जलधारण क्षमता कमी आहे. वरुड व मोर्शी या भागात सिंचना करिता विहिरी व विंधन विहिरींची संख्या जास्त आहे व या भागात भूजलाचा उपसा हा सुरुवातीपासूनच जास्त

HB-2032(1-4)/PA4*/710 प्रती

राहीलेला आहे. वरुड व मोर्शी या तालुक्यामध्ये सन २००४ पासून केलेल्या भूजल मूल्यांकनानुसार विकासाची स्थिती ९० ते १०० टक्के पेक्षा जास्त असल्याने हे दोन्ही तालुके "अतिशोषित" म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

वरुड व मोर्शी या भागात जास्त पाणी लागणारे संत्र्यांचे उत्पन्न घेण्याकडे सुरुवातीपासूनच कल आहे. या परिसरातील विहिरींची सरासरी खोली २० ते ३० मी. असुन उन्हाळ्यातील पाण्याची पातळी १५ ते २५ मी. खोलवर आहे. सदर परिसरात पुनर्भरणाच्या तुलनेत भूजलाचा उपसा जास्त प्रमाणात होत असल्याने भूजलाची पातळी खोलवर गेली आहे. वरुड व मोर्शी या तालुक्यांमध्ये भूजलाची उपलब्धता अत्यंत मर्यादित स्वरुपात असल्याने संत्रा व इतर पिकांच्या सिंचनाकरिता भूजलाचा वापर करण्यावर मर्यादा आहेत.

भूजल मुल्यांकन २००४, २००८, २०११, २०१३, २०१७ नुसार वरुड व मोर्शी तालुक्यातील भूजल विकासाची स्थिती व वर्गवारी खालील तक्त्यात देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | तालुका | भूजल मुल्यांकनाचे वर्ष | विकासाची टक्केवारी | वर्गवारी |
|---|---|---|---|---|
| १ | मोर्शी | २००४ | ११७.७३ | अतिशोषित |
| | | २००८ | ११७.९१ | अतिशोषित |
| | | २०११ | १००.८६ | अतिशोषित |
| | | २०१३ | ९१.५७ | अंशत: शोषित |
| | | २०१७ | १०३.३९ | अतिशोषित |
| २ | वरुड | २००४ | १४०.२१ | अतिशोषित |
| | | २००८ | १४५.७८ | अतिशोषित |
| | | २०११ | ११०.२५ | अतिशोषित |
| | | २०१३ | १२२.७९ | अतिशोषित |
| | | २०१७ | १६८.७२ | अतिशोषित |

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेद्वारे उपरोक्त प्रमाणे करण्यात आलेल्या सर्व भूजल मुल्यांकनाला केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त झालेली आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत भूजलाची गुणवत्ता तपासण्यात येत असून याकरिता अमरावती जिल्ह्यामध्ये वरुड व मोर्शी या तालुक्यांकरिता मोर्शी येथे उपविभागीय प्रयोगशाळा स्थापित करण्यात आली आहे. दुषित स्त्रोतांमुळे साथीचे आजार उद्भवू नयेत याकरिता जिल्हा परिषद अमरावती स्तरावर उपाययोजना सुरु आहे. वरुड व मोर्शी या तालुक्यांमधील ३५७ पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांमधून शुद्ध पाणी पुरवठा सुरु आहे.

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील कलम ८ अन्वये, अतिशोषित व शोषित वर्गवारी असलेल्या क्षेत्रात सिंचनाकरिता नवीन विहिर / विंधन विहिर / कूपनलिका घेण्यास मनाई आहे. तसेच सर्व क्षेत्रात ६० मीटर पेक्षा अधिक खोल विंधन विहिर / कूपनलिका घेण्यास व त्याद्वारे भूजल उपसा करण्यास मनाईची तरतूद अधिनियमात करण्यात आली आहे. वरुड व मोर्शी हे तालुके भूजल मूल्यांकनानुसार "अतिशोषित" वर्गवारी मध्ये

घोषित करण्यात आले असल्याने या दोन्ही तालुक्यांमध्ये सिंचनाकरिता नविन विहिरी / विंधन विहिरी घेण्यास मनाई आहे. त्यामुळे या तालुक्यांमध्ये विहिरीची योजना व अनुदान उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

जलसंपदा विभागाकडील माहितीनुसार मोर्शी तालुक्यामध्ये ३ पूर्ण झालेले उर्ध्व वर्धा मोठा, दाभेरी व त्रिवेणी लघु प्रकल्प आणि बांधकामाधीन निम्न चारगड लघु प्रकल्प असे एकूण ४ प्रकल्प आहेत. तसेच, वरुड तालुक्यातील पंढरी मध्यम, लोणी धवलगीरी, पाक नदी, चांदस वाठोडा, भिमडी, झटामझरी, नागठाना-२ व पवनी (सं.) हे बांधकामाधीन लघु प्रकल्प आणि शेकदरी, वाई, सातनुरं, जामगाव, बेलसावंगी, नागठाणा, जमालपूर, पुसली, पेंढरी व बहादा (सं.) हे पूर्ण झालेले लघु प्रकल्प आहेत.

मोर्शी तालुक्यातील ३ पूर्ण झालेल्या प्रकल्पांची एकूण प्रकल्पिय सिंचन क्षमता २७९१ हे. इतकी असून प्रकल्पिय उपयुक्त पाणी साठा ५६७.६६ द.ल.घ.मी. इतका आहे. तसेच, निम्न चारगड या बांधकामाधीन प्रकल्पाचा पाणीसाठा १६.४४२ द.ल.घ.मी. व सिंचन क्षमता १६८० हे. असून या प्रकल्पाची घळभरणी जून -२०२१ मध्ये प्रस्तावित आहे.

वरुड तालुक्यामध्ये १० प्रकल्प (शेकदरी, वाई, सातनुर, जामगांव, बेलसावंगी, नागठाणा, जमालपुर, पुसली, पेंढरी व बहादा (सं.) पूर्ण झाले असून, त्यावर २२२.४७ द.ल.घ.मी. पाणी साठा व ३६३३ हे. सिंचन क्षमता निर्मिती पूर्ण झालेली आहे. तसेच ८ प्रकल्प (पंढरी मध्यम, लोणी धवलगिरी, पाक नदी, चांदस वाठोडा, भिमडी, झटामझरी, नागठाणा-२ व पवनी (सं) बांधकामाधीन असून त्यावर जून, २०१९ अखेर ६४.३२ द.ल.घ.मी. पाणी साठा व १७३६ हे सिंचन क्षमता निर्मिती झाली असून मागणीनुसार शेतकऱ्यांना सिंचनाकरीता पाणी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. चांदस वाठोडा व पंढरी प्रकल्पांतर्गत सिंचन क्षमता व पाणीसाठा जून, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. निम्न चारगड ल.पा. ची घळभरणी जून, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे व प्रकल्पिय सिंचन क्षमता डिसेंबर, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. इतर प्रकल्पांची उर्वरित प्रकल्पिय सिंचन क्षमता व पाणी साठा निर्मिती जून, २०२० पूर्ण करण्याचे नियोजित आहे. वर नमूद प्रकल्पांमधून वरुड व मोर्शी तालुक्याध्ये सिंचनाकरिता मागणीनुसार पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

वरुड व मोर्शी तालुक्यातील या सिंचन प्रकल्पातील जलसाठा हे भूपृष्ठीय जल असून त्याचा पाणलोट क्षेत्राच्या वर्गवारीशी संबंध नाही. पाणलोट क्षेत्राची वर्गवारी ही भूजल पातळी व उपलब्ध भूजल साठा यावर आधारित आहे.

भूजलाचे मुल्यांकन हे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत करण्यात येत असून त्याबाबत लागणारी माहिती ही विविध विभागांमार्फत संकलित करण्यात येते. अशी माहिती प्राप्त झाल्यानंतर त्याचा अभ्यास करुन केंद्रीय भूजल मंडळाच्या नियंत्रणाखाली अहवाल तयार करुन याबाबत क्षेत्रनिहाय वर्गवारी घोषित करण्यात येते.

सन २०१७ साली करण्यात आलेल्या भूजल मूल्यांकन अहवालानुसार वरुड व मोर्शी या २ तालुक्यांची भूजल उपलब्धता व वापराची स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुका | वार्षिक भूजल उपलब्धता (हे.मी.) | भूजलाचा वार्षिक उपसा (हे.मी.) | उपशाची टक्केवारी | तालुक्याची वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | वरुड | ९४४१.५२ | १५९२९.६६ | १६८.७१ | अतिशोषित |
| २ | मोर्शी | ९२६२.७३ | ९५७६.३७ | १०३.३८ | अतिशोषित |

वरुड व मोर्शी या तालुक्यांचा वरील भूजल मुल्यांकन अहवाल केंद्रीय भूमिजल मंडळ, भारत सरकार यांना सादर करण्यात आला होता. केंद्र शासनामार्फत या अहवालाची तांत्रिक तपासणी होऊन त्यास दि. २९.०४.२०१९ रोजी मान्यता प्राप्त झाली आहे. भूजलाची मुल्यांकन हे केंद्रीय भूमिजल मंडळाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार होत असल्याने व त्यास केंद्र शासनाची मान्यता घेतली जात असल्याने केंद्रीय यंत्रणेकडून स्वतंत्रपणे मुल्यांकनाची आवश्यकता नाही.

वरुड व मोर्शी या २ तालुक्यातील भूजल पातळीची वरील वस्तुस्थिती विचारात घेता या २ तालुक्यांमध्ये भूजलाचा उपसा हा भूजलाच्या पुनर्भरणापेक्षा अधिक आहे. केंद्रीय भूमिजल मंडळाच्या अभ्यासानुसार वरुड तालुक्यामध्ये १६ द.ल.घ.मी. तर मोर्शी तालुक्यामध्ये १३.८० द.ल.घ.मी. अपधाव (surface runoff) चा वापर करुन भूजलाचे कृत्रिम पुनर्भरण करणे शक्य आहे. याशिवाय वरुड तालुक्यातील १२२.७४ चौ.कि.मी. दुबार पिक क्षेत्रास सिंचनाच्या सुक्ष्म पिक पद्धतींचा वापर केल्यास ४९.०९ द.ल.घ.मी. पाणी वाचविणे शक्य आहे. तर मोर्शी तालुक्यामध्ये ६२.११ चौ.कि.मी. दुबार पिक क्षेत्रास सिंचनाच्या सुक्ष्म पिक पद्धतींचा वापर केल्यास २४.८४ द.ल.घ.मी. पाणी वाचविणे शक्य आहे. वरीलप्रमाणे जल व्यवस्थापन केल्यास वरुड व मोर्शी हे दोन्ही तालुके भूजल विकासाच्या दृष्टीने अतिशोषित मधून सुरक्षित क्षेत्रामध्ये येऊ शकतात. याशिवाय वरुड व मोर्शी या तालुक्यांमध्ये जलयुक्त शिवार योजनेंतर्गत जलसंधारणाच्या विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

***************

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०१९ चे (हिवाळी)अधिवेशन

**श्री. प्रकाश फातर्पेकर, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे.

"चेंबूर (मुंबई) येथील पंचशील नगरमधील एसआरए इमारतीमध्ये सिमेंटचा ब्लॉक अंगावर पडून एका दहा वर्षाच्या मुलीचा दिनांक २०.११.२०१९ रोजीच्या च्या सुमारास जीव जाणे, या घटनेसाठी विकासक आणि सोसायटी जबाबदार असल्याचा आरोप करीत स्थानिक पोलिस स्थानकांत मोर्चा काढून सदोष मुनष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची करण्यात आलेली मागणी, या संदर्भात संबधित विकासकांवर व सोसायटीवर कोणतीच कारवाई केली नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई, प्रतिक्रिया व भूमिका."

---

## मा.गृह मंत्री यांचे निवेदन

सदर घटनेच्या अनुषंगाने दिनांक १८.११.२०१९ रोजी एस.आर.ए. बिल्डिंग सी विंगच्या गेटसमोर, पंचशिलनगर, अमरमहल जंक्शनजवळ, चेंबुर, मुंबई या ठिकाणी अज्ञात इसमाने हयगयीने व बेदकरपणाचे कृत्य करुन कु. प्रतिभा शिंगारे हिची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात आणून सदर बिल्डिंग वरुन सिमेंटचा ब्लॉक खाली टाकून जबर दुखापत केली म्हणून मुलीचे वडील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन टिळकनगर पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमाविरुध्द गु.र.क्र. ४४९/२०१९ भा.दं.वि. कलम ३३८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचे घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून घटनास्थळावरुन ६ इंच लांबी-रुंदीचा एक चौकोणी सिमेंट ब्लॉक ताब्यात घेण्यात आला. त्याची मुद्देमाल नोंद वही नोंद क्र. ३३४/१९ अन्वये नोंद घेण्यात आली आहे.

नमूद गुन्ह्यात जखमी मुलगी हिचा दिनांक १९.११.२०१९ रोजी उपचारादरम्यान के.ई.एम. रुग्णलयात मृत्यू झाल्यामुळे अपमृत्यू नोंद क्र. १६७/१९ फौ. प्र.संहिता कलम १७४ अन्वये नोंद करण्यात आला असून ठाणे दैनंदिनीमध्ये नोंद घेवून गुन्ह्याचे कलम ३०४ (अ) अन्वये वाढ करण्यात आली आहे.

सदर गुन्ह्याच्या तपाससादरम्यान दिनांक २९.११.२०१९ रोजी या गुन्ह्यातील आरोपी मे. अरिहंत रिअल्टर्सचा बिल्डर जतीन अरविंद मेहता यांचा विकासक या नात्याने हलगर्जीपणा दिसून आल्याने त्यांना नमूद गुन्ह्यात अटक करुन त्यांना दिनांक २९.११.२०१९ रोजी मा. महानगर दंडाधिकारी, ७२ वे न्यायालय, विक्रोळी, मुंबई यांचे न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने त्यास कोठडी मंजुर करुन त्यांना जामिनावर मुक्त केले आहे.

सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने, मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपडपट्टी पुर्नवसन विभाग) प्रशासकीय बिल्डिंग बांद्रा पूर्व यांना पत्र पाठवून सदर एस.आर.ए. बिल्डिंग चेंबुर मुंबई यांच्याकडे चौकशी करण्यात येत आहे. तसेच, सदर ठिकाणी असलेल्या विविध सोसायट्यांमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांकडे सदर घटनेबाबत अधिक तपास करण्यात येत आहे.

**************

**<u>गृह विभाग</u>**
**लक्षवेधी सूचना**

**महाराष्ट्र विधानसभा सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन**

श्री. सुनिल प्रभु, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, राधाकृष्ण विखे- पाटील, ॲड. आशिष शेलार, अतुल भातखळकर, श्रीमती देवयानी फरांदे, श्री. संजय केळकर, कॅप्टन आर. तमील सेल्वन, श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे:-

" ता. कळमेश्वर जि. नागपूर येथील पाच वर्षाच्या बालकेची दगड्याने ठेचून हत्या करण्यात आल्याचा दिनांक ८.१२.२०१९ रोजी निदर्शनास आलेला प्रकार, सदरहू घटनेमुळे या परिसरातील जनतेत पसरलेले भितीचे वातावरण, सदरहू बालिका दिनांक ६.११.२०१९ रोजी, आजीकडे गेली असताना परत न आल्याने, नातेवाईकांची शोधाशोध सुरू करूनही न मिळाल्याने, कळमेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात येणे व दुस-या दिवशी घरापासून २ कि.मी. अंतरावरील शेतात बालिकेचा मृतदेह आढळून येणे, बालिकेच्या हत्येपूर्वी बलात्कार झाला असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येणे, सदरहू मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी नागपूर मेडीकल रूग्णालयात पाठविण्यात येणे, देशात व राज्यात महिला व अल्पवयीन मुलीवर होत असलेल्या बलात्काराच्या घटनेत चिंताजनक वाढ होत असल्याने, राज्यातील जनतेत पसरलेले असुरक्षिततेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

..................................................................................................................

**<u>मा. मंत्री (गृह) महोदयांचे निवेदन</u>**

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील लिंगा या गावातील फिर्यादी यांनी दि. ०७.१२.२०१९ रोजी कळमेश्वर पोलीस ठाणे येथे अज्ञात आरोपीने, अज्ञात कारणावरून फुस लावून पिडित मुलीला पळवून नेले, अशा आशयाच्या दिलेल्या फिर्यादीवरून अप. क्र. ८५८/२०१९, कलम ३६३ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करून, पिडित मुलीचा शोध घेण्यात आला. सदर गुन्हा दाखल होताच पिडित मुलीच्या शोधकामी नेमण्यात आलेल्या दोन शोध पथकांनी पिडित मुलीचा रात्रीपर्यंत शोध घेतला. दुस-या दिवशी दि. ०८.१२.२०१९ रोजीच्या सकाळपासून पुन्हा ग्रामस्थांच्या मदतीने पिडितेचा शोध दरम्यान पिडित अल्पवयीन मुलीचे प्रेत मौजा लिंगा येथे येण्या-जाण्याच्या रस्त्याला लागून असलेल्या शेतात मिळाले. प्रेताची स्थिती व साक्षीदारांच्या बयानावरून पिडित अल्पवयीन मुलीचा कोणीतरी दगडाने तिच्या डोक्यावर वार करून खून केल्याचे निष्पन्न झाले. सदर घटनेचे गांभिर्य लक्षात घेऊन मृत बालिकेचे प्रेत शवविच्छेदन करिता शासकीय वैद्यकीय रूग्णालय, नागपूर येथे पाठविण्यात आले.

सदर गुन्ह्यातील आरोपी शोधकामी चार पथके तयार करून शोध घेण्यात आला. आरोपी शोध दरम्यान श्वान पथकाचे श्वानाने सदर ठिकाणी घटनास्थळावरून मिळून आलेल्या दगडाच्या व फावड्याच्या वासावरून माग काढून आरोपी राहत असलेल्या घराच्या दिशेने सुगावा काढल्याने व ज्या ठिकाणी अपहृत मुलीचे प्रेत मिळून आले त्या शेतीमालकाच्या शेतात कामावर असलेल्या इसमावर संशय असल्याने त्याला ताब्यात घेऊन त्याची सखोल चौकशी करण्यात आली. आरोपीने गुन्ह्याची कबूली दिल्याने तसेच पिडित मुलीवर अत्याचार करून तिला

जिवानिशी ठार मारल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने दि.०८.१२.२०१९ रोजी कलम ३०२, ३७६ (AB), ३७६ (२)(i)(j)(m) भा.द.वि. सहकलम ४,६,१० व बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२ सहकलम ३ (1)(w)(i)(ii), ३(२)(v),३(२)(va) अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, १९८९ सुधारित अधिनियम, २०१५ नुसार गुन्ह्यात वाढीव कलमांचा समावेश करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून, सध्या आरोपी हा पोलीस कोठडीत आहे. सध्यस्थितीत सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे.

राज्य गुन्हे अभिलेख केंद्र, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्या महाराष्ट्रातील गुन्हे अहवालानुसार महिलांवरील बलात्काराचे सन २०१५, सन २०१६, सन २०१७, सन २०१८ व सन २०१९ (ऑक्टोबर अखेर) मध्ये अनुक्रमे ४१४४, ४१८९, ४३५६, ४९७३, ४४१५ इतके गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

<u>राज्यातील महिला व बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी खालील प्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना आहेत-</u>

- महिलाा व बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी महिला व बाल अपराध प्रतिबंधक कक्षाची स्थापना करण्यात आली असून विशेष पोलीस महानिरीक्षक हे विभागाचे प्रमुख आहेत.
- महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी राज्यात २७ विशेष न्यायालये व २५ जलदगती न्यायालये स्थापन करण्यात आलेली आहेत.
- बलात्कारासारख्या गंभीर गुन्हयांचा तपास जलद गतीने व्हावा तसेच बलात्कारासारख्या गुन्हयांना आळा बसावा याकरिता सर्व घटक प्रमुखांना मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत.
- छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी पायी पेट्रोलिंग,शाळा कॉलेजच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना,नाकाबंदी, महिला सुरक्षा व छेडछाड पथकाची स्थापना करण्यात आली आहे.
- महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तपासासाठी आणि त्यावर वेळोवेळी आढावा घेण्यासाठी दिनांक १२ ऑक्टोबर २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील प्रत्येक जिल्हा स्तरावर विशेष तपास पथक गठीत करण्याबाबतच्या सुचना देण्यात आल्या आहेत.
- राज्यात,मुंबईसह पुणे शहर, ठाणे शहर, नागपूर शहर, पुणे ग्रामिण, यवतमाळ, अहमदनगर येथे Investigation Units for Crime Against Women (IUCAW) स्थापन केली आहेत.
- संकटात सापडलेल्या महिलांच्या मदतीकरिता टोल फ्रि हेल्पलाईन क्र. "१०३" मुंबई,ठाणे व नवी मुंबई यांचेकरिता व उर्वरित महाराष्ट्र राज्याकरिता "१०९१" सुरु करण्यात आली आहे. रेल्वे पोलीस घटक, मुंबई व पुणे ९८३३३३११११,नागपुर ०७१२-२७४३९८४ व बृन्हमुंबई पोलीस घटकात २४ तास कार्यरत असणारी हेल्पलाईन सेवा कार्यरत आहे. या शिवाय www.mumbaipolice.org व comcell.mum.crime@mahapolice.gov.in या वेबसाईटवर online तक्रार करता येते.
- संकटग्रस्त महिला व मुलींच्या सुरक्षिततेकरिता राज्यातील (अकोला, बीड, उस्मानाबाद, परभणी, नागपूर ग्रामीण, वर्धा, अहमदनगर, रत्नागिरी, ठाणे ग्रामिण, नागपूर शहर, ठाणे शहर, औरंगाबाद शहर, सोलापूर शहर,नवी मुंबई व अमरावती शहर) नमुद घटकांनी मोबाईल ॲप सुरू केले आहे.

- महिलांवरील बलात्कार, विनयभंग, छेडछाड, ॲसिड हल्ला या महिलांवरील अत्याचाराच्या गुन्हयामधील आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा होण्याच्या दृष्टीने प्रचलित कायदयामध्ये सुधारणा करुन शासनाने फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम,२०१३ (२०१३ चा अधिनियम क्र. १३ पारीत केला आहे.)
- Criminal Law Amendment No.२ of २०१८ च्या नुसार बलात्कारांच्या गुन्हयांच्या शिक्षेत केलेली वाढ व तपासाबाबत नवी सुधारणांच्याबाबत सुचना ०९.०७.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.
- हरविलेले व संकटातील बालकांसदर्भात आदर्श कार्यप्रणाली (SOP) पोलीस घटकांना वितरीत केली आहे. www.trackthemissingchild.gov.in या संकेत स्थळावर १०९८ ही टोल फ्री हेल्पलाईन कार्यान्वित करण्यात आली आहे.
- राज्यात दि. ०१.०७.२०१५ ते दि. ३१.१२.२०१८ या कालावधीत राबविण्यात आलेल्या ६ ऑपरेशन मुस्कान/स्माईल मोहिमेअंतर्गत एकूण २३,७९५ हरवलेल्या बालकांचा शोध लावण्यात आलेला आहे.
- केंद्रिय गृह विभाग (महिला सुरक्षा विभाग), केंद्र शासन, नवी दिल्ली यांनी National database on Sexual offenders (NDSO) पोर्टलमध्ये स्त्रियांवरील अत्याचार (Rape, Gang rape, Eve teasing& Stalking and cases registered under section ४ and ६ POCSO ) याची माहिती दिलेली आहे. सदर पोर्टलमुळे लैंगिक अत्याचाराचे गुन्हे सराईतपणे करणारे गुन्हेगार यांची माहिती घेणे सोईस्कर होणार आहे.
- बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण अधिनियम, २०१२ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

*****************************************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

**श्री.मोहन मते, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-**

"ओमकार स्पेशालिटी केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड एम.आय.डी.सी. बदलापुर येथील या रासायनिक कंपनीत स्फोट होऊन लागलेल्या भीषण आगीत कंपनीतील नऊ कामगार जखमी झाल्याची दिनांक २६ नोव्हेंबर, २०१९ रोजी घडलेली घटना, या दुर्घटनेत कंपनी संपुर्णपणे जळून खाक झाली असून यात कंपनीचेही मोठे आर्थिक नुकसान झालेले असणे, कंपनीतील बॉयलरमधील अतिज्वलनशील पदार्थांमुळे ही आग लागल्याची शक्यता असणे, या आगीच्या घटनेनंतर काही वेळाने काळ्या धुराच्या लोटाचे रुपांतर गुलाबी रंगात होऊन बदलापूरमधील मानकीवली, खरवई, ज्युवेली आणि शिरगाव या भागात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरल्याने नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, राज्यातील एम.आय.डी.सी.तील बहुतांश कंपन्या, उद्योगधंदे सुरक्षिततेबाबत दुर्लक्ष करीत असल्याने सातत्याने आगीच्या घटना घडून गोर-गरीब कामगारांचा बळी जात असणे, शिवाय अशा घटनांमुळे आजूबाजूच्या परिसरातील स्थानिक नागरिकांच्या आरोग्यास देखील निर्माण झालेला धोका, राज्यातील एम.आय.डी.सी.तील कंपन्यांच्या सुरक्षा तपासणीबाबत शासकीय यंत्रणेकडून होत असलेली दिरंगाई, यास्तव राज्यातील एम.आय.डी.सी.तील कंपन्यात अशा प्रकारच्या आग लागण्याच्या घटनांची पुनरावृत्ती होवू नये, यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया"

<u>मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन</u>

मे. ओमकार स्पेशालिटी केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. एफ - २४, एम.आय.डी.सी., बदलापुर येथे सन फेब्रुवारी, २००९ पासून कार्यान्वित असून सदर कारखान्यास दि.१२ डिसेंबर, २००९ रोजी परवानगी देण्यात आलेली आहे. या कारखान्यात आयोडीन, ॲसेटीक ॲसीड, अमोनियम पर सल्फेट, ऑर्थो क्लोरो बेन्झोईक ॲसीड, सल्फ्युरीक ॲसीड व ज्वालाग्रही टोल्युन या कच्च्या मालाचा

वापर करुन फार्मा इंटरमिडीएट (२ - क्लोरो ५ - आयोडो बेन्झोईक ॲसीड) या मालाचे उत्पादन केले जाते.

दि. २६/११/२०१९ रोजी दु. १२.१५ वा. च्या दरम्यान कारखान्यातील तळ मजल्यावर असलेल्या सेंन्ट्रिफ्युज परिसरात टोल्युन या रसायनाच्या व्हेपर्स जमा झालेल्या होत्या. याचवेळी काही कामगार सेंन्ट्रिफ्युजमधील मटेरीअल प्लास्टिक स्कुपद्वारे काढत असतांना स्टॅटिक चार्जेस तयार होऊन स्पार्क झाला व त्या परिसरात असलेल्या टोल्युनच्या व्हेपर्समुळे आगीचा भडका उडाला. सदर आगीमध्ये सेंन्ट्रिफ्युज परिसरात काम करणाऱ्या नऊ कामगारांना भाजण्याच्या जखमा झाल्या. जखमी कामगारांना तातडीने धन्वतंरी हॉस्पिटल, बदलापुर येथे प्रथोमपचार देऊन पुढील उपचारासाठी नॅशनल बर्न सेंटर, ऐरोली येथे दाखल करण्यात आले. सदरील आग ही बॉयलर मधील अति ज्वलनशिल पदार्थामुळे लागलेली नसून कारखान्यातील सेंन्ट्रिफ्युज परिसरात स्टॅटिक चार्जेस तयार होऊन त्याठिकाणी असलेल्या टोल्युनच्या व्हेपर्सने आग पकडली.

सदर जखमी कामगारांपैकी ३ कामगारांचा उपचारादरम्यान दवाखान्यात मृत्यु झालेला आहे व उर्वरीत सहा कामगार उपचार घेत आहेत. या घटनेची माहिती मिळताच ॲडिशनल एम.आय.डी.सी. अंबरनाथ, नगर परिषद बदलापुर, सेंच्युरी रेऑन, कल्याण महानगरपालिका येथील अग्नीशामक दलाच्या बंबाच्या सहाय्याने आग विझवण्यात आली. सदर आगीच्या घटनेत कारखान्यातील तळ मजला, पहिला मजला व दुसऱ्या मजल्यावरील कच्चा माल, इंटरमिडीएट, तयार माल, यंत्र सामग्री, इलेक्ट्रिक उपकरणे व इमारतीचे असे एकुण अंदाजे २० कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे कारखाना व्यवस्थापनाने कळविले आहे. सदरहू अपघातामध्ये मृत कामगारांच्या वारसास प्रत्येकी रू.७.५० लक्ष इतकी रक्कम सानुग्रह अनुदान देण्यात आली आहे.

सदर कारखान्यात अयोडीन या कच्च्या मालाचा वापर करण्यात येत असल्याने आगीमध्ये सदर रसायन जळाल्याने गुलाबी रंगाचे धुराचे लोट तयार झालेले होते. बदलापुर मधील मानकीवली, खरवई, ज्युवेली आणी शिरगाव या भागात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका नियर्माण झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तसेच याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

सद्यस्थितीत कारखान्यांचे निरीक्षण संगणकीय केंद्रिय निरीक्षण प्रणालीद्वारे निर्धारीत केल्याप्रमाणे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मार्फत केली जातात. कल्याण विभागामध्ये ३ उप संचालक आणि ३ सहाय्यक संचालकांची पदे मंजुर आहेत. त्यापैकी ३ उप संचालकांची पदे भरलेली असुन ३ सहाय्यक संचालकांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे उपलब्ध असलेल्या उप संचालक यांचे मार्फत अतिधोकादायक कारखान्यांचे निरीक्षण प्राधान्याने पूर्ण करण्यात येते.

महाराष्ट्र कामगार अभ्यास संस्था, मुंबई व नागपुर येथे संचालनालयाच्या पुढाकाराने रासायनिक कारखान्यांमधील सुरक्षिततेबाबत सुपरवायझर्स व ऑपरेटर्स करीता तीन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले जात असुन आज अखेर १४ प्रशिक्षण वर्गाचे माध्यमातुन ८३५ कामगारांना प्रशिक्षित करणेत आले आहे. डिसेंबर २०१९ अखेर १००० रासायनिक कारखान्यांमधील सुपरवायझर्स व ऑपरेटर्स यांना प्रशिक्षण द्यावयाचे उद्दिष्ठ आहे. तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय व परस्पर सहाय्यता गट (MARG) यांच्या सहाय्याने औद्योगिक परिसरातील कामगारांमध्ये सुरक्षिततेची जाणीव वृध्दींगत करण्याकरीता वेळोवेळी प्रशिक्षण वर्ग आयोजीत करण्यात येतात. तसेच अपघात परिस्थितीमध्ये जिवीत व वित्त हाणी टाळणेकरीता कारखान्यामध्ये आपात्कालीन आराखड्याची रंगीत तालीम (Mock Drill) करुन घेतल्या जातात. तसेच धोकादायक व रासायनिक कारखाने यांत मॉक ड्रील मोठ्या प्रमाणावर घेण्यात येत आहेत. माहे नोव्हेंबर अखेर २३३९ मॉक ड्रील्स घेण्यात आलेल्या आहेत.

**********

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

श्री.जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे :-

"भिमा-कोरेगांव, जि.पुणे येथे ऐतिहासिक विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी गेलेल्या समाजबांधवांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात येणे, माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात झालेल्या आंदोलनामध्ये असामाजिक तत्वांनी घुसखोरी करुन परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात जाळपोळ, दंगल घडवून आणणे, सदर दंगलीचा पुणे ग्रामीण पोलिसांनी केलेला तपास संशयास्पद असणे, या दंगलीचा ठपका काही असामाजिक व्यक्तीवर ठेवण्यात येणे व परत सदरचा ठपका बदलून दुसऱ्यावर टाकण्यात येणे, न्यायालयामध्ये चार्जशीट दाखल करताना पी.बी.सावंत यांच्या स्टेटमेंटचा उल्लेख करणे व तो खोटा असणे, याप्रकरणी खोटे गुन्हे दाखल करण्यात येणे, न्यायालयामध्ये अहवाल सादर करताना न्यायालयाकडे सादर केलेल्या अहवालामध्ये ज्या व्यक्तींची नावे दिली, त्याच वेळी चौकशी समितीकडे अहवाल सादर करताना, सदर व्यक्तींची नावे वगळण्यात येणे, सदर प्रकरणी इस्रायल एजन्सीची मदत घेऊन केलेल्या कार्यवाहीचा उलघडा सॅन फ्रॅन्सीस्को न्यायालयामध्ये उघडकीस आल्याचे माहे डिसेबर, २०१९ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, या सर्वच प्रकरणी संबंधीत अधिकाऱ्यांनी संशयास्पद व हेतुपूरस्पर भुमिका घेणे, त्यास वरिष्ठांचे मिळालेले गैरवाजवी संरक्षण, सदर संशयास्पद व गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता आणि शासनाची प्रतिक्रिया "

---

### मा.मंत्री (गृह) महोदय यांचे निवेदन

पुणे जिल्ह्यातील भिमा कोरेगाव येथे ऐतिहासिक विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी गेलेल्या समाजबांधवांवर खोटे, गुन्हे दाखल नाहीत.

जानेवारी,२०१८ च्या पहिल्या आठवड्यात झालेल्या आंदोलनामध्ये असामाजिक तत्वांनी घुसखोरी करुन परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात जाळपोळ, दंगल घडवून आणली, त्यासंदर्भात पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रात विविध कलमान्वये (भादंवि कलम ३०२, ३०७, १४३, १४७, १४८, १४९, ३५३ इत्यादी) एकूण ३० गुन्हे दाखल आहेत. यामध्ये एकूण २६४ आरोपी निष्पन्न झालेले आहेत व त्यापैकी १६७ आरोपिंना अटक करण्यात आली आहे.

तसेच पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे एल्गार परिषदेच्या अनुषंगाने समाजामध्ये तेढ निर्माण करणारे, भडकाऊ व चिथवणीखोर वक्तव्य करुन पत्रके, पुस्तीका व भाषणे यांच माध्यमातून समाजात शत्रुत्व निर्माण केल्याबाबत गुन्हे दाखल आहेत. तपासादरम्यान सदरचे कृत्य हे सी.पी.आय. (माओवादी) या बंदी घातलेल्या संघटनेच्या देश विरोधी कट कारस्थानाचा भाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरच्या गुन्ह्यात भादवि कलम १२१, १२१ (अ), १२४ (अ), १५३ (अ), ५०५ (१) (ब), ११७, १२० (ब), ३४ तसेच बेकायदेशिर कृत्य (प्रतिबंध) अधिनियम १९६७, कलम १३, १६, १७, १८, १८(ब), २०, ३८, ३९ व ४० या कलमांचा समावेश आहे. यामध्ये एकूण २३ आरोपी निष्पन्न झाले असून, त्यापैकी ९ आरोपीना अटक करण्यात आली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत व सर्व आरोपींचे जामीन अर्ज मा.न्यायालयांनी फेटाळलेले आहेत. त्यांचे विरुध्द विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे .

माजी न्यायमुर्ती मा.श्री.पी.बी.सांवत यांचे स्टेटमेंट हे तपासी अधिकारी यांनी त्यांच्या निवासस्थानी जावून नोंदविलेले आहे. न्यायालयामध्ये व चौकशी समितीकडे वेळोवेळी दाखल केलेले अहवाल हे तपासात निष्पन्न झालेल्या बाबींवरुन दाखल करण्यात आलेले आहेत.

सदर प्रकरणी इस्त्रायल एजन्सीची मदत घेऊन केलेल्या कार्यवाहीचा उलगडा सॅन फ्रॅन्सीस्को न्यायालयामध्ये उघडकीस आलेला असणे, त्याचे धागेदोरे महाराष्ट्रात प्रशासनामध्ये असल्याचे डिसेंबर,२०१९ च्या दुसऱ्या आठवड्यात धक्कादायक बाब उघडकीस येणे, ही बाब वस्तुस्थितीस धरुन नाही.

पुणे जिल्ह्यातील कोरेगाव भिमा येथील दंगलीसंदर्भात महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या आयोगासमोर चौकशी चालू आहे. तसेच वरील गुन्ह्यातील अटक आरोपीच्या संदर्भात मा.विशेष न्यायालयात खटला सुरु झाला असून उर्वरित आरोपीविरुध्द पुढील तपास चालू आहे.

--------

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना** **गृह विभाग**

**मा. श्री. भास्कर जाधव, विधानसभा सदस्य यांनी नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मौजे मार्गताम्हाने (ता.चिपळूण जि.रत्नागिरी) येथील सिध्देष संतोष गुरव, वय २१ हा दि. ४ डिसेंबर २०१९ रोजी शिकारीच्या उद्देशाने गेला असता गुहागर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे देवघर गावच्या हद्दीमध्ये गोळी लागून मृत होणे, मृताचे वय हे पाहता तो महाविद्यालयीन दशेतील असणे, तसेच मृत तरूणाच्या कुटुंबियांच्या आर्थिक गरीब परिस्थितीचा फायदा घेवून ही घटना घातपाताची असल्याचा संशय व तशी जाणकार व माहितगारांनी तपासामध्ये माहिती देवूनदेखील तपास अधिकारी, पोलीस निरीक्षक यांनी घातपात नसल्याबाबतचा निष्कर्ष तात्काळ काढून आरोपी व त्यांचे अन्य सहकारी यांना पाठीशी घालून वाचविण्याचा प्रयत्न करणे व याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना कळवूनदेखील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देखील गंभीर दखल न घेणे, यातील अन्य साथीदार हे सकृतदर्शनी संशयित म्हणून तपासामध्ये २० ते २५ वयोगटातील असणे, परंतु प्रत्यक्ष अन्य कायम शिकारीचा छंद असणाऱ्या शिकाऱ्यांना पोलीस तपासामध्ये पोलीस निरीक्षक यांनी अर्थपूर्ण व्यवहारातून बाजूला ठेवली असल्याची परिसरामधील नागरिकांमध्ये सुरू असलेली चर्चा, याकडे पोलीस निरीक्षक यांनी दुर्लक्ष करणे, घटनास्थळाचा सखोल अनुभवी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन न घेता घाईघाईने पंचनामा करणे, पंचनाम्यामध्ये घटनास्थळी घटनेनंतर पुरावे नष्ट होण्याच्या दृष्टीने संशयित आरोपी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांबाबत चौकशीमध्ये मृत तरूणाच्या गावातील म्हणजेच मार्गताम्हाने येथील ग्रामस्थ व जाणकारांनी दिलेली माहिती तपासकामी दुर्लक्षित करून तपासाची दिशा बदलणे, प्रत्यक्ष घटनेमध्ये वापरण्यात आलेली बंदूक ही स्थानिक बोरगाव, ता. चिपळूण येथील दिनानाथ गावणंग व्यक्तीकडून विकत घेवून वापरली असल्याचे तपासामध्ये माहिती देवूनदेखील तपास अंमलदार, पोलीस निरीक्षक यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी याकडे अर्थपूर्ण व्यवहारातून दुर्लक्ष करणे, घटनेत वापरलेली बंदूक ही दिनानाथ गावणंग यांचेकडील असल्याचे समजूनदेखील दिनानाथ गावणंग यांच्यांकडे बंदूक बनविण्याचा अधिकृत परवाना आहे की कसे? याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह तपास अधिकाऱ्यानेदेखील दुर्लक्ष करणे, मृत सिध्देष याच्यासह सोबत संशयित म्हणून पकडण्यात आलेल्या आरोपिंच्या मोबाईलमधील व्हीडीओज, फोटोज याबाबत सखोल चौकशी तात्काळ करून त्यातील फोटोज व व्हीडीओज प्रमाणे अन्य शिकाऱ्यांना तपासामध्ये सहआरोपी करणेकडे दुर्लक्ष करणे व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सहआरोपिंची माहिती मिळूनदेखील पाठिशी घालणे, या घटनेच्या संशयास्पद तपासामुळे पोलिसांविषयी निर्माण झालेली नाराजांची भावना, या गंभीर प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

## मा. मंत्री (गृह) यांचे निवेदन

दिनांक ०४/१२/२०१९ रोजी १९.०० वाजताचे सुमारास देवघर वनराई व शुभम धाब्याचे समोरील जंगलमय भागात बंदुकीची गोळी लागून एक इसम जागीच मयत होऊन पडला असल्याचे निदर्शनास आले. सदर इसम सिध्देश संतोष गुरव, वय वर्षे १९ रा. मार्गताम्हाणे, ता.चिपळुण, जि. रत्नागिरी असे असून तो कमलाबाई वामन पेठे महाविद्यालय, मार्गताम्हाणे, ता.चिपळूण हा असल्याचे तपसात समजले आहे. मयत याचे वडील श्री.संतोष सिताराम गुरव यांनी दिलेल्या खबरीवरुन दिनांक ०५/१२/२०१९ रोजी गुहागर पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यु रजिस्टर नं. ३९/२०१९ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

पोस्टमार्टम झाल्यानंतर मयताचे प्रेत नातेवाईक यांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे. मयताच्या नातेवाईकांकडे चौकशी केली असता त्यांनी कोणावरही संशय घेतला नाही अथवा तक्रार केली नाही.

मार्गताम्हाणे गावातील ग्रामस्थ यांच्याकडे तपास केला असता कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळुन आलेला नाही किंवा घटना घडली याबाबत माहिती देण्यास कोणीही तयार नाही . तथापि, अकस्मात मृत्यूची चौकशी करीत असताना, मढाळ गावचे पोलीस पाटील यांनी दिलेल्या खबरीप्रमाणे गुहागर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ८३/२०१९ भा. दं. वि. स. कलम ३०४, ३४ भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३, २५ प्रमाणे दिनांक ०६/१२/२०१९ रोजी दाखल केलेला आहे. सदर प्रकरणी ३ तरुण सर्व रा. मार्गताम्हाणे, ता. चिपळुण, जि. रत्नागिरी हे दिनांक ०४/१२/२०१९ रोजी सायंकाळी आरोपी क्र. ०१ अग्नेश उर्फ बंटी चव्हाण याचेकडील विनापरवाना बंदुक घेऊन शिकार करीत असताना, यातील आरोपी क्र. १ ते ३ यांच्यापैकी कोणाकडून तरी, त्यांनी नेलेल्या बंदुकीतुन गोळी सुटुन ती सिध्देश गुरव यास लागून तो जागीच मरण पावला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यांमधील तीनही आरोपींना दिनांक ०६/१२/२०१९ रोजी तात्काळ अटक करण्यात आलेली आहे. गुन्ह्यांमध्ये अन्य आरोपींचा सहभाग आहे काय? याबाबत तपास सूरु असून सबळ पुरावा निष्पन्न झाल्यास त्यांना तात्काळ अटक करण्यात येईल.

दिनांक १५/१२/२०१९ रोजी गुहागर पोलीस ठाण्यामध्ये सदर गुन्ह्याचे अनुषंगाने एक निनावी पत्र प्राप्त झाले आहे, सदरच्या निनावी पत्रान्वये बंदुक विक्री करणारा दिनानाथ रावणंग (बोरगाव) असे कळविण्यात आले आहे. सदर पत्राची दखल घेण्यात आली असून त्यावर सखोल तपास सुरु आहे. परंतु, सदर अज्ञात व्यक्तीने निनावी पत्रात कोणतेही पुरावे सादर केलेले नाहीत.

******

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्रमांक ७०**

श्री.शहाजीबापू पाटील, श्री.अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री.अतुल भातखळकर, जितेंद्र आव्हाड, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, ॲड.यशोमती ठाकूर, श्री.कुणाल पाटील, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. अमित झनक, सुभाष थोटे, सुनिल केदार, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. जयकुमार रावल, संजय केळकर, विकास कुंभारे, गोवर्धन शर्मा, कॅप्टन आर.तमिल सेल्वन, सर्व श्रीमती देवयानी फरांदे, मंदा म्हात्रे, सर्वश्री.मोहन मते, अबु आझमी, चेतन तुपे, अशोक पवार, दत्तात्रय भरणे, राजेश एकडे, अब्दुल सत्तार, संजय सावकारे, भिमराव तापकीर, तानाजी मुटकुले, रईस शेख, महेंद्र दळवी, ॲड.राहुल कुल, सर्वश्री. शंभुराज देसाई, अजित पवार, बाळासाहेब पाटील, शेखर निकम, यशवंत माने, प्राजक्त तनपुरे, नबाब मलिक, किसन कथोरे, गणेश नाईक, गणपत गायकवाड, सुनिल प्रभु, उदयसिंग राजपूत, किशोर पाटील, गुलाबराव पाटील, संदीपानराव भुमरे, संजय शिरसाट, ॲड.पराग अळवणी, सर्वश्री.सुनिल शेळके, दौलत दरोडा, नरेंद्र भोंडेकर, बाळासाहेब आजबे, श्रीनिवास वनगा, विनोद अग्रवाल, सुधीर मुनगंटीवार, विजय रहांगडाले, मनोहर चंद्रिकापुरे, सहसराम कोरोटे, प्रताप अडसड, प्रमोद पाटील, आदित्य ठाकरे, बंटी भांगडीया, समीर कुणावार, कृष्ण गजबे, समीर मेघे, संजिवरेड्डी बोदकुरवार, डॉ.देवराम होळी, सर्वश्री.संतोष दानवे, हितेंद्र ठाकूर, क्षितीज हितेंद्र ठाकूर, ज्ञानराज चौगुले, श्रीमती श्वेता महाले, डॉ.संजय कुटे, ॲड.आकाश फुंडकर, सर्वश्री.चिमणराव पाटील, आशुतोष काळे, रोहीत पवार, संग्राम जगताप, निलेश लंके, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री. अलि बाबर, नितिनकुमार देशमुख, देवेंद्र भुयार, बच्चू कडू, राजकुमार पटेल, राणाजगजीतसिंह पाटील, रावसाहेब अंतापूरकर, विश्वजित कदम, भारत भालके, अभिमन्यू पवार, गिरीष महाजन, चंद्रकांत पाटील, चंद्रकांत नवघरे, डॉ. तानाजी सावंत, डॉ. राहूल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये विधानसभा लक्षवेधी सूचना क्रमांक ७० पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील विदर्भ, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्रासह कोकणातील अनेक जिल्ह्यांमध्ये ऑक्टोबर, नोव्हेंबर, २०१९ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे , हाताशी आलेली कांदा, ज्वारी, मका, हायब्रीड, बाजरी, भुईमुग, कापूस, सोयाबीन, भात, ऊस इ. पिकांची नासधूस झालेली असून द्राक्ष, संत्रा, मोसंबी, डाळींब, केळी इ.फळपिकांचेही प्रचंड नुकसान झालेले असणे, यामुळे शेतकरी प्रचंड अडचणीत सापडलेला असल्याने नेहमीच्या दुष्काळ व यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टर शेतीमधील पिकांची वाताहात झाल्याने त्यांच्या समस्यांमध्ये वाढ झालेली असणे , शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले असतानांही त्यांना अत्यंत तुटपुंजी मदत जाहीर केलेली असून सर्वसामान्य शेतकऱ्यांना आवश्यक मदत उपलब्ध करून दिलेली नसणे, शेतकऱ्यांच्या आर्थिक अचडणींमध्ये वाढ होत असल्याने आतापर्यंत अनेक शेतकऱ्यांनी व त्यांच्या कुटूंबातील सदस्यांनी आत्महत्या केलेल्या असून बहुतांश शेतकरी विमनस्क स्थितीत असणे, त्यामुळे त्यांना तातडीने उभारी देण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करावी यासाठी लोकप्रतिनिधी , शेतकरी संघटनांनी मा .मुख्यमंत्री तसेच संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे दि .०२ डिसेंबर, २०१९ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागण्या केलेल्या असणे, सदर मागण्यांवर निर्णय घेण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष , परिणामी आपदग्रस्त शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, विमनस्क स्थितीत असलेल्या शेतकरी व त्यांच्या कुटूबियांकडून आत्महत्येचा मार्ग स्विकारण्याची स्थिती निर्माण झालेली असणे , आपल्या न्याय मागण्यांसाठी दि.१६ डिसेंबर,

२०१९ पासुन नागपूर येथे सुरू होणाऱ्या विधिमंडळ अधिवेशनकाळात तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतलेला असणे, प्रचंड अडचणीत सापडलेल्या सर्वसामान्य शेतकऱ्यांचे प्रश्न तातडीने सोडवुन त्यांना आवश्यक मदत देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

**<u>मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन</u>**

सन २०१९ मध्ये राज्यात परतीच्या पावसास उशीरा म्हणजे दिनांक १६.१०.२०१९ पासून सुरवात झाली. सदर कालावधीदरम्यान महाराष्ट्रात उत्तर पूर्व मान्सूनचे आगमन व अरबी समुद्रामध्ये सुपर सायक्लोन " क्यार" व "महा" वादळ तयार झाले. त्यातील प्रामुख्याने क्यार चक्रिवादळामुळे निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्टयामुळे राज्यात दिनांक १६ ऑक्टोबर २०१९ ते दिनांक ०७ नोव्हेंबर २०१९ दरम्यान मोठ्या प्रमाणावर अवकाळी पाऊस झाल्याचे दिसून आले. साधारण पर्जन्यमानाच्या तुलनेमध्ये माहे ऑक्टोबर २०१९ मध्ये सुमारे २२२.८० टक्के अधिक पाऊस पडल्याचे दिसून आले. सदर आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीबाबत विविध शेतकरी संघटना व लोकप्रतिनिधींद्वारे शासनास निवेदने प्राप्त झालेली आहेत.

सदर आपत्तीमुळे राज्यातील ३४ जिल्ह्यांतील ३४९ तालुक्यांतील १०३.५२ लक्ष शेतकऱ्यांच्या ९४५३१३९ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे (कोरडवाहू पिके- ८२,९९,८९४ हेक्टर , आश्वासित सिंचनाखालील पिके- ९,३४,१४१ हेक्टर, फळ (बहुवार्षिक) पिके - २,१९,१०४ हेक्टर ) ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचे निदर्शनास आले.

चक्रीवादळ ही नैसर्गिक आपत्ती असल्याने बाधितांना द्यावयाच्या मदतीसाठी SDRF/NDRF चे दर व निकष लागू आहेत. त्यानुसार केंद्र शासनाने शेती /फळपिकांच्या नुकसानीसाठी ठरविलेल्या मदतीच्या दरानुसार रु . ७२०७.७९ कोटी इतक्या मदतीच्या रकमेचे ज्ञापन केंद्र शासनास दिनांक २२.११.२०१९ रोजी पाठविण्यात आले आहे.

या आपत्तीमध्ये बाधित झालेल्या शेतकऱ्यांना खालील दराने मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :

- शेतीपिके -- रु. ८०००/- प्रति हेक्टर २ हेक्टरच्या मर्यादेत
- बहुवार्षिक (फळपिके) पिके -- रु. १८०००/- प्रति हेक्टर २ हेक्टरच्या मर्यादेत

तसेच सदर शासन निर्णयान्वये बाधित शेतकऱ्यांना खालील सवलती देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे:

१) जमीन महसुलात सूट,

२) शेतीपिकांच्या नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांना शाळा व महाविद्यालयीन परीक्षा शुल्कात माफी.

दरम्यानच्या काळात केंद्र शासनाकडून मदत येण्याची वाट न पाहता राज्य शासनामार्फत शासन निर्णय दिनांक १८.११.२०१९ अन्वये रू २०५९.३६ कोटी व दिनांक १३.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये रू ४५०० कोटी असा एकूण रू ६५५९.३६ कोटी निधी जिल्हयांना वितरित केला आहे . सदर मदत निधी बाधित शेतकऱ्यांना वितरित करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

***********

**<u>नगर विकास विभाग</u>**

**लक्षवेधी सूचना**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०१९ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री संदिप क्षिरसागर व बाळासाहेब आजबे, विधानसभा सदस्य यांनी सन- २०१९ च्या चतुर्थ (हिवाळी) अधिवेशनात विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"बीड नगर परिषदेतील भ्रष्टाचार, अनियमितता आणि आर्थिक अपहाराच्या शासनाकडे प्राप्त झालेल्या अनेक तक्रारी, शेकडो कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची चौकशी करण्याचे शासनाने दिलेले आदेश, पाच सदस्यीय चौकशी समितीने केलेल्या चौकशी मध्ये गंभीर स्वरुपाच्या अनियमितता, भ्रष्टाचार आणि बेकायदेशीर बाबी उघडकीस येणे, पालिकेच्या दैनंदिन कामकाजात गंभीर त्रुटी असल्याचेही चौकशी अधिकाऱ्यांनी स्पष्ट करणे, पालिकेतील अनियमितता आणि भ्रष्ट कारभारामुळे शहरातील नागरिकांच्या मुलभूत सुविधांवर गंभीर परिणाम झालेला असणे, सन २०१०-११ पासूनच्या लेखा परिक्षण अहवालात गंभीर स्वरुपाच्या अनियमितता उघडकीस येणे, लेखा परिक्षकांना पालिकेतील अधिकारी व इतरांनी कागदपत्रे, प्रमाणके, मोजमाप पुस्तिकांसह इतर संचिका उपलब्ध करुन न देणे, याबाबतचे आक्षेप लेखा परिक्षण अहवालात नमुद करण्यात येणे, माहे ऑक्टोबर २०१९ मध्ये सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, औरंगाबाद यांनी बीड नगर पालिकेचे विशेष लेखा परीक्षण करण्याचे आदेश निर्गमित करणे, या आदेशामध्ये केवळ सन २०१०-११ ते २०१३-१४ पर्यंतच्या कालावधीचा उल्लेख असणे, या प्रकरणी पालिका सदस्यांनी हा कालावधी वाढवून सन २०१९ पर्यंत विशेष लेखा परीक्षण करण्याची मागणी करणे, विशेष लेखा परीक्षणासाठी गठीत पथकामध्ये स्थानिक निधी लेखा परीक्षा बीड यांच्या कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांच्या समावेशनाबाबत तक्रारदारांनी आक्षेप नोंदविलेला असणे, बीड नगर परिषदेत शेकडो कोटी रुपयांच्या झालेल्या आर्थिक अनियमितता व भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची वरीष्ठ अधिकाऱ्याकडून चौकशी होऊन लेखा परीक्षण अहवालातील प्रत्येक मुद्याबाबत विशेष लेखा परीक्षण करण्याची मागणी पालिका सदस्यांनी केलेली असणे, नागरिकांच्या मुलभूत सुविधांच्या निधीमध्ये झालेला अपहार आणि भ्रष्टाचार प्रकरणातील दोषींविरुध्द कारवाई करण्यासाठी विहित मुदतीत विशेष लेखा परीक्षण करण्याची होत असलेली मागणी, या मागणीकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, यामुळे सामान्य नागरिकांमध्ये पसरलेली संतापाची भावना, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

### <u>मा. मंत्री (नगर विकास) महोदय यांचे निवेदन</u>

बीड नगरपरिषदेमधील भ्रष्टाचार, अनियमितता, आर्थिक अपहाराबाबत शासनास वेळोवेळी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांना चौकशी करुन अहवाल शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी अपर जिल्हाधिकारी,

अंबेजोगाई यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या पाच सदस्यीय समितीने दिलेल्या अहवालाच्या आधारे, विभागीय आयुक्त यांनी संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई यांना बीड नगरपरिषदेच्या सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीचे विशेष लेखापरीक्षण करण्याची शिफारस केली होती. त्यास अनुलक्षून शासनाने बीड नगरपरिषदेचे विशेष लेखा परीक्षणाचे आदेश निर्गमित केले.

स्थानिक लेखा परीक्षा संचालनालयाकडून बीड नगरपरिषदेचे सन २०१०-११ ते सन २०१३-१४ या कालावधीचे विशेष लेखापरीक्षण व सन २०१४-१५ चे नियमित लेखापरीक्षण सुरु करण्यात आले होते. परंतु, बीड नगरपरिषदेकडून अभिलेखे उपलब्ध न झाल्याने, सन २०१०-११ ते २०१४-१५ च्या विशेष / नियमित लेखा परीक्षणाकरीता अभिलेखे उपलब्ध करुन देण्याकरीता आवश्यक कार्यवाही करुन त्याबाबत उचित संनियंत्रण करण्याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद व जिल्हाधिकारी, बीड यांना शासनस्तरावरुन निदेश देण्यात आले. बीड नगरपरिषदेचे संस्थगित केलेले विशेष लेखापरीक्षण दि.०५.११.२०१९ पासून सुरु करण्यात आले असून, सदर परीक्षणासाठी लेखापरीक्षण पथकाने मागणी केल्याप्रमाणे मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांच्याकडून लेखे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

पालिका सदस्यांनी सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीच्या विशेष लेखापरीक्षणाची मागणी केली होती. त्याप्रमाणे उर्वरीत एक वर्ष सन २०१४-१५ चे विशेष लेखापरीक्षणाचे आदेश देण्यात आले असून, तसे पालिका सदस्यांना कळविण्यात आले आहे. तसेच विशेष लेखा परीक्षणासाठी गठीत पथकामध्ये सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, औरंगाबाद हे पथक प्रमुख व इतर तीन असे एकूण चार सदस्य आहेत. त्यापैकी दोन सदस्य औरंगाबाद येथील व दोन सदस्य बीड येथील होते. बीड येथील दोन कर्मचाऱ्यांच्या समावेशनाबाबत तक्रारदारांनी आक्षेप नोंदविलेला असल्याने, सदर दोन सदस्यांऐवजी औरंगाबाद येथील सदस्य नेमण्यात आले असल्याबाबत सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा यांनी अहवाल सादर केला आहे.

शहरामध्ये सध्या तीन योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. नागरीकांना सर्व मुलभुत सुविधा पुरविण्यात येत असून, नागरिकांच्या तक्रारींचा वेळोवेळी निपटारा करण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी अहवाल सादर केला आहे.

बीड नगरपरिषदेचे दि.०५.११.२०१९ पासून सुरु करण्यात आलेले विशेष लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर लेखापरीक्षण अहवालातील निष्कर्ष व अभिप्रायांच्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

*****

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

**सर्वश्री.अतुल भातखळकर, सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-**

"विळे-भागाड (ता. अलिबाग, जि. रायगड) येथील एमआयडीसीतील 'क्रिप्टझो' इंजिनियरींग कंपनीत बॉयलरचा डेमो सुरु असताना झालेला भीषण स्फोटामध्ये १८ कामगार आगीत होरपळल्याची दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ रोजी घडलेली घटना, बॉयलरच्या स्फोटामुळे आगीचे डोंब उसळून, सभोवतालचा १५ किलो मीटरचा परिसर हादरून जाणे, जखमी कामगारांना माणगावच्या उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी तातडीने दाखल करण्यात येणे, आगीत होरपळलेल्या १८ कामगारांपैकी, ५ कामगारांची प्रकृती चिंताजनक असणे, सदरहू कंपनी व्यवस्थापनाने कामगारांच्या सुरक्षेबाबत कोणतीही उपाययोजना केली नसल्याची धक्कादायक बाब उघड होणे, सदरहू विळे-भागाड ही मोठी एमआयडीसी असून, त्यात अनेक केमिकल व इंजिनियरींगचे कारखाने असून त्यामध्ये हजारो कामगार काम करीत असणे, कामगारांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याकडे शासनाचा औद्योगिक सुरक्षा विभाग, कामगार आयुक्त आणि कंपनी व्यवस्थापन यांच्या दुर्लक्षामुळे व सुरक्षेच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याने, या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या हजारो काम करणा-या कामगारांच्या जीवितास निर्माण झालेला गंभीर धोका, राज्यातील एमआयडीसीतील कंपन्यांमध्ये गेले काही वर्षात स्फोटाच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याची चिंताजनक बाब निदर्शनास येणे, शासनाने स्फोटाच्या घटनेची सखोल चौकशी करुन दोषी कंपनी मालक व व्यवस्थापक यांचेविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, परिणामी कामगारांमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

**<u>मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन</u>**

विळे-भागाड (ता. माणगांव, जि. रायगड) येथील एमआयडीसी औद्योगिक वसाहतीमध्ये दि क्रिप्टझो इंजिनियरिंग प्रा. लि., हा कारखाना जानेवारी, २०१८ पासून कार्यरत असून सदर कारखान्यामध्ये एकूण ५० कामगार काम करीत आहेत. याकारखान्यात अग्निशमन यंत्रणेचे सुटे भाग तसेच फायर सप्रेसींग सिस्टीमचे उत्पादन केले जाते. फायर सप्रेसिग सिस्टीम मध्ये नायट्रोजन, ऑरगॉन या सारखे निष्क्रिय वायू (Inert Gas) वापरले जातात.

सदर कारखान्यात दिनांक १५/११/२०१९ रोजी फायर सप्रेसिंग सिस्टीम (निष्क्रिय वायू वापरून प्रत्यक्षात जागेवर न जाता कार्यान्वीत करता येणारी अग्नीशमन यंत्रणा) ची चाचणी घेत असताना नायट्रोजन वायू वापरून फायर सप्रेसिंग सिस्टीमची चाचणी घेण्यात येत होती. त्यासाठी ६.५ मी x ५.० मी आकाराची व ३.५ मी उंचीच्या खोलीमध्ये ४ ठिकाणी स्टीलच्या पेल्यांमध्ये प्रत्येकी १० मि. ली हेप्टेन (ज्वालाग्राही रसायन) घेऊन त्यास

सुरक्षितपणे आग लावण्यात आली होती. याखोलीस ४ फुट (रुंदी) व ६ फुट उंचीचा एक लाकडी दरवाजा याशिवाय दुसरे कोणतेही ओपनिंग नव्हते. निरिक्षणासाठी ३० सेमी x ३० सेमी आकाराच्या तीन काचेच्या निरिक्षण खिडक्या होत्या. सुमारे ९० सेकंदापर्यन्त हे सॅम्पल जळाल्यानंतर बाहेरुन सिलेंडरमधील सुमारे १५० बार (वातावरणीय दाबाच्या १५० पट) दाबाखालील नायट्रोजन वायू नोझलद्वारे त्या रुममध्ये सोडण्यातआला. तेव्हा खोलीतील दाब सहन न करु शकल्यामुळे आतील दाबाखालील नायट्रोजन वायू व सॅम्पल ग्लास मधील २०-३० मिलीहेप्टेनआगीसोबतबाहेरआले. खोलीचा दरवाजा हा अशाप्रकारच्या चाचण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमतेचा व दर्जाचा नव्हता. त्यामुळे दरवाजा बाहेरुन धरुन ठेवलेले ४ कामगार व इतर १४ कामगार जे दरवाज्यासमोरील जागेत होते ते सर्व या आगीमुळे भाजले. यापैकी १७ कामगारांना नॅशनल बर्न सेंटर ऐरोली, नवी मुंबई येथे भरती करण्यात आले होते. त्यापैकी तीन कामगारांचा मृत्यू झालेला असून एका कामगारास किरकोळ दुखापत झाल्याने त्याचेवर उपचार करुन लगेचच त्याला घरी सोडण्यात आले. जखमी कामगारांपैकी एकावर उपचार सुरु असून इतर १४ कामगारांना उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.

तीनही मृत कामगारांच्या वारसांना व्यवस्थापनाने कायदेशीर देय नुकसान-भरपाई शिवाय प्रत्येकी २० लाख रुपये देण्याचे मान्य केले आहे. त्यापैकी प्रत्येकी रु. ५ लाख देण्यात आले आहेत. सर्व कामगारांच्या वैद्यकीय उपचारावर व्यवस्थापनाने आता पर्यन्त रु. ७२ लाख एवढा खर्च केला आहे. वैद्यकीय उपचाराच्या काळात नियमीत वेतन देण्यात येणार आहे.

फायर सप्रेसिंग सिस्टीमची चाचणी करण्याची माहिती कारखान्याकडून संचालनालयास देण्यात आलेली नव्हती. संचालनालयासही तपासणी खोली कच्चा माल साठवणीसाठी वापरणार असल्याचे व्यवस्थापनाने कळविले होते.

फायरस प्रेसिंग सिस्टीमची चाचणीही नॅशनल फायरप्रोटेक्शन असोसिएशनच्या (NFPA) च्या २००१ च्या कोड नुसार करावी लागते. या बाबीची पुर्तता होईपर्यंत संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांनी कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ४०(२) अन्वये कारखाना बंद ठेवण्याचे आदेश बजावले आहेत. तसेच, या प्रकरणी उप संचालक,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड यांनी सदर अपघाताची चौकशी केली असून चौकशी मध्ये कारखान्यात सुरक्षित कामाची पद्धत न अवलंबणे, कामगारांना सुरक्षिततेचे प्रशिक्षण न देणे या कारणांसाठी कारखान्याच्या भोगवटादारावर कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ७ए (२) (ए) व ७ए (२) (सी) खाली तसेच महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम ४ खाली न्यायालयात खटले दाखल करण्याकरीता संचालक यांनी मंजुरी दिलेली असून मा.मुख्य न्याय दंडाधिकारी, अलिबाग यांचे न्यायालयात दि.१३.१२.२०१९ रोजी खटले दाखल करण्यात आले आहे.

**सदर अपघाताबाबत या विभागाकडून व इतर संबंधित विभागामार्फत करण्यात आलेली कारवाई-**

- महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने जल (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण) कायदा व हवा (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण कायद्याखाली कारखान्यास बंदीचे आदेश बजावलेआहे.
- पोलिसांनी कारखान्याच्या चारही संचालकांवर भारतीय दंड विधान संहितेखालील कलम ३०४, ३०४ए, २८५, ३३६, ३३७, ३३८ व ३४ खाली गुन्हे नोंदवले आहेत. कारखान्याच्या चार संचालकांना दिनांक ९/१२/२०१९ रोजी अटक करण्यात आली होती. व त्याच दिवशी जामिनावर मुक्तता करण्यात आली.
- विळे-भागाड औद्योगिक वसाहतीत एकुण नऊ कारखानेकारखाने अधिनियमांतर्गत नोंदणीकृत आहेत. त्यामध्ये जवळपास ३५०० कामगार काम करित आहेत. या नऊ कारखान्यांपैकी एक अतिधोकादायक, 3 धोकादायक प्रक्रिया असलेले व ५ इतर कारखाने आहेत.
- कारखान्यातील अपघात टाळण्यासाठी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने राज्यभरातील कारखान्यात सुरक्षिततेचा प्रचार व प्रसार करण्याकरिता तीन दिवसीय केम सेफ्टी ट्रेनिंग सुरु केले आहेत. या वर्षाअखेर (२०१९अखेर) १००० पेक्षा जास्त कामगारांचे प्रशिक्षण पूर्ण होईल.
- तसेच धोकादायक व रासायनिक कारखाने यांत मॉक ड्रील मोठ्या प्रमाणावर घेण्यात येत आहेत. २०१९ अखेर २५०० मॉक ड्रील करुन घेण्यात येत आहे.
- तसेच राज्यभरातील कारखान्यांचे रिस्क बेस निरिक्षणे करण्यात येतात.

---**---

## सन २०१९ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"ता. एटापली (जि.गडचिरोली) येथील हेडरी पोलीस ठाण्याच्या हद्दित येणाऱ्या पुरसलगोंदी येथील दोन गावकऱ्यांची दिनांक १.१२.२०१९ रोजीच्या रात्री नक्षलवाद्यांनी गोळ्या झाडून केलेली हत्या. तसेच नक्षलवाद्यांनी कमलापूर हत्ती कँपमध्येही केलेली तोडफोड, ह्या प्रकारामुळे या परिसरातील दुर्गम भागात पसरलेले भीतीचे वातावरण, मासो डेबला पुंगाटी व ऋषी लालू मेश्राम अशी हत्या झालेल्या शेतकऱ्यांची नावे असणे, मासो हा पूरसलगोंदी या गावचा पाटील असून ऋषी हा कृषीमित्र म्हणून गावात काम करीत असणे, रात्री ७० हून अधिक नक्षलवाद्यांनी गावाला घेराव घालून या दोघांना झोपेतून उठवून, दोघांचेही हात बांधून मारहाण करीतच त्यांना गावाबाहेर नेऊन त्यानंतर गोळ्या झाडून त्यांची हत्या केली असल्याचे निदर्शनास येणे, अनेक नक्षलीनेते आणि त्या दलाचे सदस्य पोलिसांपुढे आत्मसमर्पण करीत असल्याने त्यातून आलेल्या नैराशेतून नक्षलवाद्यांनी हे कृत्य केले असल्याचेही निदर्शनास येणे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये यापूर्वी अनेक वेळा सामान्य नागरीकांवर नक्षलवाद्यांनी हल्ले केले असणे. त्यामुळे नक्षलवाद्यांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी शासनाने करावयाची आवश्यक ती उपाययोजना व शासनाच्या प्रतिक्रिया"

---

## मा. गृहमंत्री यांचे निवेदन

**घटना क्र.-१ :-** गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्याअंतर्गत मौजे पुरसलगोंदी गावातील दोन गावकऱ्यांची ४० ते ५० बंदूकधारी नक्षलवाद्यांनी पुरसलगोंदी ते आलेंगा रस्त्यावर दि. १.१२.२०१९ रोजी रात्री गोळी झाडुन हत्या केली आहे. सदर घटनेबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन एटापल्ली पोलीस ठाणे, येथे गु.र.क्र. ५४/२०१९, कलम ३०२, ३६४, १४३, १४७, १४८, १४९, १२० (ब) भादंवि, ५/२८ भाहका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**घटना क्र.-२ :-** गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यांतर्गत मौजे कमलापूर येथील वन विभागाच्या हत्ती कॅम्पमध्ये ३० ते ४० बंदूकधारी नक्षलवाद्यांनी दि. १.१२.२०१९ रोजी प्रवेश करुन रु. ४४,२७,४६८/- किंमतीच्या शासकिय मालमत्तेचे नुकसान केले. सदर घटनेबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन रेपनपल्ली उपपोलीस ठाणे, येथे गु.र.क्र. ९/२०१९, कलम ३९२, ४२७, १४३, १४७, १४८, १४९, १२० (ब) भादंवि, ७/२७ भाहका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत, उपरोक्त दोन्ही घटना संदर्भातील गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत.

शासनाने दुर्गम भागात राबविलेल्या व राबविण्यात येत असलेल्या योजनांमुळे तसेच जनकल्याण कार्यक्रमामुळे नागरिक शासनाकडे आकर्षित होत असल्याने नक्षलवाद्यांचा जनाधार कमी होत असून नक्षल संघटनांचा प्रभाव कमी झाला आहे. सन २०१९ मध्ये चकमकीत ९ नक्षलवाद्यांना ठार

करण्यात पोलीसांना यश आले आहे. लोकांमध्ये दहशत पसरविण्याच्या हेतूने २ गावकऱ्यांची हत्या व कमलापुर वन विभागाच्या हत्ती कॅम्पची नासधूस केल्याचे निदर्शनास येत आहे. तथापी, जिल्ह्यामधील सामान्य नागरिकांमध्ये शासनाप्रती विश्वासाची भावना, सुरक्षिततेची जाणिव निर्माण करण्यासाठी पोलिसांमार्फत सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे.

शासनाच्या वतीने सन २००५ पासून नक्षलवाद्यांसाठी आत्मसमर्पण व पुनवर्सन योजना राबविण्यात येत आहे. आजमिती पर्यंत ६३३ नक्षल सदस्य चळवळीतून बाहेर पडले असून शासन योजनेप्रमाणे आत्मसमर्पितांना आजपर्यंत रु.८,३२,१५,०२५/- इतकी रक्कम वितरित करण्यात आलेली आहे. त्यांचे पुनवर्सन करण्याच्या दृष्टीने त्यांना रेशनकार्ड, आधारकार्ड, बँक खाते, भूखंड वाटप, घरकुल बांधकामास सहकार्य इ. सोयी सुविधा पुरविण्यात येत आहे. फलस्वरुप नक्षलवाद्यांचा जनाधार कमी होत असून नक्षल हालचाली व घटनांचे प्रमाण कमी होत असल्याने लोकांमध्ये दहशत पसरविण्याच्या उद्देशाने सामान्य नागरिकांवर अनेक वेळा हल्ले केल्याचे निदर्शनास येत आहे.

**नक्षलवाद्यांच्या कारवाया रोखण्यासाठी शासनाने पुढीलप्रमाणे उपाय योजना केलल्या आहेत :-**

१. शासनाने नक्षलवाद्यांचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक ती शस्त्रे व दारुगोळा याबरोबर आधुनिक संपर्क व्यवस्था व वाहन व्यवस्था, भूसुरुंग प्रतिबंधक वाहन व हेलिकॉप्टर उपलब्ध करुन दिले आहेत.

२. जिल्ह्यातील नक्षलवाद्यांच्या कारवायावर अंकुश लावण्यावर जिल्हा पोलीस तसेच केंद्रीय राखीव पोलीस बल यांच्या माध्यमातून नक्षल विरोधी अभियान राबविण्यात येते. तसेच एरिया डॉमिनेशन कार्यवाही करुन नागरीकांना सुरक्षा प्रदान करण्यात येते.

३. जिल्ह्यात नक्षल विरोधी कृती करीता केंदीय राखीव पोलीस बलाच्या बटालीयन, कोब्रा बटालीयन, राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या व जिल्हा पोलीस दल तेसच सी-६० च्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

४. जवानांना युध्द प्रशिक्षण देण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. नक्षल विरोधी शोध अभियान, गस्त, नाईट ॲम्बुश, नाकाबंदी यामुळे नक्षलवाद्यांच्या हालचालीवर प्रतिबंध आणण्यात येत आहे.

५. युवा मेळावा, क्रिडा स्पर्धा, जनजागरण मेळावा, नक्षल विरोधी रॅली यामध्ये नागरीकांचा सहभाग वाढल्याने लोकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. गांवकरी नक्षलगावबंदी ठराव घेत आहेत. या सर्व कारवायामुळे नक्षल चळवळीवर परिणाम होत आहे.

--------------------

**लक्षवेधी सुचना** **गृह विभाग**

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०१९ चे (हिवाळी)अधिवेशन**

**सर्वश्री. अतुल भातखळकर, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, ॲड.यशोमती ठाकूर, श्री. सुनिल केदार, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. रणजीत कांबळे, राजू पारवे, कुणाल पाटील, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री सुभाष धोटे, अमित देशमुख, अबू आजमी, सुधीर मुनगुंटीवार, रविंद्र वायकर,मोहन मते, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे.

"रिझर्व्ह बँकेने पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को-ऑप.बँकेचा (पीएमसी) साडेसहा हजार कोटींचा घोटाळा झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर बँकेवर निर्बंध लादल्यामुळे लाखो ठेवीदार आणि खातेदारांचे पैसे बँकेत अडकून पडले असल्याचे माहे नोव्हेंबर २०१९ मध्ये निदर्शनास येणे, तसेच बँकेने एचडीआएलला ४३५५ कोटींचे कर्ज बेकायदेशीरपणे दिलेले असणे, याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने काहींना अटक केली असून पुढील तपास सुरू असणे, त्यामध्ये पीएमसी बँक राज्य सहकारी बँकेत विलीनीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असणे, त्यामुळे एचडीआयएलची संपत्ती जप्त करण्याबाबत व ती विकून ठेवीदार आणि खातेदारांचे पैसे मिळवून देण्याबाबत तसेच पीएमसी बँकेचे राष्ट्रीयीकृत बँकेत विलीनीकरण करण्याबाबत रिझर्व्ह बँकेकडे पाठपुरावा करण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया"

---

## मा.गृह मंत्री यांचे निवेदन

पी.एम.सी बँकेचा कार्यकारी संचालक जॉय थॉमस सह बँकेचे कार्यरत संचालक मंडळ, व कर्मचारी यांनी जाणीवपूर्वक एच.डी.आय.एल कंपनीचे लोनबाबत बँकेचे ॲडव्हान्स मास्टर इंडेट (ज्यामध्ये लोन अकाउंटची सविस्तर माहिती नोंद असते) ती ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांना न देता जाणीवपूर्वक सदरची माहिती लपवून ठेवली यामध्ये बँकेने एच.डी.आय.एल व ग्रुप ऑफ कंपनीचे जे मोठ्या रकमेचे ४४ लोन अकाउंट होते त्याऐवजी आरोपीने सदरची लोनची रक्कम हि बनावट २१०४९ इतर खात्यांमध्ये थकित असल्याबाबत दाखविली व सदरचे २१०४९ खाती ही कोर बँकिग सोल्युशन मध्ये न दाखविता केवळ ॲडव्हान्स मास्टर इडेंट मध्ये त्यांची नोंद करण्यात येऊन रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनाही ३१ मार्च २०१८ या संपलेल्या आर्थिक वर्षामध्येही इन्स्पेक्शनसाठी हीच खोटी व चुकीची माहिती देण्यात आली, म्हणून व तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून बँकिग २, आर्थिक गुन्हे विभाग येथे गु.र.क्र.८६/२०१९ , भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

रोटर/पुढे ९१० (६५०-१-२०२०)-१ क्र. भा.प.

नमुद गुन्ह्याच्या तपासासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले असून कायदेशीर मदतनीस म्हणून विशेष सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक करण्यात आली आहे.पी.एम.सी बँक व एच.डी.आय.एल कार्यालयाचा मुख्य सर्वर तपास कामी ताब्यात घेण्यात आला असून तो विश्लेषणासाठी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलिना, मुंबई येथे पाठविण्यात आला आहे. पी.एम.सी बँकेने जे २१ हजार बनावट अकाउंटस बनविलेले आहेत त्याबाबतची तसेच एच.डी.आय.एल कंपनीने जे २१ लोन अकाउंटस वर लोन घेतलेले आहे सदर अकाउंटची कागदपत्रे प्राप्त करण्याचे तसेच सदर कागदपत्रे सिध्द करण्यासाठी आवश्यक ते बँक अधिकारी/कर्मचारी यांचे जबाब नोंदविण्याचे व पुरावा प्राप्त करण्याचे काम युध्दपातळीवर करण्यात येत आहे.

एच.डी.आय.एल कंपनीची स्थावर मालमत्ता जी पी.एम.सी बँकेमध्ये गहाण ठेऊन त्यावर कर्ज काढण्यात आलेले आहे.सदरची पालघर, नायगांव, वसई, विरार येथील मालमत्ता तसेच जंगम मालमत्ता त्यामध्ये १४ वाहने व २ प्रवासी सी.आर.पी.सी. १०२ अन्वये जप्त करण्यात आली आहेत. सदर गुन्ह्यातील राकेश वधावन व सारंग वधावन या एच.डी.आय.एल कंपनीचे अनुक्रमे चेअरमन व कार्यकारी संचालक यांचा अलिबाग येथील बंगला तसेच, जॉय थॉमस व त्याची पत्नी यांचे एकत्रीत नावे असलेले प्लॅट व वरियाम सिंग माजी चेअरमन याचे अमृतसर पंजाब येथील हॉटेल तसेच स्थावर मालमत्ता फ्रिज करण्यात आली असून त्याबाबत संबंधित दुय्यम निबंधक कार्यालय यांना व कार्यक्षेत्र असणारे मा.४७ वे न्यायालय,जे.एम.एफ.सी. मुंबई यांना पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे.

सदर गुन्ह्यात १२ आरोपींना अटक करण्यात आली असून पाहिजे असलेल्या २ आरोपींनी मा.उच्च न्यायालय व सत्र न्यायालय येथे अटकपूर्व जामीन केलेला आहे. तसेच इतर २ आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज मा.न्यायालयाने फेटाळलेले आहे. सदर बाबत पुढील तपास सुरू आहे.

**************

## सन २०१९ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्री. अशोकराव चव्हाण, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"महाराष्ट्र व पंजाब पोलिसांना चकवून मागील पाच वर्षापासून फरार असलेला हरजिंदरसिंग उर्फ रिंदा याने नांदेड जिल्ह्यात गुन्हेगारी क्षेत्रात सामान्य माणसांच्या जीवनात हैदोस घातला असणे, रिंदा व त्यांच्या साथीदारांनी जिवे मारणे, जिवे मारण्याची धमकी देणे, खंडणी वसूल करणे, दहशत निर्माण करणे, असे प्रकार मोठ्या प्रमाणात केले आहेत. तर नांदेडमध्ये या टोळीविरुध्द १७ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून मुळात रोशनसिंग माळी व अजितसिंग माळी यांच्या कुटूंबियासोबत रिंदा याचा जमिनीचा वाद होता. चार वर्षापूर्वी रिंदा याने माळी कुटूंबातील एक सदस्य बचिंदरसिंग माळी यांचा शाळेतून मुलांना घरी घेऊन फरार असलेल्या रिंदाच्या साथीदारांनी माळी कुटुंबियांचा खबऱ्या असल्याच्या संशयावरुन पोलिसांच्या एटीएस शाखेत कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी चावला यांचा भाचा रामसिंग यांचा गुरुद्वारा परिसरातील यात्री निवासामध्ये एका लग्नसोहळयात गोळया घालून केलेला खून, सतत फरार असल्यामुळे आर्थिक विवंचनेत सापडलेल्या रिंदा याने शहरातील व्यापारी, डॉक्टर्स, व्यावसायिक व खाजगी कोचिंग क्लासेसचे संचालक यांना खंडणी मागण्यास सुरुवात केली. आपली दहशत कायम रहावी, यासाठी गावठी पिस्तुलांचा रिंदाच्या गुंडाकरवी सर्रास वापर केला जातो. शहरातील प्रतिष्ठित नागरिक गोविंद कोकूलवार यांच्यावर काही दिवसापूर्वी गोळया झाडून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न रिंदा यांच्या गुंडाकडून झाला आहे. त्यासोबतच डॉ.मनिष कत्रूवार व बांधकाम व्यावसायिक संजय बियाणी यांना धमकी देऊन खंडणी मागितल्यासंदर्भात पोलिसांकडे गुन्हा दाखल असणे, रिंदा यांचे साथीदार आकाशसिंग गाडीवाले याला पंजाब पोलिसांनी अटक करणे. रिंदा याचा साथीदार शेरा यांने नांदेड शहरातील मेट्रो शूज या दुकानाच्या व्यवस्थापकास धमकी देऊन दुकानातील नगदी ऐवज पळविणे. महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा मोक्काअंतर्गत रिदांच्या काही साथीदारांना तुरुंगात डांबण्यात आले आहे. परंतु, रिंदा मात्र अद्यापही फरार असणे. रिंदा यांची शहरात दहशत कायम असून, जिवे मारण्याची धमकी देणे, प्रतिष्ठांना खंडणी मागणे, हे प्रकार मोठया प्रमाणात वाढले आहेत. केवळ १० ते १५ हजार रुपयांत गावठी पिस्तूल विकत घेऊन त्यामाध्यमातून धनिकांना धमकाविण्याचे वाढलेले प्रकार. त्यामुळे रिंदा याला तात्काळ अटक करुन करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

**मा. गृहमंत्री यांचे निवेदन**

सन २०१६ पासून नांदेड जिल्ह्यात कुख्यात गुन्हेगार हरविंदरसिंघ उर्फरिंदा व त्याचे साथीदार गुन्हेगारांची टोळी सक्रीय होती. जीवे मारणे, जीवे मारण्याची धमकी देणे, खंडणी वसुल करणे, दहशत निर्माण करणे असे प्रकार केल्याने हरविंदरसिंघ उर्फ रिंदा याच्या विरुध्द नांदेड जिल्ह्यात व पंजाब राज्यात १६ गुन्हे दाखल आहेत. नांदेड शहरातील पोलीस स्टेशन वजिराबाद येथे गु.र.क्र. १३३/२०१६, २४४/२०१७, २४५/२०१७ २४६/२०१७ व ३७६/२०१८, पोलीस स्टेशन विमानतळ येथे गु.र.क्र. १८६/२०१६ तसेच पोलीस स्टेशन शिवाजी नगर येथे गु.र.क्र. ६२/२०१५ अन्वये गुन्हे दाखल आहेत. नांदेड ग्रामीण येथील पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे गु.र.क्र. १७४/२०१९ अन्वये गुन्हा दाखल आहे. पंजाब राज्यातील पोलीस स्टेशन किरतपुर येथे गु.र.क्र. १०२/२०१६,पोलीस स्टेशन मेहतपुर येथे गु.र.क्र. ८३/२०१६, पोलीस स्टेशन सदरखन्ना येथे गु.र.क्र. १०४/२०१६, पोलीस स्टेशन राजपुरा येथे गु.र.क्र. १३८/२०१६ व १७३/२०१६,पोलीस स्टेशन कुराली येथे गु.र.क्र. १७२/२०१६, पोलीस स्टेशन लुधीयाना येथे गु.र.क्र.७३/२०१६, पोलीस स्टेशन बुनद येथे गु.र.क्र. ७३/२०१६ अंतर्गत गुन्हे दाखल आहेत.

चार वर्षापूर्वी हरविंदरसिंघ उर्फ रिंदा याने माळी कुटुंबातील एक सदस्य बचित्तरसिंघ बाबूसिंघ माळी उर्फ सरदारा याचा खून केला. त्याविरुध्द पोलिस स्टेशन विमानतळ येथे गु.र.क्र. १८६/२०१६ कलम ३०२, ३९५, ३९६, १४७, १४८, १४९, १२० (ब), भा.दं.वि., सहकलम ३/२५ भारतीय हत्यार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड गुरुद्वारा परिसरातील यात्री निवासामध्ये जसवंतसिंघ गाडीवाले याच्या खून प्रकरणामध्ये श्री. हरजिंदरसिंघ बलवंतसिंघ चावला पोलिस हेड कॉन्स्टेबल, ए.टी.एस. नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिस स्टेशन, वजिराबाद येथे गु.र.क्र. १३३/२०१६, कलम ३०२, ३०७, ३४ भा.दं.वि., सहकलम ३/२५ भारतीय हत्यार कायदाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

कुख्यात गुन्हेगार हरविंदरसिंघ उर्फ रिंदा या सक्रीय गुन्हेगाराकडून नांदेड शहरातील व्यापारी, बांधकाम व्यावसायिक, डॉक्टर व प्रतिष्ठीत व्यक्तींना खंडणीच्या अनुषंगाने जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात येत होत्या. त्यापैकी शहरातील प्रतिष्ठीत डॉक्टर मनिष कत्रुवार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलिस स्टेशन वजिराबाद येथे गु.र.क्र. २६३/२०१९ कलम ३८४, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. यामध्ये दोन गुन्हेगारांना अटक करण्यात आली.

दि. १७/५/२०१९ रोजी प्रतिष्ठीत नागरिकगोविंद कोकुलवार यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने गोळी मारुन जखमी केल्याने पोलीस स्टेशन इतवारा येथे गु.र.क्र. १७६/२०१९, कलम ३०७ भा.दं.वि. व सहकलम ३/२५ भारतीय हत्यार कायदाप्रमाणे ५ जणांवर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे. उक्त गुन्ह्यात हरविंदरसिंघ उर्फ रिंदाहा फरार आरोपी आहे. पुढील तपासात महाराष्ट्र संगठित गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ हे कलम समाविष्ट करण्यात आले.

कुख्यात गुन्हेगार शेरुसिंघ उर्फ शेरा पि. दलबीरसिंघ खैरा याने त्याच्या साथीदारासह नांदेड शहरातील मेट्रो शूज व्यवस्थापकास धमकी देऊन दुकानातील नगदी ऐवज पळविला. या प्रकरणी भाग्य नगर येथे गु.र.क्र. ३५०/२०१९ कलम ३९२, ५०६, ३४ भा.दं.वि. सहकलम ३/२५ भारतीय हत्यार कायदाप्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. सदर आरोपीस अटक करण्यात आली आहे.

नांदेड शहरात संगठित गुन्हे करणाऱ्या आरोपींविरुध्द पोलिस स्टेशन वजिराबाद येथे महाराष्ट्र संगठित गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ अन्वये (मोक्का अंतर्गत) दोन कारवाया करण्यात आलेल्या आहेत. एका गुन्ह्यात नऊ गुन्हेगारांचा समावेश असुन दुसऱ्या गुन्ह्यात सहा गुन्हेगारांचा समावेश आहे.

नांदेड जिल्ह्यात विविध पोलीस स्टेशन अंतर्गत भारतीय हत्यार कायाद्यान्वये एकूण ३३ कारवाया करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये एकूण ५१ अवैध शस्त्रे जप्त करण्यात आलेली आहेत. सदर प्रकरणी पोलिस स्टेशन वजिराबाद येथे गु.र.क्र. ३९१/२०१९ कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदाप्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.कुख्यात गुन्हेगार हरविंदरसिंघ उर्फ रिंदा याच्या विरुध्द महाराष्ट्र संगठित गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ अन्वये (मोक्का अंतर्गत) दोन कारवाया करण्यात आलेल्या आहेत.

दि. ३१/८/२०१९ नंतर सदर गुन्हेगारांकडून कोणत्याही व्यापारी, डॉक्टर, बिल्डर यांना धमकी प्राप्त झालेली नाही. ज्यांना धमक्या देण्यात आल्या होत्या त्या व्यक्तींना सशस्त्र सुरक्षा पुरविण्यात आली आहे. पेट्रोलिंग पथकाद्वारे विविध व्यक्तींच्या निवास व कार्यालयास भेट देऊन माहिती घेण्यात येत आहे.

हरविंदरसिंघ उर्फ रिंदा फरार असल्याने त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्याच्या रहात्या घराच्या परिसरात सशस्त्र गार्ड नेमण्यात आला आहे व त्याचा महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर तपास करण्यात येत आहे. सायबर सेलच्या मदतीने शास्त्रोक्त पध्दतीने देखील तपास सुरु आहे. सदर आरोपीच्या विरुध्द केलेल्या कारवाईमुळे व्यापारी, डॉक्टर, बिल्डर इत्यादी व्यक्तींमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

************

## <u>लक्षवेधी सूचना</u>

**सर्वश्री अतुल भातखळकर, मोहन मते, अबू आजमी, रईस शेख विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"बारावीच्या बहुतांश विद्यार्थांचे संबधित महाविद्यालयातून अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली असणे, परंतु मुंबई व ठाण्यातील राव महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या बारावीच्या विद्यार्थ्यांचे भवितव्य मात्र अधांतरीच असल्याची गंभीर बाब दि.१ डिसेंबर, २०१९ रोजी उघडकीस येणे, कोणत्याही शाळेला मान्यता देण्यात येत असताना शासनाची मान्यता मिळण्याबरोबरच राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची घेण्याची नितांत आवश्यकता असणे, सदरहू मान्यता मिळाल्यानंतर प्रत्येक शाळा / महाविद्यालयास देण्यात येणारा इंडेक्स क्रमांक मिळाल्यानंतर संबधित शाळा / महाविद्यालयास विद्यार्थ्यांचे दहावी किंवा बारावीच्या परीक्षेचे अर्ज भरता येणे शक्य असणे, आय. आय. टी. राव कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुंबई व ठाण्यात शाखा असून सुमारे १२०० हून अधिक विद्यार्थी बारावी इयत्तेत शिक्षण घेत असणे, परंतु या महाविद्यालयाच्या मान्यतेच्या तांत्रिक बाबींची पूर्तता न झाल्याने आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचे अर्ज सादर करण्यासाठी आवश्यक अनुक्रमांक नसल्याने या महाविद्यालयातील बारावीच्या विद्यार्थांना आजमितीपर्यंत माहे फेब्रवारी २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेचे अर्ज दाखल करता न आल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत पालकांनी, या महाविद्यालयाकडून विद्यार्थ्याकडून अवाजवी शुल्क वसूल केल्याची बाब देखील समोर आलेली असणे, तसेच राव महाविदयालयात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, विद्यार्थ्यांनी शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे तक्रारी दाखल केलेल्या असणे, परंतु सदर प्रकरणी आजतागायत कोणताही ठोस निर्णय घेण्यात न आल्याने या महाविद्यालयातील बारावीतील हजारो विदयार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येणे, त्यामुळे या विद्यार्थ्यांत पसरलेली नैराश्याची भावना, यास्तव राव महाविद्यालयातील बारावीच्या विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

## <u>मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन</u>

राव एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेच्या अधिपत्याखाली राव ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स या कनिष्ठ महाविद्यालयास अंधेरी, बोरिवली, सायन (मुंबई) तसेच ठाणे व खारघर या ठिकाणी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन निर्णय दि.१२ जून, २०१८ अन्वये शासनाची परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार

सदर कनिष्ठ महाविद्यालये सुरु आहेत. सदर महाविद्यालयांमध्ये ६०८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर कनिष्ठ महाविद्यालयांना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, विभागीय शिक्षण मंडळ, वाशी, नवी मुंबई यांचेकडून प्रथम मंडळ मान्यता दिलेली नाही. त्यामुळे इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे मुंबई व ठाणे येथील राव ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, कनिष्ठ महाविद्यालयातील सन २०१९-२० मध्ये इयत्ता १२ वी परीक्षेस प्रविष्ट असलेले ६०८ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे इतर कनिष्ठ महाविद्यालयातून भरण्यात आली आहेत. सबब, कोणत्याही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्क वसूल केल्याबाबत कोणतीही लेखी तक्रार अथवा निवेदन प्राप्त नाही.

***********

"डी" फार्मसी कोर्स व "बी" फार्मसी कोर्स करिता बनावट सर्टिफिकेट घेवून सदरची डिग्री प्राप्त करून सदर बनावट कागदपत्रांच्या आधारे महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सीलकडे त्याची नोंद करून मेडिकल चालवण्याचा परवाना प्राप्त केला

सदर प्रकरणी पोलीसांनी केलेल्या तपासानुसार सदरहू संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम ताहील रामानी व इतर यांचेविरुध्द १) कापुरबावडी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र१४/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्यात एकूण १७ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. तसेच, २) गु.र.क्र.१५१/२०१९ भा.द.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्यात एकूण ३ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना महाराष्ट्र, उत्तरप्रदेश आणि दिल्ली मधील विविध संस्थाकडून दहावी आणि बारावी परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे बनावट प्रमाणत्र मिळवून देण्यात आल्याचे तसेच दिपपॅरामेडिकल ऑर्गनायझेशन या संस्थेला भारतीय औषधनिर्माण शास्त्र परिषद (पी.सी.आय) ची मान्यता नसल्याचे उघड झाले आहे. सदर गुन्ह्यांचे तपासात या गुन्ह्याचा मुख्य सुत्रदार आरोपी डॉ. पुरुषोत्तम भवानदास ताहीलरामाणी यास अटक करण्यात आलेली असून त्याचेसह एकूण २०आरोपीतांना सदर गुन्ह्यात अद्याप पावेतो अटक करण्यात आलेली आहे. त्यामध्ये १५ फर्मासिस्ट व १ माध्यमिक शिक्षा परिषद महाराष्ट्राचे चेअरमन व १ दिप पॅरामेडिकलचे चेअरमन यांचा समावेश आहे. तसेच, एकूण १५ मेडिकल स्टोअर्सवर कारवाई करण्यात आली आहे.

सदर गुन्ह्यात अटक आरोपी फार्मासिस्ट यांचेकडून इयत्ता १० वी चे ६ मार्कलिस्ट प्रमाणपत्र, १२ वीचे २८ मार्कलिस्ट प्रमाणपत्र व ओपीजीस युनिर्व्हसिटि सनराईज युनिर्व्हसिटि डी-फार्मसीचे ३४ मार्कलिस्ट प्रमाणपत्र, बी-फार्मसीचे ७, मार्कलिस्ट व फार्मसी काउंसील नोंदणीचे १५ प्रमाणपत्र असे एकूण ९० मार्कलिस्ट प्रमाणपत्र जप्त करण्यात आली. या गुन्ह्यात ४ आरोपीतांवर पुरवणी दोषारोपपत्र पाठविण्याची तजविज ठेवली आहे. सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

**************

**लक्षवेधी सुचना** **गृह विभाग**

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०१९ चे (हिवाळी)अधिवेशन**

**सर्वश्री. सुनिल प्रभू, दौलत दरोडा, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे.

"कोलशेत" (ठाणे) येथील, भागातील, 'दिप पॅरामेडिकल ऑर्गनायझेशन' या संस्थेच्या अध्यक्षांनी, राजस्थान मधील ओपीजीएस आणि अन्य विद्यापीठाच्या नावाने औषधनिर्माणशास्त्राचे बनावट प्रमाणपत्र देऊन, सुमारे ७०० विद्यार्थ्यांची फसवणूक करून कोटयावधी रूपयाचा आर्थिक घोटाळा केल्याचे नुकतेच उघडकीस आलेले प्रकरण, ठाणे गुन्हे अन्वेषण शाखा युनिट-१ च्या पथकाने सहा महिन्यापूर्वी औषधनिर्माणशास्त्राचे बनावट प्रमाणपत्र देणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करणे, सदरहू कारवाई मध्ये दहावी आणि बारावी परीक्षेच्या बनावट प्रमाणपत्राच्या आधारे ठाण्यातील 'दिप पॅरामेडिकल ऑर्गनायझेशन' संस्थेने कोणत्याही प्रशिक्षणाविना विद्यार्थ्यांना औषनिर्माणशास्त्राचे बनावट प्रमाणपत्र दिल्याचे उघडकीस येणे, सदर प्रकरणी पोलिसांनी केलेल्या तपासानुसार, सदरहू संस्थेचे अध्यक्ष पुरूषोत्तम ताहील रामानी आणि बनावट प्रमाणपत्राच्या आधारे दुकान चालविणाऱ्यांना पोलिसांनी अटक करण्यात येणे, त्यावेळी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र ,उत्तरप्रदेश आणि दिल्ली मधील विविध संस्थाकडून दहावी आणि बारावी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे बनावट प्रमाणपत्र मिळवून देण्यात आल्याचे तपासातून उघड होणे, सदरहू बनावट प्रमाणपत्र देणारी 'दिप पॅरामेडिकल ऑर्गनायझेशन' या संस्थेला भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषद (पीसीआय) ची मान्यता नसल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, संस्थे विरोधात ठाणे कापुरबावडी पोलिस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात येणे, सदर प्रकरणी स्थानिक पोलिसांतर्फे चौकशी करून कारवाई करण्याकडे हेतुपूर्वक विलंब व दुर्लक्ष करण्यात येत असल्यामुळे, राज्य शासनाने सदर प्रकरणाची उच्च स्तरावरून चौकशी करून यातील दोषी विरूध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, परिणामी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेले नैराश्याचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

## मा.गृह मंत्री यांचे निवेदन

ठाणे गुन्हे अन्वेषण युनिट १ च्या पथकाने जानेवारी २०१९ मध्ये औषध निर्माण शास्त्राचे बनावट प्रमाणपत्र देणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. यामध्ये ठाणे येथील कोलशेत भागातील दिप पॅरामेडिकल ऑर्गनायझेशन या संस्थेच्या अध्यक्षांनी राजस्थान मधील ओपीजीएस आणि अन्य विद्यापीठाच्या नावाने औषध निर्माणशास्त्राचे बनावट प्रमाणपत्र देऊन सुमारे ७०० विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले.

दिप पॅरामेडिकल ऑर्गनायझेशन संस्थेने महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्याच्या बाहेरील वेगवेगळया शिक्षण संस्थाकडून इयत्ता १० वी व १२ वी पासचे बनावट प्रमाणपत्र प्राप्त करून देवुन सदरचे प्रमाणपत्र खरे आहे असे भासवून त्या प्रमाणपत्रांच्या आधारे महाराष्ट्र बाहेरील विद्यापीठामध्ये

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन**

<u>**लक्षवेधी सूचना**</u>

**सर्वश्री.चेतन तुपे, अशोक पवार, दत्तात्रय भरणे, भिमराव तापकीर, अजित पवार, बाळासाहेब पाटील, शेखर निकम, यशवंत माने, प्राजक्त तनपूरे, नवाब मलिक, सुनिल शेळके, दौलत दरोडा, ॲड.राहूल कुल, श्री.भारत भालके, श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"पुणे शहरामध्ये दिनांक २५ सप्टेंबर, २०१९ दरम्यान अतिवृष्टीमुळे ढगफुटी झाल्याने सिंहगड रोड, धनकवडी, बालाजी नगर, बिबेवाडी, स्टेट बँक नगर, वडगाव बुद्रुक, धायरी, शिवणे, वारजे, आंबील ओढा, नऱ्हे, किरकटवाडी, खेड शिवापूर या भागात घराघरांत, सोसायट्यांच्या पार्किंगमध्ये पाणी शिरुन तसेच नाल्यांना फुगवटा निर्माण होऊन व भिंत कोसळल्याने १० पेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाला असणे, पुराच्या पाण्यात पुणे शहरात १५ ते २० जण वाहून गेले असणे, चारचाकी-दुचाकी वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, पुणे शहरामध्ये मध्ये झालेल्या पावसाच्या हाहाकाराचे मुळ कारण अनियमित बांधकामे, अरुंद नाले, नाल्यांवरील बांधकाम, नाले बंदीस्त, बदललेले नाल्यांचे नैसर्गिक स्त्रोत, राडारोडा, प्लास्टिक-कचरा, रस्त्यांच्या दोन्ही बाजुस पावसाळी लाईनचा अभाव तसेच पावसाळी लाईन-गटारे स्वच्छ करण्यामधील गैरव्यवहार इत्यादी प्रमुख कारणांमुळे भिषण पुर परिस्थिती उद्भवल्याचे निदर्शनास आले असणे, महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या जीविताला निर्माण झालेला धोका, झालेल्या घटनेबद्दल महापालिका व जिल्हा परिषद प्रशासन स्वत:ची जबाबदारी टाळणे, सदर घटनेबाबत लोकांमध्ये पसरलेला असंतोष आणि पुरग्रस्तांना मिळालेली तोकडी मदत यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त होऊन ते फुटपाथ, रस्त्यांवर वास्तव्य करीत असणे, पुरग्रस्तांना सर्वतोपरी मदत तसेच अनियमित बांधकामे, अरुंद नाले, नाल्यांवरील बांधकाम, नाले बंदिस्त, बदललेले नाल्यांचे नैसर्गिक स्त्रोत, राडारोडा, प्लास्टिक-कचरा, रस्त्याच्या दोन्ही बाजूस पावसाळी लाईन, पावसाळी लाईन-गटारे स्वच्छ करण्यामधील गैरव्यवहार याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, सदर घटनेची सखोल चौकशी करुन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**मा.मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन**

दिनांक २५/९/२०१९ रोजी पुणे शहराच्या दक्षिण भागामध्ये सायंकाळी ८ च्या दरम्यान जवळपास एक तास एवढ्या कालावधीत ढगफूटीमुळे ८० मी.मी. एवढा पाऊस झाला होता. ही अतिवृष्टी पुणे शहरात नेहमी पडणाऱ्या पावसापेक्षा सरासरी जास्त असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

या बाधीत भागातील पाण्याचा संचय करणारे तलाव पावसामुळे पूर्वीच भरलेले होते. नाल्याच्या प्रचंड पाण्याच्या प्रवाहासोबत कचरा, अडकलेले वृक्ष, झुडपे, नाल्यावर बांधण्यात आलेले जुने कल्व्हर्ट, कमी क्षमतेचे लहान पूल यामुळे पावसाच्या पाण्याच्या प्रवाहास अडथळा झाला होता. ओढ्यांना आलेल्या पुरामुळे अस्तित्वातील मुख्य ड्रेनेज लाईन्स व चेंबर्स वाहून गेले होते. मुख्य ड्रेनेज लाईनमध्ये दगड, माती गेल्याने बऱ्याच ठिकाणी या लाईन्स बंद झाल्या होत्या. या कारणांमुळे सिंहगड रोड, धनकवडी, बाळाजीनगर, बिबवेवाडी, वडगाव (बु.), धायरी, शिवने, वारजे व अंबिलओढा या अतिवृष्टीने बाधीत भागातील पावसाच्या

पाण्याचा निचरा होऊ न शकल्याने पाण्याचा फुगवटा होऊन पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली होती, हे खरे आहे.

पुणे शहरातील पुर परिस्थितीमुळे बाधीत झालेल्या ठिकाणी पुणे महानगरपालिकेमार्फत आवश्यक अशी अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध करुन घेऊन सुमारे ४००० मे.टन पर्यंत कचरा व गाळ वाहतूक करुन उचलण्यात आलेला आहे. तसेच, वैद्यकीय मदत, पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा, पुरग्रस्तांची तात्पुरती निवासाची सोय, अन्न पुरवठा, इत्यादी प्राथमिक सुविधा पुणे महानगरपालिकेमार्फत तातडीने पुरविण्यात आलेल्या होत्या. संबंधित विभागांच्या समन्वयाकरीता आपत्ती नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत होता. या व्यतिरिक्त बाधीत भागाचे सर्वेक्षण करुन सदर भागाची पुनर्बांधणी करण्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत सर्वंकष आराखडा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

या पुर परिस्थितीच्या अनुषंगाने मदत देण्यासाठी तसेच, पुरस्थिती नियंत्रणात आणण्याच्या दृष्टीकोनातून महसूल यंत्रणा, पोलीस यंत्रणा, एनडीआरएफ, स्थानिक आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, पुणे महानगरपालिकेची अग्निशमन यंत्रणा, तसेच विविध सामाजिक संस्थांमार्फत प्रयत्न करण्यात आलेले होते. यामध्ये एकूण १००१ कुटूंबे व ३१६५ व्यक्तींना स्थानांतरीत करुन ४४ ठिकाणी सुरक्षित तात्पुरती निवारण केंद्रे उभारुन ठेवण्यात आले होते.

अंबिलओढा झोपडपट्टी परिसर व आसपासच्या क्षेत्रातील नाला परिसरामध्ये पुराच्या पाण्यामुळे चल व अचल संपत्तीचे नुकसान झालेले आहे, हे खरे आहे. यामध्ये पूराच्या पाण्यामध्ये चार चाकी-दुचाकी वाहने वाहून गेली असून वाहनांचे नुकसान झाले आहे. तथापि, आंबील ओढ्यातील कोणताही प्रवाह बदलण्यात आलेला नाही असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

या अतिवृष्टीमुळे पुणे शहरात एकूण ४३०५ बाधीत कुटूंबे असून त्यापैकी १०१७ कुटूंबांना प्रत्येकी १५०००/- एवढी रक्कम महसूल प्रशासनामार्फत वाटप करण्यात आलेली आहे. तसेच, ३२८८ एवढ्या कुटूंबांना प्रत्येकी रु.५०००/- एवढी रक्कम वाटप करण्यात आलेली असून, उर्वरीत रक्कम देण्याची कार्यवाही सुरु आहे. या पुरामध्ये पुणे शहरात टांगेवाला कॉलनी, अरण्येश्वर येथे सोसायटीची सिमाभिंत पडून ७ व्यक्ती व स्वातंत्रवीर सावरकर सोसायटीची बंगल्याची सिमाभिंत पडून १ व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. या व्यक्तींच्या नातेवाईकांना आपत्ती निवारणार्थ जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रत्येकी ४ लक्ष एवढी मदत देण्यात आली आहे. तसेच पूरामध्ये पडझड व नष्ट झालेल्या एकूण २२८ झोपड्या असून महसूल प्रशासनाने रू.१३,६८,०००/- एवढे उपलब्ध करून दिलेले आहेत.

---********---

**मा. श्री शंभूराज देसाई, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

**********************************************************************

"पाटण विधानसभा मतदारसंघातील कोयना नदीकाठी वसलेल्या गावांना कोयना नदीस अतिवृष्टींच्या काळात येणाऱ्या पुरामुळे धोका निर्माण होणे, पुरामुळे मोठ्या प्रमाणात धोका निर्माण होणाऱ्या नदीकाठच्या १० गावांना पुरसंरक्षक भिंती व कोयना नदीवर घाट बांधणेच्या कामांना महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ पुणे अंतर्गत राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने आवश्यक असणारा निधी तात्काळ उपलब्ध करुन देणेसंदर्भात शासनाचे लक्ष वेधणे, पाटण मतदारसंघातील कोयना नदीस अतिवृष्टीच्या काळात येणाऱ्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात धोका निर्माण होणाऱ्या एकूण १० गावांना पुरसंरक्षक भिंती व कोयना नदीवर घाट बांधणेस एक वर्षाच्या आत निधी मंजुर करण्याचे शासनाच्यावतीने राज्याचे जलसंपदा राज्यमंत्री यांचेकडून विधानसभा सभागृहात आश्वासित करण्यात येणे, यामध्ये सर्वात जास्त धोका पोहोचणाऱ्या सांगवड, बनपेठवाडी व गुंजाळी या तीन महत्वाच्या गावांतील कामांना शासनाने दोन वर्षापूर्वी आश्वासन देवून देखील अद्यापही मंजुरी व निधी देण्यात न येणे, दरम्यान मतदारसंघात यंदाचे वर्षी अतिवृष्टीचे प्रमाण जादा असल्याने या तिन्ही गांवांमध्ये मोठ्या प्रमाणात भितीचे वातावरण असणे, सांगवड, बनपेठवाडी व गुंजाळी या तिन्ही गांवाना पुरसंरक्षक भिंती व कोयना नदीवर घाट बांधणेच्या कामांचे अंदाजपत्रक तयार करुन या तिन्ही गांवाना अनुक्रमे ०५ कोटी ४३ लाख ७१ हजार ५६४ रुपये, ०२ कोटी ३८ लाख ८६ हजार ५६६ रुपये व ०३ कोटी ४६ लाख ८४ हजार ६३६ रुपयांचा सदरचा निधी लवकरात लवकर उपलब्ध करुन देणेसंदर्भात शासनाचे जलसंपदा विभागाकडे सविस्तर प्रस्ताव देखील सादर करण्यात येणे, सदरचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे प्रलंबीत असलेने या विभागाचा लोकप्रतिनिधी म्हणून राज्याचे जलसंपदामंत्री यांचेकडे दिनांक.०५.१२.२०१७ रोजीच्या पत्रानुसार शासनाने विधानसभा सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार सांगवड, बनपेठवाडी व गुंजाळी या तीन महत्वाच्या गावांतील कामांना तात्काळ मंजुरी देवून त्यास निधी उपलब्ध करुन देणेसंदर्भात लेखी मागणीही करण्यात येणे, दरम्यान शासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे कोयना नदीकाठी पुरामुळे धोका निर्माण होणाऱ्या या तीन गावातील जनतेमध्ये शासनाप्रती पसरलेली नाराजीची भावना लक्षात घेता शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

**मा. मंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन**

कोयना नदीकाठी वसलेल्या गावांना अतिवृष्टीच्या काळात कोयना नदीमध्ये कोयना धरणातून सोडलेल्या पाण्यामुळे पुराचा धोका निर्माण होत असल्याने नदीकाठच्या १० गावांतील आवश्यक ठिकाणी पूर संरक्षक भिंती बांधणेच्या कामांपैकी ७ कामांना शासनाने पूर संरक्षक कामांतर्गत सन २०१७ मध्ये प्रशासकीय मान्यता प्रदान करुन् जुलै, २०१८ मध्ये पूरवणी मागणीद्वारे निधीची तरतूद केलेली आहे. तसेच, सदर ७ कामांना सन २०१९-२० मध्ये प्रशासकीय मान्यता किंमतीच्या मर्यादेत रु. ६.५४ कोटीची संपूर्ण आर्थिक तरतूद केलेली आहे.

(क्र.मा.प.

ROTA-1H 999 (700-1-2020)-1

जुलै, २०१६ मध्ये पावसाळी अधिवेशना दरम्यान मा. विधानसभा सदस्य श्री. शंभुराजे देसाई यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेमध्ये, कोयना नदीकाठच्या मौजे नेरळे, सांगवड, साजूर, पश्चिम सुपने (थोरात मळा) व केसे या ५ गावांना कोयना धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे महापूराचा फटका बसून नुकसान होत असल्याने या गावांना पूरापासून संरक्षण देणे करिता नदीकाठी संरक्षक भिंत बांधण्याकरिता राज्य अर्थसंकल्पातून निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती. त्यादृष्टीने शासनाने ५ पैकी सांगवड वगळता इतर ४ कामांना जुलै व नोव्हेंबर, २०१७ मध्ये प्रशासकीय मान्यता देऊन निधीची तरतूद केलेली आहे.

सदर लक्षवेधीच्या अनुषंगाने दि. ०३.०८.२०१६ रोजी विधानमंडळात झालेल्या चर्चेनुसार झालेले आश्वासन क्रमांक ३६८ अन्वये तत्कालीन मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांनी, "रु. ४१९ लक्ष रुपयांची सांगवड नावाची एक योजना आहे. या योजनेच्या तांत्रिक बाबी पूर्ण करुन ती केंद्र शासनाकडे पाठविली जाणार आहे," असे आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावरुन प्राप्त मौजे सांगवड, मौजे बनपेठवाडी व मौजे गुंजाळी या तिन्ही पूर संरक्षक कामांची अंदाजपत्रके मान्यतेसाठी सादर केली असता, त्यावर नियोजन व वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यानुसार प्रशासकीय मान्यतेबाबतची पुढील कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

क्षेत्रिय स्तरावरुन मौजे सांगवड, मौजे बनपेठवाडी व मौजे गुंजाळी येथील पूर संरक्षक कामांची अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर त्यांना प्रचलित धोरणांनुसार प्रशासकीय मान्यता देण्याचे व आर्थिक तरतूद करण्याचे नियोजित आहे.

*********************@*********************

५ ९९९.१९.

लक्षवेधी सूचना.

गृह विभाग.

## सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

**सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी-**

"पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्हयांसह इतर जिल्हयांमध्ये कडकनाथ कोंबडी व्यवसायामध्ये सर्वसामान्य शेतकरी, बेरोजगारांनी कर्ज काढून लाखो रुपयांची गुंतवणुक केलेली असणे, या व्यवसायातील हजारो गुंतवणुकदारांची कोट्यावधी रुपयांची आर्थिक फसवणुक झालेली असल्याची माहे डिसेंबर, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आलेली माहिती, कडकनाथ कोंबडी व्यवसाय करतांना दलालांनी त्यांना अवाजवी आश्वासने दिलेली असणे, मात्र कालांतराने कडकनाथ कोंबडीला गिऱ्हाईकच मिळेनासे झालेले असल्याने कडकनाथ कोंबड्या सोडून द्याव्या लागणे, दलालांनी आपली केंद्रेच बंद केल्याने कडकनाथ कोंबडी व्यावसायिक दिशाहीन झालेले असणे, आपली सर्व जीवनभराची आर्थिक पुंजी लावून उभारलेल्या व्यवसाय बुडाल्याने प्रचंड तणावामध्ये दिवस काढावे लागत असणे, त्याचबरोबर कुटूंबियांच्या मानसिकतेवरही विपरीत परिणाम झालेला असणे, सदर व्यावसायिकांना सहाय्य करण्यास प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याने आपल्या न्याय्य मागण्यांसाठी दिनांक १० डिसेंबर, २०१९ रोजी कोल्हापूर येथून मोटारसायकल रॅलीने मोर्चा काढून सातारा, पुणे मार्गे मुंबईत मंत्रालयावर दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी कडकनाथ पालन संघर्ष समितीने आंदोलन करणे, अडचणीत सापडलेल्या कडकनाथ कोंबडी व्यावसायिकांना त्वरीत सहाय्य करण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याची लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ११ डिसेंबर, २०१९ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतांनाही याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यास होत असलेली दिरंगाई, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, लाखो रुपयांची फसवणुक झालेली असल्याने त्यांच्यामध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, त्यांचेकडुन पुढील काळात आत्महत्येसारखा पर्याय निवडण्याची शक्यता असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया"

---

### मा. मंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

सदर गुन्हयातील महारयत अॅग्रो इंडीया प्रा.लि.चे संस्थापक अध्यक्ष सुधीर शंकर मोहिते, संचालक संदिप सुभाष मोहिते संचालक हनुमंत शंकर जगदाळे, कंपनीच्या पुणे येथील कार्यालयातील अकाऊंटंट प्रितम माने व महारयत कंपनीचे संचालक यांनी स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी आपसात संगनमत करुन फिर्यादी तसेच इतर गुंतवणूकदारांना कडकनाथ कोंबडी पालन व्यवसायात होणाऱ्या मोठया आर्थिक फायद्याचे आमिष दाखवुन फसवणूक केली, म्हणून अमरावती शहर, पुणे शहर, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, सोलापुर ग्रामीण, कोल्हापुर, नाशिक शहर, पालघर व जळगाव येथे (२ गुन्हे दाखल) अशा ११ विविध पोलीस ठाण्यामध्ये खालील प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

- गाडगे नगर पोलीस स्टेशन, अमरावती, येथे गु.र.क्र ९०५/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०,३४, दिनांक १९/९/२०१९ रोजी महारयत अॅग्रो इंडीया प्रा.लि.चे संस्थापक अध्यक्ष सुधीर शंकर मोहिते व इतर एक आरोपी याचे विरुध्द गुन्हा करण्यात आला आहे. सदर गुन्हयाच्या तपासात १० साक्षीदारांचे बयान नोंद केले असून त्यांचे कागदपत्र हस्तगत केले आहेत दोन्ही आरोपी प्रोडक्शन वॉरंट अंतर्गत कळंबा कोल्हापुर करागृहामध्ये ताब्यात घेऊन दिनांक १५/१२/२०१९ रोजी अटक करून दिनांक २१/१२/२०१९ पावेतो पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आला आहे. सदर प्रकरणात एकुण रुपये १७,१५,०००/- ची फसवणुक झाली आहे.
- दत्तवाडी पोलीस ठाणे, पुणे शहर, येथे गु.र.नं ३९४/२०१९ भा.दं.वि. कलम ४०६,४०९,४२०,३४, दिनांक ०३/०९/२०१९ रोजी महारयत अॅग्रो इंडीया प्रा.लि.चे संस्थापक अध्यक्ष सुधीर शंकर मोहिते व इतर ३ आरोपीं यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणात एकुण रुपये १,७३,१९,०००/- ची फसवणुक झाली आहे. सदर गुन्हयात एका आरोपीला ३/९/२०१९ रोजी अटक करण्यात आली असून त्याच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच एकूण ११६ साक्षीदार तपासले आहेत.
- दोडामार्ग पोलीस ठाणे, सिंधुदुर्ग, येथे गु.र.नं १२४/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०,४०६,४०९,४६८,३४ सह महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ३ व ४ अन्वये दिनांक १४/११/२०१९ रोजी महारयत अॅग्रो इंडीया प्रा.लि.चे संस्थापक अध्यक्ष सुधीर शंकर मोहिते व इतर २ आरोपीं विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणात एकुण रुपये ४८,५४,०००/- ची फसवणुक झाल्याचे निदर्शनास आले असून एकूण ३४ साक्षीदार तपासलेले आहेत.
- पाटण पोलीस ठाणे, जिल्हा सातारा, येथे गु.र.नं १५५/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०,४०६,४०९,३४ सह महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ३ अन्वये दिनांक ०६/०९/२०१९ रोजी महारयत अॅग्रो इंडीया प्रा.लि.चे संस्थापक अध्यक्ष सुधीर शंकर मोहिते व इतर ३ आरोपीं विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपींना अटक करुन पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आला होता. सदर आरोपींना दि. २४/११/२०१९ पासून न्यायालयीन कोठडी मिळाली आहे. सदर प्रकरणात एकुण रुपये १,४८,२३,५१९/- ची फसवणुक झाल्याचे निदर्शनास आले असून एकूण ३२ साक्षीदार तपासले आहेत.
- इस्लामपुर पोलीस ठाणे, जिल्हा सांगली, येथे गु.र.नं -६२१/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०,४०६,४०९,३४ सह महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ३ अन्वये दिनांक ३१/०८/२०१९ रोजी महारयत अॅग्रो इंडीया प्रा.लि.चे संस्थापक अध्यक्ष सुधीर शंकर मोहिते व इतर ७ आरोपीं विरुध्द गुन्हा दाखल असुन ४ आरोपींना अटक करुन पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आला आहे. सदयास्थितीत सदर आरोपींना न्यायालयीन कोठडी मिळाली आहे. सदर प्रकरणात एकुण रुपये २,८०,०००/- ची फसवणुक झाल्याचे निदर्शनास आले आहे.
- माळशिरस पोलीस ठाणे, सोलापुर ग्रामीण, येथे गु.र.नं ४३४/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०,४०६,३४ अन्वये दिनांक २६/०९/२०१९ रोजी महारयत अॅग्रो इंडीया प्रा.लि.चे संस्थापक अध्यक्ष सुधीर शंकर मोहिते व इतर ३ आरोपीं विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणात एकुण रुपये ३८,९५,०००/- ची फसवणुक झाल्याचे निदर्शनास आले असून एकूण २८ साक्षीदार तपासले आहेत.

- शाहुपूरी पोलीस ठाणे, जिल्हा कोल्हापुर, येथे गु.र.नं ४७८/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०,४०६,४०९,३४ अन्वये दिनांक २९/०८/२०१९ रोजी महारयत ॲग्रो इंडीया प्रा.लि.चे संस्थापक अध्यक्ष सुधीर शंकर मोहिते व इतर २ आरोपीं विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे त्यांना अद्याप पर्यंत जामीन मिळालेला नाही सदर प्रकरणात एकुण रुपये ३,९४,५९,९३०/- ची फसवणुक झाल्याचे निदर्शनास आले आहे.
- नालासोपरा पोलीस ठाणे येथे गु.र.नं ३२०/२०१९ भा.दं.वि. कलम ४२९,३४ अन्वये दिनांक १६/०९/२०१९ रोजी महारयत ॲग्रो इंडीया प्रा.लि.चे संस्थापक अध्यक्ष सुधीर शंकर मोहिते व इतर २ आरोपीं विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आला आहे. सदर प्रकरणात एकुण रुपये ३३,७५,०००/- ची फसवणुक झाल्याचे निदर्शनास आले आहे.
- सरकारवाडा पोलीस ठाणे, नाशिक शहर, येथे गु.र.नं ३८२/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०,४०६,४०९,३४ अन्वये दिनांक ०९/०९/२०१९ महारयत ॲग्रो इंडीया प्रा.लि.चे संस्थापक अध्यक्ष सुधीर शंकर मोहिते व इतर ३ आरोपीं विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणात एकुण रुपये १३,९०,०००/- ची फसवणुक झाल्याचे निदर्शनास आले आहे.
- मेहुणबारे पोलीस ठाणे, ता. चाळीसगाव, जिल्हा जळगाव, येथे गु.र.नं १६६/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०,४०६,४०९,३४ अन्वये दिनांक १३/०९/२०१९ रोजी महारयत ॲग्रो इंडीया प्रा.लि.चे संस्थापक अध्यक्ष सुधीर शंकर मोहिते व इतर ११ आरोपीं विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा तपासावर असून आरोपींना अटक करणे बाकी आहे. सदर प्रकरणात एकुण रुपये २९,१५,०००/- ची फसवणुक झाल्याचे निदर्शनास आले आहे.
- पाचोरा पोलीस ठाणे, जिल्हा जळगाव, येथे गु.र.नं १३७/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०,४०६,३४ अन्वये दिनांक १५/०९/२०१९ रोजी महारयत ॲग्रो इंडीया प्रा.लि.चे संस्थापक अध्यक्ष सुधीर शंकर मोहिते व इतर १० आरोपीं विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा तपासावर असून आरोपींना अटक करणे बाकी आहे. सदर प्रकरणात एकुण रुपये ९,६०,०००/- ची फसवणुक झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सद्यस्थितीत उपरोक्त गुन्हे तपासावर प्रलंबित आहेत.

*********

गृह विभाग

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

श्री सुनिल प्रभु, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

"परदेशात पाठविण्यासाठी, पुण्याहून मुंबईत आणण्यात येत असलेला, १ कोटी ३४ लाख रुपये किमतीचा रक्त चंदनाथा साठा गुन्हे शाखा युनिट-७ च्या पोलिसांनी मानखुर्द येथे सापळा रचून जप्त केल्याची दिनांक ३०.११.२०१९ रोजी घडलेली घटना, सदरहू रक्त चंदनाचा साठा जेएनपीटी बंदराद्वारे परदेशात पाठविण्यात येत असणे, गेले काही महिन्यापूर्वी गुन्हे शाखा युनिट-७ च्या पोलिसांनी रक्त चंदनाचा साठा पकडण्यात येणे, गेले ८-१० वर्षात विदेशात पाठविण्यासाठी, देशातील काही राज्यांमधून तसेच महाराष्ट्रातून तस्करी करुन आणलेला रक्त चंदनाचा साठा नवी मुंबई, पनवेल, रसायनी, खारघर आणि जेएनपीटी बंदर आदी ठिकाणी अनेकवेळा पोलिसांनी जप्त करण्यात येणे, सदरहू साठे वारंवार जप्त करण्यात येऊनही, शासन तथा पोलिसांनी रक्त चंदनाची तस्करी करणारे रॅकेटचा शोध घेऊन मुळ सुत्रधारासह अटक करणेबाबत कोणतीच कार्यवाही न करता, प्रकरण आर्थिक संगनमताने दडपून टाकण्यात येत असल्याचा घडलेला व घडत असलेला प्रकार, परिणामी वृक्षतोड व जंगल नष्ट होऊन पर्यावरणाचा मोठया प्रमाणात होत असलेला ऱ्हास, तसेच यामाध्ये तस्करी प्रकरण दडपून मोठया प्रमाणात होत असलेला आर्थिक गैरव्यवहार, सदर बाब शासनाच्या वारंवार निदर्शनास येऊनही, त्याची शासनाकडून दखल घेण्यात न येणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

(कृ. मा. प.)

## मा.मंत्री (गृह) यांचे निवेदन

दिनांक २८.११.२०१९ रोजी १ कोटी ३४ लाख रुपये किमतीचा रक्त चंदनाचा साठा गुन्हे शाखा युनिट-७ च्या पोलिसांनी मानखुर्द येथे सापळा रचून पकडण्यात येवून मानखुर्द पो. ठाणे गु. र. क्र.३८६/२०१९ (गु.प्र.शा., गु. र. क्र.२०५/२०१९) कलम ३७९, ३४ भादंवि सह कलम ४१, ४२ भारतीय वन कायदा १९२७ सह महाराष्ट्र वन नियम २०१४ नियमक ३१, ८२ सह महाराष्ट्र (ग्रामीणविभाग) वृक्ष संरक्षण व संवर्धन कायदा १९७५ कलम ३, ४ अन्वये गुन्हा नोंद करुन सदर प्रकरणात दिनांक २८.११.२०१९ रोजी दोन आरोपींना तसेच दिनांक ३/१२/२०१९ रोजी व दिनांक ७/१२/२०१९ रोजी प्रत्येकी एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. दिनांक ३०.११.२०१९ रोजी एका आरोपीने पोलीस काठडी दरम्यान निवेदन पंचनाम्याअंतर्गत एकूण ५७८६.२५ किलोग्रॅम वजनाचे व अंदाजे रुपये ५,७८,०६,०२५/- किंमतीचे रक्तचंदन पुणे येथून हस्तगत करण्यात आले. सदर सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

महाराष्ट्रातून तस्करी करुन आणलेला अवैध रक्त चंदनाच्या साठा करणाऱ्यांविरध्द पोलीस आयुक्त, नवी मुंबई कार्यक्षेत्रात मागील १० वर्षात सन २०१० मध्ये २ गुन्हे, सन २०१३ मध्ये २ गुन्हे, सन २०१४ मध्ये ३ गुन्हे, सन २०१५ मध्ये ३ गुन्हे, सन २०१६ मध्ये २ गुन्हे व सन २०१७ मध्ये १ गुन्हा अशाप्रकारे एकूण १३ गुन्हे दाखल आहेत. सदर १३ गुन्ह्यातील प्रकरणात प्रचलित कायद्याव्दारे योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यात आली आहे व यापुढे अशाप्रकारे गुन्हे करणाऱ्यांविरुध्द कायदेशिर कारवाई येईल.

नेरळ पो. ठाणे, जि. रायगड येथे सन २०१५ मध्ये १ गुन्हा दाखल आहे मात्र रायगड जिल्ह्यातील रसायनी पो. ठाणे यांचेकडे यासंदर्भात गुन्हे दाखल नाहीत. सदर सर्व अटक आरोपित हे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत तसेच पुढील तपास चालू आहे.

**************

लक्षवेधी सूचना क्रमांक

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन**

**श्री.जितेंद्र आव्हाड**, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे.:-

**"नागपूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये ३० वर्षाहून अधिक जुन्या इमारतींची संख्या २० हजार इतकी असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, त्यातील १०८६ इमारती ६० वर्षाहून अधिक जुन्या, १७५१ इमारती ५० वर्षे, ४०९३ इमारती ४० वर्षे तर १३१२२ इमारती ३० वर्षाच्या असून यातील शेकडो इमारती धोकादायक स्थितीत असतांना यासंदर्भातील कोणतीही माहिती महापालिकेकडे नसल्याची उघडकीस आलेली बाब, शासनाने यातील इमारती धोकादायक स्थितीत आहेत किंवा कसे याची माहिती यापूर्वीच मागितलेली असतांना शासनाकडेही कोणतीही माहिती नसणे, त्यामुळे या धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या हजारो नागरिकांच्या जिवीताला निर्माण झालेला धोका,सदर इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन जीर्ण इमारतींची दुरुस्ती करणे, धोकादायक इमारतींमधील रहिवाशांचे पुनर्वसन करुन सदरच्या इमारती पाडणे याबाबत युध्दस्तरावर कार्यवाही करण्याची लोकप्रतिनिधी, व सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांचेकडे दिनांक ५ डिसेंबर, २०१९ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार केलेल्या मागण्या, सदर गंभीर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी धोकादायक स्थितीत असलेल्या हजारो नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, धोकादायक इमारतींबाबत प्रशासनाकडे कोणतेही धोरण नसल्याने याबाबत युध्दपातळीवर कार्यवाही करण्यास प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."**

---

**मा.मंत्री (नगरविकास) यांचे निवेदन**

नागपूर महानगर पालिका क्षेत्रातील खुले भूखंड त्याचप्रमाणे इतर इमारती यांचे जीआयएस प्रणालीवर आधारित सर्वेक्षण करुन, केवळ मालमत्ता निर्धारण करण्याच्या संदर्भात, नियुक्त एजन्सीमार्फत गोळा करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये ६० वर्षाहून जास्त वयोमान असलेल्या १०८६, ५० ते ६० वर्षादरम्यान वयोमान असलेल्या १७५१, ४० ते ५० वर्षे वयोमान असलेल्या ४०९३ इमारती तर, ३० ते ४० वर्षे वयोमान असलेल्या इमारतींची संख्या १३१२२, इतकी असल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदरची आकडेवारी या एजन्सीच्या वेबसाईटवर सर्वांसाठी उपलब्ध असून, सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भातील कोणतीही विनंती महानगरपालिकेच्या अभिलेखात आढळून आलेली नाही.

तथापि, या आकडेवारीवर आधारित नागपूर शहरातील धोकादायक इमारतीसंदर्भात, जुलै, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात स्थानिक दैनिक वर्तमान पत्रात बातमी छापून आली होती.

सदरच्या आकडेवारीमध्ये नमूद इमारतींचे वयोमानाबाबतची माहिती; प्रत्यक्ष स्थळपहाणी, बांधकाम परवानगीचे आदेश, इमारत धारकाने दिलेली माहिती या आधारे संकलीत करण्यात आलेली आहे.

एजन्सीबरोबर झालेल्या करारामध्ये राहण्यास असुरक्षित इमारतींची आकडेवारी गोळा करणे अपेक्षीत नव्हते. त्यामुळे शहरात शेकडो इमारती धोकादायक स्थितीत असल्याचे गृहीत धरणे संयुक्तिक होणार नाही. तथापि, या आकडेवारीच्या आधारे, ३० वर्षाहून जास्त वयोमान असलेल्या इमारतींसंदर्भात प्रत्यक्ष स्थळपहाणीअंती नियमानुसार, पुढील योग्यती कार्यवाही करण्याचे प्रयोजन महापालिका स्तरावर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६५ मधील तरतुदीनुसार, शहरातील धोकादायक व जीर्ण इमारतीसंदर्भात, प्रत्येक पावसाळ्यापूर्वी अशा इमारतींचे / घरांचे नियमितपणे सर्वेक्षण करुन, अशी इमारत/घर अथवा इमारतीचे/घराचे बाह्य स्वरुप, मोडकळीस आलेला भाग, यावरुन सदरच्या इमारतीचा/घराचा असा भाग अथवा अशी

इमारत/घर प्रथमत: डागडुजी करुन मजबूत होत असल्यास, त्याअनुषंगाने, संबंधीतांना नोटीस देणे व सदरचे काम करवून घेणे, त्यानंतरही सदर भागाची/इमारतीची डागडुजी विहित मुदतीत केली गेली नाही तर, सदरच्या इमारतीचा भाग अथवा घर निष्काषीत करण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या वतीने केली जाते.

यासंदर्भात, महानगरपालिकेने सन २०१९ मधील पावसाळ्यापूर्वी शहरात प्रत्यक्ष सर्वेक्षणाअंती आढळून आलेल्या २९३ इमारत/घर धारकांना नोटीसा दिल्या होत्या. यापैकी १२३ इमारत/घरांच्या संदर्भात महानगरपालिकेच्यावतीने निष्कासनाची कार्यवाही पूर्ण केलेली आहे. तर, ६९ इमारत अथवा घर धारकांनी महानगरपालिकेने सुचविल्यानुसार योग्यती डागडुजी करुन, सदरच्या इमारती/घर राहण्यायोग्य तयार करण्याची कार्यवाही केली आहे. २४ प्रकरणात न्यायालयीन स्थगनादेश असल्यामुळे, कार्यवाही करण्यात आलेली नाही, तर ५९ प्रकरणातील इमारत/घर यावर अंतिमत: निष्कासनाची कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने, संबंधीतांना मुदतीच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार, शहरातील अशा इमारतींसंदर्भात, महानगरपालिकेच्यावतीने नियमितपणे कार्यवाही केली जात असल्याने, महानगरपालिकेच्या स्तरावर कोणतीही दिरंगाई झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

अशा धोकादायक इमारत/ घरासंदर्भात, कांही अनावस्था प्रसंग उद्भवल्यास, अशा इमारतीमधील नागरिकांची तात्पुरती निवासव्यवस्था महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. सद्य:स्थितीत महानगरपालिकेकडे २५० नागरिकांच्या तात्पुरत्या निवासव्यवस्थेसाठी सोय करण्याची क्षमता आहे.

-----------------------------------

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र ६९**

सर्वश्री.वैभव नाईक, नितेश राणे, महेंद्र दळवी, डॉ. भारती लव्हेकर सर्वश्री.सुनिल प्रभु, अस्लम शेख, अमिन पटेल, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड.यशोमती ठाकूर, कु.आदिती तटकरे, सर्वश्री.शेखर निकम, हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, दौलत दरोडा, सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ६९ पुढीलप्रमाणे आहे :-

""क्यार" वादळामुळे समुद्रात निर्माण झालेल्या उधाणामुळे कोकण किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये निदर्शनास येणे, विशेषत: आचरा, जामडूल, पिरावाडी (जि. सिंधुदुर्ग) रत्नागिरी जिल्हा तसेच अलिबाग, वरसोली, थळ, नवगाव, झिराड, रेवस, बोडणी, नागाव, आक्षी, रेवदंडा, थेरोंडा ( ता.अलिबाग, जि.रायगड) येथील समुद्र किनारपट्टीवरील शेतकरी व स्थानिक मच्छिमार यांचे वादळामुळे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान , किनारपट्टी परिसरातील मच्छिमारांच्या घरात पाणी शिरुन व त्यांचे मच्छिमारी जाळे तसेच ट्रालर्सखाली ठेवलेले सामान या उधाणाने वाहून जाऊन लाखो रुपयांचे झालेले नुकसान , भातशेतीत या उधाणाचे पाणी शिरून संपूर्ण भातशेतीचेही नुकसान होणे, काही ठिकाणी पंचनामे होऊन देखील नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई न मिळणे, "क्यार" वादळाच्या उधाणामुळे नुकसान झालेल्या शेतकरी, मच्छिमार व सर्वसामान्य नागरीकांना नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

---

## मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

सन २०१९ मध्ये राज्यात परतीच्या पावसास उशीरा म्हणजे दिनांक १६.१०.२०१९ पासून सुरुवात झाली. सदर कालावधीदरम्यान महाराष्ट्रात उत्तर पूर्व मान्सूनचे आगमन व अरबी समुद्रामध्ये "क्यार" व "महा" चक्रीवादळ तयार झाले. सदर चक्रिवादळामुळे निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात दिनांक १६ ऑक्टोबर २०१९ ते दिनांक ०७ नोव्हेंबर २०१९ दरम्यान मोठ्या प्रमाणावर अवेळी पाऊस झाल्याचे दिसून आले.

सदर नैसर्गिक आपत्तीमुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील जामडूल व पिरावाडी या गावांतील भातपिकाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील आचरा गावातील १२७ शेतकऱ्यांच्या १७.३९ हेक्टरवरील भातपिक क्षेत्राचे ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचे दिसून आले. माहे ऑक्टोबर- नोव्हेंबर २०१९ मध्ये झालेल्या

"क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे झालेल्या अवेळी पावसामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ०८ तालुक्यांतील ७३,४६२ शेतकऱ्यांचे ३३,२३० हेक्टर क्षेत्रावरील शेतीपिकांचे नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. तसेच रायगड जिल्ह्यामध्ये ७९ ,०१३ इतक्या बाधित शेतकऱ्यांचे २६ ,६२३ हेक्टर क्षेत्रावरील भातपिकांचे नुकसान झाल्याचे दिसून आले आहे . रत्नागिरी जिल्ह्यामध्ये ५४ ,१९७ इतक्या बाधित शेतकऱ्यांचे ११,७२४ हेक्टर क्षेत्रावरील भातपिकांचे नुकसान झाल्याचे दिसून आले आहे . सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आचरा, पिरावाडी व जामडूल गावांतील ९७ मच्छिमारांच्या जाळी, होडी तसेच खारवलेले मासे यांचे एकूण रु. ५६,६७,७७०/- एवढ्या रकमेचे नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. रत्नागिरी जिल्ह्यात सुमारे ७३ होडी/नौका तसेच १५०० मच्छिमार जाळी यांचे अंदाजे रू.१२७.२० लक्ष इतक्या रकमेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे . रायगड जिल्ह्यातील मच्छिमारांच्या नुकसानीसंदर्भात माहिती संकलित करण्याची कार्यवाही सुरू आहे . राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी/राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकष व दरानुसार बाधित आपदग्रस्तांना अनुज्ञेय मदत देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

शासन निर्णय दिनांक १८.११.२०१९ अन्वये माहे ऑक्टोबर- नोव्हेंबर २०१९ मध्ये झालेल्या "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे झालेल्या अवेळी पावसामुळे शेतीपिकाच्या नुकसानीपोटी आपदग्रस्तांना विशेष दराने मदत देण्याबाबत व विविध सवलती लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. दिनांक १८.११.२०१९ व दिनांक १३.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये कोकण विभागासाठी एकूण रु. ११०.७६ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला असून त्यापैकी सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी एकूण रु. २१.१८ कोटी, रायगड जिल्ह्यासाठी रु.१६.४७ कोटी, रत्नागिरी जिल्ह्यासाठी रु.१५.९७ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. सदर मदतीची रक्कम बाधितांना वितरित करावयाची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

**********************

सन-२०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन    लक्षवेधी सूचना

**श्री.प्रताप सरनाईक, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या सुमारे १० ते १२ लाखाच्या आसपास पोचलेली असून या शहरातील नागरिकांना महानगरपालिकेचे उत्पन्न अत्यल्प असल्याने अनेक संकटांशी सामना करावा लागते असणे, घोडबंदर किल्ला शेजारील महसूल खात्याने महापालिकेकडे वर्ग केलेली सुमारे २० एकर जमीनीवर शिवसृष्टी उभारणेकरिता अंदाजे ५० कोटी रुपयाचा खर्च अपेक्षित असणे, मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. १२२ मधील स्वर्गीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे कलादालनासाठी उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पासाठी सुमारे २५ कोटी रुपयेचा निधी, शहरातील रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठीचा निधी, परिवहन क्षेत्राकरिता लागणारा निधी, तसेच शहरामध्ये राबविण्यात येणाऱ्या मेट्रो प्रकल्पासोबतच उन्नत मार्गला एमएमआरडीए ची मंजूरी, मीरा भाईंदरच्या वेशीवर असलेल्या नाट्यगृहाचे सुशाभीकरण व अंतर्गत सजावटीकरीता मिळावयाची मंजूरी, शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्याकरिता सुर्या प्रकल्पातून मिळणाऱ्या पाणीपुरवठ्याचे काम, त्याचप्रमाणे महानगरपालिका प्रशासनाने उभारलेल्या वास्तू खाजगी ठेकेदारांच्या घशात घालण्याचा होत असलेला प्रयत्न, सी.आर.झेड. क्षेत्रामध्ये होत असलेला भराव, कांदळवनाची कत्तल झाल्याने पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास, एन.डी. झोन व आदिवासी जमीनीवर होत असलेले झोपड्यांचे अतिक्रमण, महापालिका क्षेत्रातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक केंद्राला मंजूरी मिळूनही अद्याप सुरु न झालेली बांधकाम प्रक्रिया, गेल्या १० वर्षांपासून संथ गतीने सुरू असलेले सत्र न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम, मराठा समाजासाठी मौजे नवघरे येथे छत्रपती शाहू महाराज योजनेच्या माध्यमातून प्रस्तावित वसतीगृहाचा प्रस्ताव, मुळशी कंपाउंड येथे आदिवासी वसतीगृहाचा प्रस्ताव, अशा अनेक रखडलेल्या लोकोपयोगी प्रस्तावास मान्यता व मंजूर निधी न मिळाल्याने जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, त्यामुळे प्रस्तावित मंजूर कामांना निधी मिळवून प्रस्तावित कामांना मान्यता देण्याची असलेली नितांत आवश्यकता, याकरिता शासनाद्वारे महानगरपालिकेतील विविध विभागांवर अंकुश ठेवून भ्रष्टाचार कायमचा दूर करुन गतीमान व सक्षम शासन उभारण्याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच यावर शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची स्थापना दि.२८.०२.२००२ रोजी झाली असून, लोकसंख्या सुमारे १२.०० लाख इतकी आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ला संरक्षित स्मारक म्हणून जाहीर करण्यात आलेला आहे. सदर किल्ल्याचे संवर्धन व नुतनीकरण तसेच त्या परिसरात शिवसृष्टी उभारण्यासाठी रु.५३ कोटी रकमेचा प्रकल्प अहवाल सांस्कृतिक कार्य विभागास दि.२१.०१.२०१९ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.११२ मधील स्वर्गीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे कलादालनासाठी रु.५०.९९ कोटीचा खर्च अपेक्षित आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी प्रथम टप्प्यात एमएमआरडीएने रु.१०० कोटींचे कर्ज मंजूर केले असून, सदर कामांचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत. रस्ते काँक्रिटीकरणाची कामे प्रगतीपथा[illegible]त.

मिरा-भाईंदर महानगरपालिका [illegible] उपक्रमाच्या जेएनएनयुआरएम-२ अंतर्गत मंजूर झालेल्या ८५ बसेस चालविण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून बस ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग क्र.८ (छत्रपती शिवाजी महाराज मार्ग) ते गोल्डन नेस्ट पर्यंत जोडणाऱ्या सुमारे ४ कि.मी. लांबीच्या मेट्रो-९ मार्गासोबतच नयानगर जंक्शन, कनाकिया जंक्शन व दिपक हॉस्पीटल जंक्शन व्यापणारा असे दोन उड्डाणपूल एमएमआरडीएमार्फत बांधण्यात येणार आहेत. महानगरपालिकेच्या प्लेझंट पार्क तसेच अन्य जंक्शन येथे देखील उड्डाणपूलाची सुविधा देण्याच्या विनंतीसंदर्भात सल्लागारांद्वारे संरेखनाचा अभ्यास करण्यात येत आहे. सदर काम मंजूर करण्यासाठीचा प्रस्ताव एमएमआरडीएकडे पाठविण्यात आलेला आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे महाजनवाडी येथील नागरी सुविधा क्षेत्राच्या जागेवर विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात नाट्यगृह बांधण्याचे काम विकासकामार्फत करण्यात येत आहे. सदर इमारतीच्या कामात नमूद अंतर्गत सजावट व सोयीसुविधांबाबत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

मिरा-भाईंदर शहरासाठी जलसंपदा विभागाकडून १०० द.ल.लि. प्रतिदिन व एमएमआरडीएकडून ११८ द.ल.लि. असे एकूण २१८ द.ल.लि. पाणी आरक्षित आहे. एमएमआरडीएने वसई-विरार व मिरा-भाईंदर महानगरपालिकेसाठी सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना हाती घेतलेली असून, सदर योजनेचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या भाईंदर (पू) येथील आरक्षण क्र.२१८ या जागेवरील कम्युनिटी हॉल व मिरा रोड (पू.) येथील आरक्षण क्र.२३१ या जागेवरील मार्केट व कम्युनिटी हॉल या इमारतींच्या संचलन, देखभाल व दुरुस्तीचे काम ई-निविदा प्रक्रिया अवलंबून कंत्राटदारास देण्यात आले होते. तथापि, याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी विचारात घेऊन सदर करार रद्द करण्यात आलेला आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात माती भराव/बांधकाम साहित्य डेब्रिज रोखण्याकरिता प्रभाग अधिकारी यांचे नियंत्रणाखाली माती भराव पथक नेमण्यात आलेले असून, सदर पथक दररोज शहरात गस्त घालणे, माती भराव झाल्याची ठिकाणी शोधणे व त्यावर उपाययोजना करण्याची कामे करते.

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियंत्रण समिती गठित केली असून, समितीच्या दर महिन्याला होणाऱ्या बैठकीत या विषयाबाबतच्या तक्रारींचे निरसन केले जाते. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली उप समिती गठित केली आहे. त्यांचेकडे कांदळवन ऱ्हासाची तक्रार प्राप्त झाल्यास स्थळ पाहणी करून तक्रारीत तथ्य आढळल्यास संबंधित व्यक्तीवर पर्यावरण संरक्षण अधिनियमानुसार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येते.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एन.डी.झोन व आदिवासी जमिनींवर होत असलेले अतिक्रमण संबंधित प्रभाग अधिकारी त्यांच्या पथकासह पोलीस संरक्षणात काढून टाकतात. सन २०१८-१९ मध्ये एकूण ३,१५४ इतकी बांधकामे निष्कासित केलेली आहेत, तर २४८ कच्च्या व १४ पक्क्या झोपडीधारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र व बहुउद्देशीय इमारत बांधण्यास महासभेने मंजुरी दिली आहे. यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने रु.१४.५० कोटीच्या मर्यादेत तत्वत:मान्यता दिलेली आहे. तथापि, अद्याप यासाठी जागा निश्चित झालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

मिरा-भाईंदर येथे दिवाणी व फौजदारी इमारत बांधण्यासाठी विधि व न्याय विभागाने रु.१२.४९ कोटी रकमेस मंजुरी दिलेली आहे. आतापर्यंत या कामावर जवळपास रु.१० कोटी इतका खर्च झालेला असून, सदर काम प्रगतीपथावर आहे.

महानगरपालिकेत भ्रष्टाचाराच्या बाबतीत तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची अतिरिक्त आयुक्त यांचेमार्फत चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. भ्रष्टाचार कमी करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ते फलक महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर लावलेले असून, दरवर्षी दक्षता पंधरवडा साजरा करण्यात येतो.

*******

लक्षवेधी सूचना

डॉ. पंकज भोयर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा ~~परिषद~~ नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:

" वर्धा जिल्ह्यातील पिंपरी (मेघे), बोरगाव (मेघे), सावंगी (मेघे), सिंदी (मेघे), वरुड, आलोडी, नालवाडी, कारला, सावडा व मसाळा इत्यादी गावांकरिता प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस शासन निर्णय क्र. ग्रा.पा.३४०/प्र.क्र.१०४/पापु-१३, दिनांक २०.०७.२००५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असणे या गावांकरिता भीषण टंचाई विचारात घेता ७० लिटर दरडोई या दराने प्रतिदिनी पाणीपुरवठा योजनेस मंजूरी मिळाल्याचे निदर्शनास येणे, या ग्रामीण परिसरातील नागरिकांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून मात्र ग्रामीण दराऐवजी ग्रामीण दरापेक्षा जास्त असलेले शहरी दर आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, या परिसरातील पिंपरी (मेघे), गावातील ज्येष्ठ नागरिक श्री. राठोड यांनी जिल्हा ग्राहक न्यायमंच यांचेकडे दाद मागितल्यानंतर श्री. राठोड यांच्या बाजूने जिल्हा ग्राहक न्यायमंचाने निर्णय दिला असल्याचे निदर्शनास येणे, या निर्णयाविरुध्द महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिल्ली राष्ट्रीय आयोगाकडे दोन वेळा अपील केल्याची बाब निदर्शनास येणे, दिल्ली राष्ट्रीय आयोगाने राज्य ग्राहक आयोगाचा निर्णय कायम केल्याची बाब निदर्शनास येणे, त्यांच्या आदेशास अनुसरून जीवन प्राधिकरणाकडून फक्त श्री. राठोड यांनाच रु. ५.२५ दराने बिल आकारण्यात येणे व पिंपरी (मेघे) व इतर १३ गावांकरिता पाणी पुरवठा योजनेचे नाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना असे करून या ग्रामीण परिसरातील नागरिकांकडून पाण्याचे बील शहरी दराने आकारण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी पिंपरी (मेघे) व इतर १३ गावांतील व त्या परिसरातील नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे, अशाप्रकारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून वर्धा जिल्ह्यातील वर उल्लेखित गावे व त्या परिसरातील नागरिकांना ग्रामीण दराने पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता असणे, याबाबत स्थानिक आमदार यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २५ मे, २०१९ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या या धोरणाबाबत तक्रार करणे, त्यावर मा. मुख्यमंत्री यांनी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना ग्रामीण भाग असल्याने ग्रामीण दरानेच पाणी दर आकारण्याचे निर्देश देणे परंतू, अजूनपर्यंत याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून या ग्रामीण भागातील नागरिकांना वाढीव दरानेच पाणी बील

आकारण्यात येणे, याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत सदर बाबींची गंभीर दखल घेऊन तातडीने ग्रामीण दराने पाणी बील आकारण्याकरिता कार्यवाही करण्याची आवश्यकता व उपाययोजना."

**मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता )यांचे निवेदन**

पिंपरी मेघे व ९ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस शासन दि.२०.७.२००५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर योजना दरडोई/दरदिवशी ७० लिटर प्रमाणे आखण्यात आली आहे. या योजनेत ११ गावांचा समावेश असून, ही गावे वर्धा शहराच्या लगतची असून या गावांचे शहरीकरण झाल्यासारखे आहे.

सदर गावांची सन २०११ मधील एकूण लोकसंख्या १,२४,३९३ इतकी आहे. सदर योजना ही निमशहरी भागातील (PeriUrban) असल्यामुळे नळ ग्राहकांना ७० LPCD या शहरी भागातील निकषानुसार पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे त्यांना ग्रामीण दराऐवजी निमशहरी दराने पाणीपट्टी देयके महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून आकारण्यात येत आहे. सदर योजना स्वयंसंतुलीत होण्यासाठी याबाबतची पाणीपट्टी आकारणी करून त्या वसुली करण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची असल्याचे प्रशासकीय मान्यतेच्या दिनांक २०.०७.२००५ च्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून दिनांक २९.०६.२००५ रोजी ठराव पारित करण्यात आलेला असून त्यामध्ये योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने राबविल्यास व योजनेसाठी लागणारा देखभाल दुरुस्तीचा खर्च पाणीपट्टीद्वारे वसूल करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

पिंपरी मेघे या गावातील नागरीक श्री वासुदेव पांडूरंग राठोड यांनी दि.३०.६.२०११ नुसार मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच, वर्धा यांचेकडे ग्रामीण भागाचे पाणी पुरवठा योजनेच्या दराने देयके द्यावीत (रु.५.२५ प्रती हजार लिटर्स प्रमाणे) असा दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल दि.१५.९.२०११ ला मा. जिल्हा ग्राहक तक्रार न्यायमंच वर्धा यांनी खालील प्रमाणे दिलेला आहे.

१) ग्रामिण दरानुसार देयके द्यावीत व जास्तीची वसुल रक्कम परत करावी.

२) मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई रु.५००/-

३) तक्रारीचा खर्च रु. ५००/-

सदर निकाल मजीप्राच्या हिताचा नसल्यामुळे मजीप्रा विभाग, वर्धा मार्फत सदर निकालाचे विरोधात मा. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, नागपूर यांचेकडे प्रथम अपिल क्र.A/११/४६९ दि.१३.१०.२०११ नुसार दाखल केलेले होते. सदर अपिलावर मा. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, नागपूर यांनी त्यांचा अंतिम आदेश दि. १५.३.२०१७ नुसार सदर अपील खारीज केले व त्यामुळे मा. केंद्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग, नवी दिल्ली यांचेकडे दुसरे अपील (Revision petition No. १३४६/२०१७) दाखल करण्यात आले.

मा. केंद्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग, नवी दिल्ली यांनी दि.०५.०९.२०१७ रोजी सुनावणी घेऊन सदर प्रकरण नव्याने पुनर्निर्णयाकरीता मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्याय मंचाकडे परत पाठविण्यात येऊन दरम्यानचे कालावधीत तक्रारकर्त्यास रु.५.२५ प्रती हजार लिटर्स या दराने देयके आकारण्याविषयी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्याय मंचाने आदेशीत केलेले असल्यामुळे सदर ग्राहकास रु.५.२५ प्रती हजार लिटर्स या दराने पाणी देयके आकरण्यात येत आहे. सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ट असून यावर ग्राहक मंचाद्वारे अंतिम निकाल लागावयाचा आहे.

मा.आमदार डॉ.पंकज राजेश भोयर यांनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २०.५.२०१९ रोजी सादर केलेल्या निवेदनान्वये पिंपरी मेघे प्रादेशिक योजनेतील सर्व ग्राहकांना ग्रामीण पाणी कराचे दरानुसारच आकारणी करण्याची मागणी केलेली आहे.

ग्रामीण योजनांना पाणी पुरवठा करण्याचे निकष ४० लिटर दरडोई प्रतिदिन आहे. तथापि पिंपरी मेघे व १० गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेंतर्गत समाविष्ट गावे निमशहरी स्वरुपाची असून, त्यानुसार ७० लिटर दरडोई प्रतिदिन या दराने पाणी पुरवठा करण्यासाठी शासनाकडून मान्यता प्राप्त झालेली आहे व त्यानुसार योजनेत समाविष्ट करण्यात आलेल्या गावांना ७० लिटर दरडोई प्रतिदिन या दराने पाणी पुरवठा करण्यात येतो. सदर योजनेची स्वयंसंतुलीत पाणीपट्टी बसवून ती ग्राहकांकडून घेण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर आहे. सदर योजना स्वयंसंतुलित होणे आवश्यक असल्याने सदर भागात ग्रामीण दराने देयके आकरणी संयुक्तिक होणार नाही. तरी सुध्दा ग्रामीण दराने देयके आकारल्यास योजनेची आकारणी व वसुलीची आकारणी अंदाजे खालीलप्रमाणे असेल.

आकडेवारी रुपये लक्ष मध्ये

| अपेक्षीत आकारणी | अपेक्षीत वसूली | अपेक्षीत खर्च | नफा / तोटा |
|---|---|---|---|
| ३३०.०० | २५०.०० | ३२१.०० | तोटा ७१.०० |

फक्त पिंपरी मेघे पाणी पुरवठा योजनेतील ग्राहकांना सुधारित कमी दराने पाणी देयकाची आकारणी केल्यास, इतर ग्रामीण भागातील ग्राहकांवर अन्याय ठरेल व दर कमी करण्याची मागणी त्यांच्याकडून होऊ शकते. म्हणून पिंपरी मेघे ग्रामीण पाणी पुरवठा योजनेद्वारे आकारण्यात येणारा दर वाजवी असून त्यात कपात करणे योग्य होणार नाही.

******************

**महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०१९ च्या चौथ्या अधिवेशनातील महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना.**

**<u>लक्षवेधी सुचना क्रमांक- ६४१</u>**

**श्रीमती यामिनी जाधव व श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे:-**

"मुंबई शहरातील रफि अहमद किडवाई मार्ग, ॲण्टॉप हिल, धारावी कुर्ला आणि डोंगरी या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी दिनांक ०४.१२.२०१९ रोजी छापा टाकून पाच बोगस डॉक्टरांना अटक करणे अशाप्रकारे मुंबईतील स्लम विभागात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट असणे, किमान शैक्षणिक अर्हता नसतानाही वैद्यकिय व्यावसाय करुन हे डॉक्टर गोरगरीब रुग्णाच्या जिवाशी खेळत असणे, ह्या बोगस डॉक्टरांच्या अटकेनंतर शहरात एकच खळबळ माजून घबराटी वातावरण पसरणे, शासनाने ह्याबाबत एक विशेष मोहीम रागवून अशा बोगस डॉक्टराचा शोध घेऊन बंदोबस्त करण्याची आवश्यकता यावर शासनो तांतडीने केलेली कारवाई व उपाययोजना"

---

**मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन पुढीलप्रमाणे**

मुंबई शहरातील बोगस वैद्यकीय व्यवसायीकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय दिनांक ०५.१२.२००१ अन्वये पोलीस आयुक्त मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्विलोकन समिती गठीत करण्यात आली आहे. यानुसार, बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई या शाखेमार्फत आरोग्य विभाग महानगरपालिका मुंबई, संबंधित पोलीस ठाणे यांच्याशी समन्वय साधुन व नियोजन करुन बृहन्मुंबईतील बोगस वैद्यकीय व्यवसायीकांचा शोध घेऊन त्यांच्याविरुध्द प्रचलित कायद्यांअन्वये कारवाई करण्यात येते.

याअनुषंगाने रफि अहमद किडवाई मार्ग पोलीस ठाणे, ॲण्टॉप हिल पोलीस ठाणे, धारावी पोलीस ठाणे, कुर्ला पोलीस ठाणे, डोंगरी पोलीस ठाणे, मुंबई यांच्या हद्दित आढळून आलेल्या प्रत्येकी एक याप्रमाणे पाच बोगस वैद्यकीय व्यवसायीकांविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३३६, ४१९, ४२० अन्वये दिनांक ०४.१२.२०१९ रोजी संबंधित पोलीस ठाण्यात प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला असून सदरहू बोगस वैद्यकीय व्यवसायीकांना अटक करण्यात आली होती. त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही संबंधित पोलीस ठाण्याकडून करण्यात येत आहे.

सन २०१५ ते ऑक्टोबर २०१९ या कालावधीत बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यकक्षेत बोगस वैद्यकीय व्यवसायीकांसंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने ८४ बोगस व्यवसायीकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

*************************************************************************************

------

<u>सन २०१९ चे चौथे (हिवाळी अधिवेशन)</u>

**लक्षवेधी सूचना**

**सर्वश्री.मोहन मते, मिहिर कोटेचा, अबू आजमी, रईस शेख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"चुनाभट्टी (मुंबई) येथे दारुच्या नशेत भरधाव कार चालवून वाहनचालकाने तीन तरुणींना धडक दिल्याची दुर्घटना दि.०७ डिसेंबर, २०१९ रोजी झालेली दुर्घटना, या दुर्घटनेत एका निष्पाप तरुणीचा झालेला दुदैवी मृत्यू, पोलिस आणि सरकारतर्फे वारंवार करण्यात येणारी जनजागृती, तसेच राज्यभर राबवण्यात येणारी ई-चलान पध्दत याचा काहीच परिणाम वाहनचालकांवर दिसून न येणे, वाहतुकीचे नियम मोडणा-यांची संख्या दिवसागणिक कमी होण्याऐवजी वाढतच असल्याचे दिसून येणे, राज्यात सिग्नल तोडणे, वाहन चालवताना मोबाइलवर बोलणे, दारु पिऊन वाहन चालवणे, हेल्मेटशिवाय दुचाकी चालवणे असे विविध प्रकारचे नियमभंग करणा-यांची संख्या माहे जानेवारी २०१९ ते नोव्हेंबर २०१९ या कालावधीत दोन कोटी ९२ लाखांच्या घरात पोहोचलेली असणे, सन २०१८ मध्ये पूर्ण वर्षात हा आकडा एक कोटी सात लाख इतका असणे, नियम मोडणा-यांमध्ये दहा महिन्यांतच दुपटीपेक्षा अधिक वाढ झाली असणे, वाहतुकीच्या नियमांचे पालन होत नसल्याने अपघातांची संख्या वाढणे, त्यामुळे नियम पाळावेत, यासाठी वाहतूक पोलिसांकडून नुकतीच ई-चलान मोहीम राज्यभर सुरु करण्यात येणे, याचा धसका घेत तरी वाहनचालक नियमांचे पालन करतील, अशी अपेक्षा असणे, मात्र उलट नियम मोडणाऱ्यांची संख्या वाढतच असल्याचे निष्पन्न होणे, वाहनांवर लावण्यात येणाऱ्या वेगवेगळया प्रकारच्या हॉर्नमुळे ध्वनीप्रदूषण होत असल्याने अनेक हॉर्नवर बंदी घालण्यात येणे, तरीदेखील वेगवेगळया प्रकारच्या म्युझिकल आणि रिव्हर्स हॉर्न वापरण्याचे प्रमाण तरुणांमध्ये दिवसेंदिवस वाढत असणे, परिणामी वाहनचालक बेदरकारपणे वाहन चालवीत असल्याने राज्यातील रस्ते अपघातात वाढ होवून अनेक निष्पाप नागरिकांचे निष्कारण जात असलेले बळी, त्यामुळे सामान्य नागरिकांत निर्माण झालेले भीतीचे वातावरण, यास्तव राज्यात वाहनचालकांकडून होत असलेल्या नियमभंगावर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

<u>**मा. गृहमंत्री यांचे निवेदन**</u>

मुंबईतील चुनाभट्टी येथे मद्यपान करुन व भरधाव कार चालवून वाहनचालकाने तीन तरुणींना धडक दिल्याच्या दुर्घटने प्रकरणी दि.०७ डिसेंबर, २०१९ रोजी चुनाभट्टी (मुंबई), पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३१५/१९ कलम २७९, ३०४(२), ३४ भा.दं.वि. सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १८५, १८८, १३४(अ) (ब) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर दुर्घटनेत एका तरुणीचा मृत्यू झाला असून घटनेशी संबंधीत ३ आरोपींना अटक करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर आरोपी न्यायालयीन कोठडीत असून गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.

मुंबई शहरातील वाढती लोकसंख्या तसेच बाहेरुन येणाऱ्या कामगार / कर्मचारी / प्रवासी यांची संख्या जास्त आहे. मुंबई शहरामध्ये वाहनांची संख्या ३६ लाखापेक्षा जास्त झाली असून त्यामध्ये दररोज नविन ८०० वाहनांची भर पडत आहे. राज्यातील वाहतुक पोलीसांचे आधुनिकीकरण करणे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणा-या वाहन चालकावर मोटार वाहन कायदा-१९८८ अन्वये अंमलबजावणी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन राज्यात माहे डिसेंबर, २०१६ पासून ई-चलान प्रकल्प लागू करण्यात आला आहे.

राज्यामध्ये सन २०१८ या पुर्ण वर्षात व माहे जानेवारी २०१९ ते नोव्हेंबर २०१९ या कालावधीत सिग्नल तोडणे, वाहन चालवताना मोबाइलवर बोलणे, दारु पिऊन वाहन चालवणे, हेल्मेटशिवाय दुचाकी चालवणे, आणि इतर वाहतुक नियमन उल्लंघनाच्या झालेल्या गुन्हा नोंद व त्यानूसार दंड वसुली, तसेच मोटर वाहन अपघांताबाबतचा एकुण तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | एकुण गुन्हा नोंद संख्या | एकुण दंड वसुली रक्कम | एकुण मोटर वाहन अपघांताची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सन २०१८ | १,०७,२८,११९ | २०९,२४,८२,९८२/- | ३२४९३ |
| २ | माहे जानेवारी २०१९ ते माहे नोव्हेंबर २०१९ | १,२४,२९,४७५ | ३७३,१३,४७,६८५/- | ३००८० |

राज्यातील विविध वाहतुक विभागांना ९६ सुसज्य इंटरसेप्टर वाहनांचे वाटप करण्यात आलेले असून सदर वाहनांद्वारे कसुरदार वाहन चालकांवर कारवाई करण्यात येते. तसेच अपघातांची संख्या कमी करण्यासाठी मोठ्या चौकामध्ये अत्याधुनिक सिग्नल यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आली आहे आणि वाहतुक नियमन करण्यासाठी वाहतुक पोलीसांची / अधिका-यांची संख्या वाढविण्यात आलेली आहे. वाहनांच्या मल्टीटोन हॉर्नबाबत शासनाने दिनांक ०६ जून, २०१४ च्या परिपत्रकान्वये कारवाईचे आदेश देण्यात आलेले आहेत, त्यानुसार अशा वाहनांवर कारवाई करण्यात येते. तसेच वाहतुक पंधरवडा आयोजित करण्यात येऊन याद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.

प्रामुख्याने मुंबई वाहतुक शाखेमार्फत शहरातील अपघात कमी करण्यासाठी अत्याधुनिक सिग्नल यंत्रणा, जंक्शन मॅनेजमेंट, जनजागृती कार्यक्रमाचे अयोजन, पादचाऱ्यांना रस्ता क्रॉसींगकरीता विशेष सुविधा, वाहतुकविषयी शालेय विद्यार्थ्यांना शिक्षण, अभियांत्रिकी उपाययोजना, सी.सी. टिव्हीद्वारे निगराणी, ई-चलान, Speed Detector With Automatic Number Plate Recognization Camera (ANPR Camera), अत्याधुनिक ब्रेथ ॲनालायझर मशिन्सचे मदतीने ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह मोहिम राबविण्यात येत आहे.

अशाप्रकारे ई-चलान मशीन व इंटरसेप्टर वाहनांद्वारे कारवाई करण्यात येत असल्यामुळे व वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत समाजात जनजागृती करण्यात आल्यामुळे मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षीच्या अपघातामध्ये घट झाल्याचे निदर्शनास येत आहे. नागरिकांना सी.सी.टी.व्ही. / स्पीड डिटेक्टरद्वारे केलेल्या पुराव्या आधारीत ई-चलान कारवाईमुळे जागरुकता व त्याचे वाहन चालविण्याच्या वर्तनात सकारात्मक परिवर्तन दिसून येत आहे.

-------------------

H-४९०-१२७.

लक्षवेधी सुचना गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा
सन २०१९ चे (हिवाळी)अधिवेशन

**श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे.

"मरोळ अंधेरी (मुंबई), येथील, मंगल्य साफल्य इमारतीतील, एका कॉल सेंटरवर, एमआयडीसी पोलिसांनी दिनांक २७.११.२०१९ रोजी छापा घालून १९ जणांना अटक करण्यात आल्याची घडलेली घटना, सदरहू कॉल सेंटरमधून अमेरिकेतील ४ हजार ग्राहकांची सुमारे १० कोटी रूपये फसवणूक केल्याची धक्कादायक बाब उघड होणे, सदर प्रकरणातील मुख्य सुत्रधारासह ४ व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना अटक करणेबाबत पोलिसांना आलेले अपयश, क्रेडिट स्कोअर कमी असल्याने कर्ज मिळवण्यासाठी अडचणी येत असणे, अशा ग्राहकांना शोधून त्यांना वित्त संस्थेंचे कर्ज मिळवून देण्याच्या नावाखाली त्यांची आर्थिक फसवणूक करण्यात येणे, सदरहू कंपनीतर्फे अलरिफ ट्रेडिंग प्रा.लि. या कंपनीचे नाव सांगून ग्राहकांना, "कॅश मी ऑन" या संकेतस्थळावर नोंदणी करण्यात सांगण्यात येणे, त्यामुळे या ग्राहकांची सर्व माहिती कॉल सेंटरकडे जमा होत असणे, कर्ज मंजुरीसाठी या ग्राहकांकडून रद्द झालेले धनादेश घेण्यात येत असल्याने, हे धनादेश सॉफ्टवेअरच्या मदतीने बदलुन घेतले जात असल्याने, बदलेल्या धनादेशाचा अधार घेत सदरहू टोळी ग्राहकांच्या खात्यातुन पैसे काढून ते दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात वळते करत असणे, अशा पद्धतीने वॉलमार्ट कार्ड, ई बे कार्ड, गेम्स टॉप्स, सीफोरा, टार्गेट आदी कंपन्यांचे गीफ्ट कार्ड खरेदी करुन रक्कम वळती करुन आर्थिक गैरव्यवहार करण्यात येणे, यामुळे आशा पद्तीने दरमहा ५०० नागरिकांचे १ कोटी रुपये लुटून आर्थिक घोटाळा केल्याचे आढळून येणे, यामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमणात होत असलेले आर्थिक नुकसान, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन, वाढते ऑनलाईन घोटाळे रोखण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही , उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया "

---

## मा.गृह मंत्री यांचे निवेदन

सदर गुन्ह्यातील आरोपीतांनी आपआपसात संगनमत करुन बेकायदेशीररित्या व्हिपीएन सिस्टिमचा वापर करुन कॉल सेंटर चालवून परदेशी इसमाना कर्ज मंजुर करुन देतो, अशी बतावणी करुन, बेकायदेशीररित्या विश्वास संपादन करुन परदेशी नागरिकांचे बँकेचे पर्सनल लॉगिन आयडी, पासवर्ड किंवा एटीएम क्रमांक, पिन क्रमांक व विवो आयडी प्राप्त करुन घेतले. त्यांच्या चेकच्या प्रती प्राप्त करुन सदर चेकवर इलेक्ट्रीक माध्यमातून बनावट स्वाक्षऱ्या करुन त्यावर फेरफार करुन सदरचे चेक बँक खात्यामध्ये ऑनलाईन सादर करुन इतर बँकाचे कर्ज मंजुरीचे बनावट पत्र बनवून परदेशी नागरिकांची फसवणूक केली म्हणून एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, येथे गु.र.क्र. ५४१/२०१९ भा.दं.वि. कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ सह कलम ६६ (ब), ६६

रोटा/मुद्रा e11C E५०-१-२०२०J-१ Cकृ.भा.प.

(क), ७२ (१), ७५ माहिती तंत्रज्ञान अधिनियम सह कलम २५ (अ) इंडियन टेलीग्रॉफ ॲक्ट अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात १९ आरोपींना अटक करण्यात आली असून दिनांक १.१२.२०१९ रोजी त्यांना न्यायालयीन कोठडी मिळालेली होती. सद्यस्थितीत मा. न्यायालयाने त्यांना दिनांक १०.१२.२०१९ रोजी जामिनावर मुक्त केले आहे. या गुन्ह्यातील ५ पाहिजे आरोपीतांचे सी.डी.आर. काढण्यात आले असून त्यांचा तपास सुरु आहे.

**************

# महाराष्ट्र विधानसभा

# सन २०१९ चे चौथे(हिवाळी)अधिवेशन

सर्वश्री विजय वडेट्टीवार,अस्लम शेख, ॲड यशोमती ठाकुर , सर्वश्री सुनिल केदार, कुणाल पाटील, अमित झनक, अमित देशमुख, प्रा.वर्षा गायकवाड, श्री. सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री रणजीत कांबळे, राजू पारवे,विकास ठाकरे, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, ॲड आशिष शेलार, सर्वश्री अतुल भातखळकर, जयकुमार रावल, विकास कुंभारे, गोवर्धन शर्मा, कॅप्टन आर.तमिल सेल्वन, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, मंदा म्हात्रे, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, मोहन मते,.मंगेश कुडाळकर, अबू आझमी, डॉ.राहुल पाटील, श्री.प्रशांत ठाकुर, ॲड. पराग अळवणी, श्री. संजय केळकर, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री किसन कथोरे, वैभव नाईक, सुनिल प्रभू, ज्ञानराज चौगुले,सुनिल राऊत, अजय चौधरी ,राम सातपुते,डॉ.भारती लव्हेकर,विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वय उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात मोठ्या प्रमाणात कांदाटंचाई सुरु असून दिवसेंदिवस बाजारभावामध्ये वाढ होत असल्याचे माहे डिसेंबर २०१९ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, किरकोळ बाजारात १०० ते १७० रुपये किलो दराने कांदा विकला जात असल्याने दैनंदिन गरजेचा असलेला कांदा सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेलेला असणे,अन्न पदार्थांच्या भावामध्येही वाढ झालेली असणे, कांद्याची किंमत योग्य प्रमाणात ठेवण्यास प्रशासनास आलेले अपयश, शेतक-यांना कांद्याचा योग्य भाव मिळवून देणे व त्याच बरोबर ग्राहकांना योग्य किमतीत कांदा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात प्रशासनाकडे कोणतेही नियोजन नसल्याचे उघडकीस येणे, सदर भाववाढीमुळे घरातील आर्थिक गणित कोलमडलेले असल्यामुळे गृहिणींमध्ये तणावाचे वातावरण पसरलेले असणे, कांद्याचे भाव आवाक्यात ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची लोकप्रतिनीधी तसेच सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ४ डिसेंबर २०१९ तसेच वारंवार मागण्या केलेल्या असणे, शेतक-यांना कांदा पिकांचा योग्य मोबदला मिळावा तसेच ग्राहकांनाही योग्य किंमतीत कांदा उपलब्ध करुन देण्यासाठी कायम स्वरुपी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता असणे, साठेबाज व्यापा-यांवर धाडी टाकून कांदा खुल्या बाजारात विक्रीसाठी आणण्याची कारवाई, राज्य शासनाने करणे अपेक्षित असणे, मात्र त्याबाबतीत शासन कोणतीही कृती करीत नसणे याबाबत प्रशासनाचे हेतूपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया,

---

## मा. मंत्री(पणन) यांचे निवेदन

महाराष्ट्रातील कांदा हे महत्वाचे नगदी पिक असून ते राज्यामध्ये खरीप,लेट खरीप, रब्बी हंगामात घेतले जाते. राज्यामध्ये कांदा उत्पादन हे प्रामुख्याने नाशिक, अहमदनगर, पुणे व सोलापूर घेतले जाते. महाराष्ट्रातील कांदा हे महत्वाचे नगदी पिक असून त्याला मिळणारा भाव हा कांदा उत्पादक शेतक-यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व जिव्हाळ्याचा भाग आहे. देशातील कांदा उत्पादन, त्याची देशांतर्गत मागणी व देशातून होणारी निर्यात इ. बाबींचा परिणाम बाजारपेठेतील कांद्याच्या दरावर होत असतो.

सर्वसाधारणपणे रब्बी हंगामातील साठवणूक केलेल्या कांद्याची आवक कमी होत असताना, खरीप हंगामातील कांदा नोव्हेंबर महिन्यात बाजारात येतो. परिणामी, कांद्याचे बाजारातील भाव स्थिर होण्यास मदत होते. परंतु,चालू वर्षी सुरुवातीला लांबलेल्या व नंतर अवकाळी पावसामुळे खरीप कांद्याच्या

उत्पादनावर तसेच लेट खरीप कांद्याच्या लागवडीवरही प्रतिकूल परिणाम झाला आहे. इतर राज्यातही खरीप कांद्याच्या उत्पादनावर अवकाळी पावसाचा परिणाम झालेला असल्याने बाजारात अत्यंत कमी प्रमाणात कांद्याची आवक झालेली आहे. त्यामुळे मागणीच्या प्रमाणात पुरवठा कमी होत असल्याने बाजारातील घाऊक व किरकोळ दरात वाढ झालेली आहे. नोव्हेंबर महिन्याच्या शेवटी घाऊक बाजारातील कांद्याचा दर रुपये ५०- ७० प्रति किलो होता, त्यावेळी किरकोळ बाजारातील कांद्याचा दर रुपये ८०- १०० प्रति किलो इतका होता.

घाऊक बाजारात शेतक-यांकडून व्यापा-यांनी खरेदी केलेल्या कांद्याची किरकोळ बाजारपेठेत विक्री करीत असताना त्यामध्ये कांद्याची प्रतवारी करणे,पॅकेजिंग करणे,वाहतूक,मजूरी व हमाली इ.खर्चाचा समावेश होत असल्याने घाऊक बाजारातील दरापेक्षा किरकोळ बाजारातील कांद्याचे दर चढे असतात.

केंद्रशासनाने दिलेल्या निर्देशानुसार, ग्राहकांना माफक दरात कांदा उपलब्ध व्हावा यासाठी ज्या जिल्हयांमध्ये कांदा,बटाटा व टोमॅटो या शेतमालाचे उत्पादन आणि आवक आहे अशा जिल्हयातील सर्व बाजार समित्यांनी आणि विशेषत: नाशिक, अहमदनगर, सोलापूर, पुणे ,कोल्हापूर, सातारा, ठाणे व मुंबई या जिल्हयातील बाजार समित्यांनी पुढील सूचनांपर्यंत शासकीय, सार्वजनिक आणि बाजार समित्यांच्या साप्ताहिक सुट्ट्यांच्या दिवशीही बाजार आवारे चालू ठेवून शेतमाल उत्पादक शेतकरी/व्यापारी व ग्राहक यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

केंद्रशासनाने व्यापा-यांनी कांद्याची साठवणूक करु नये म्हणून साठवणूकीचे निर्बंध (Stock Holding Limit ) घातलेले आहेत. सध्यस्थितीत ही मर्यादा घाऊक व्यापा-यांसाठी २५ मे. टन इतकी तर किरकोळ विक्रेत्यांसाठी ही मर्यादा २ मे.टन इतकी करण्यात आलेली आहे.त्यास अनुसरुन व्यापा-यांवार धाडी टाकून अवैधपणे साठा करणा-या व्यापा-यांवर कारवाई करण्याचे संबंधित जिल्हाधिका-यांना आदेश दिलेले आहेत. नाशिक जिल्ह्यातील येवला येथील दोन व्यापा-यांकडे अंदाजे ५३० क्विंटल व ५ ते ६ हजार क्विंटल कांदा शिल्लक असल्याचे दिसून आल्यानंतर सदर व्यापा-यांचे गोडाऊन सील करण्यात आले आहेत.तसेच कांदा व्यापा-यांकडे असलेली दैनंदिन कांद्याची आवक,निर्गती व शिल्लक साठ्याची जिल्हाधिकारी स्तरावरुन तपासणी करण्यात येत आहे.

राज्यात तसेच देशात कांद्याच्या दरात झालेल्या वाढीच्या अनुषंगाने केंद्र शासनाने MEIS (Merchandise Exports from India Scheme) अंतर्गतकांदा निर्यातीस निर्यातदारांसाठी दिले जाणारे १० टक्के अनुदान बंद केले आहे. तसेच स्थानिक बाजारपेठेतील दर नियंत्रीत ठेवण्यासाठी कांदा निर्यातीवरील किमान निर्यातमूल्य ८५० अमेरिकन डॉलर्स प्रति मेट्रीक टन एवढे निश्चित केले आहे. त्याचप्रमाणे भारतीय कांद्यावर पूर्णत: निर्यात बंदी घालण्यात आली आहे.

राज्यातील तसेच देशातील कांद्याच्या मागणी प्रमाणे पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी केंद्रशासनाने आयात केलेल्या १.२० लाख मे.टन कांद्यापैकी ११६० मे.टन प्रति आठवडा मागणीची नोंदणी राज्याने केली असून बाजारामध्ये हा कांदा आल्यानंतर कांद्याच्या दरात रूपये २० ते ३० प्रति किलो या प्रमाणात घट झाली आहे. तसेच डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये खरीप हंगामाचा कांदाही शेतकरी बाजारात आणत असल्यामुळे कांद्याच्या दरात झालेली वाढ कमीकमी होत आहे.

—*****—

H 917-1a-

# महाराष्ट्र विधानसभा

**सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्रमांक ५१**

श्री. अनिल बाबर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५१ पुढीलप्रमाणे आहे:-

"माहे ऑक्टोबर, २०१९ च्या सुमारास कोल्हापूर, सांगली जिल्ह्यात आलेला महापूर, या महापूरामुळे येथील शेतकऱ्यांच्या द्राक्ष व डाळिंबे या फळबागा तसेच ऊस व अन्य शेतीपिकांचेही अतोनात नुकसान होणे, त्यांना पिक विम्याचेही संरक्षण न मिळाल्याने या शेतकऱ्यांवर ओढवलेले आर्थिक संकट, या नैसर्गिक आपत्तीमुळे कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील शेतकरी व नागरिक देशोधडीला लागणे, अशा प्रकारे वारंवार नैसर्गिक आपत्तीला तोंड द्यावे लागत असल्याने तेथील शेतकऱ्यांनी द्राक्ष व डाळिंब पिकांचे संरक्षण करण्याकरिता शेडनेट (प्लास्टिक आच्छादन) करण्याकरिता नविन योजना तयार करुन अनुदान देण्याची शेतकऱ्यांकडून वारंवार होत असलेली मागणी, परिणामी शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

## मा. मंत्री (कृषि) यांचे निवेदन

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर २०१९ मध्ये झालेल्या अवेळी पावसामुळे सांगली जिल्ह्यात एकूण १०९५६९ हेक्टर शेती पिके व फळपिके क्षेत्र बाधित झालेले आहे. तसेच कोल्हापूर जिल्ह्यात एकूण १५८५ हेक्टर शेती पिके व फळपिके क्षेत्र बाधित झालेले आहे.

उपरोक्त बाधित क्षेत्रापैकी सांगली जिल्ह्यात द्राक्ष व डाळिंब या फळपिकांचे अनुक्रमे १८१६१ हेक्टर व २०६३ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे व ऊस पिकाचे ८२१ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. तसेच कोल्हापूर जिल्ह्यात द्राक्ष व डाळिंब या फळपिकाचे अनुक्रमे ४४ हेक्टर व १ हेक्टर क्षेत्र बाधित झाले व ऊस पिकाचे ४७ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे.

बाधित झालेल्या क्षेत्राचे पंचनामे करण्यात आले असून महसुल व वन विभागाच्या शासन निर्णय क्र. सीएलएस-२०१९/प्र. क्र. १९१/म-३, दि. १८ नोव्हेंबर, २०१९ नुसार शेतीपीकांसाठी रु.८०००/- प्रति हेक्टर व बहुवार्षिक फळपीकासाठी रु. १८०००/- प्रति हेक्टर या विशेष दराने मदत देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

उपरोक्त बाधित क्षेत्राकरिता महसुल व वन विभागाचा शासन निर्णय क्र. एससीवाय-११/२०१९/ प्र. क्र. ८१/म-११, दि. १९ नोव्हेंबर, २०१९ अन्वये रक्कम रुपये २०५९.३७ कोटी व शासन निर्णस क्र. सीएलएच-२०१९/प्र. क्र. १९१/म-३, दि. १३ डिसेंबर, २०१९ अन्वये रु. ४५००/-कोटी अशा एकूण रुपये ६५५९.३७ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिलेला असून मदत वाटपाची कार्यवाही महसुल विभागामार्फत करण्यात येत आहे.

आंबीया बहार २०१९-२० करीता द्राक्ष पिकासाठी प्रति हेक्टरी रु. ४,१०,६६७/- व डाळींब पिकासाठी प्रति हेक्टरी रु. १,६१,३३३/- विमा संरक्षण देण्यात आलेले आहे. द्राक्ष व डाळींब पिकासाठी मृग बहार सन २०१९ मध्ये कोल्हापुर जिल्ह्यामधुन या योजनेत कोणीही सहभाग घेतलेला नाही.

या योजनेतंर्गत मृग बहार सन २०१९ अंतर्गत सांगली जिल्ह्यातील एकूण २३७८४ शेतकऱ्यांनी डाळींब फळपिकासाठी विमा घेतला आहे. डाळींब या फळपिकांचा विमा संरक्षण कालावधी दि. १५ जुलै २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ असा असून अद्याप विमा संरक्षण कालावधी अद्याप संपलेला नसल्याने विमा कंपनी मार्फत नुकसान भरपाई अद्याप शेतकऱ्यांना देण्यात आलेली नाही. आबींया बहार सन २०१९-२० सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील डाळींब व द्राक्ष फळपिकासाठी एकूण १०६२३ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला आहे.

नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करण्यासाठी द्राक्ष बागांवर पॉलीशीट उभारणीसाठीची योजना तयार करावी असे निवेदन महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ यांनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. अप्पर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांना दिले होते. त्याअनुषंगाने दि. २३ डिसेंबर २०१४ रोजी झालेल्या बैठकीत मा. अप्पर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांनी दिलेल्या सूचनेनुसार नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी द्राक्ष बागांवर उभारलेल्या पॉलीशीटची पाहणी करुन द्राक्ष पिकांचे अवेळी पाऊस, गारपीट इत्यादी नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करुन द्राक्ष बागांचे नुकसान टाळण्यासाठी द्राक्ष बागांवर पॉलीशीट उभारणीच्या योजनेचा प्रस्ताव संचालक फलोत्पादन, पुणे यांचेकडून दि. २४.०३.२०१५ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला. सदरहू प्रस्तावाच्या अनुषंगाने "अवेळी पाऊस, गारपीट इत्यादी नैसर्गिक आपत्तीपासून द्राक्ष बागांचे संरक्षण करण्यासाठी प्लॅस्टीक आच्छादन" या घटकाचा समावेश एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत करण्याबाबतची विनंती राज्य शासनामार्फत दि. ५ फेब्रुवारी २०१६ रोजी केंद्र शासनाच्या कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभागास सादर करण्यात आली. त्यास अनुसरुन केंद्र शासनाने त्यांच्या दि. ११ ऑगस्ट, २०१७ च्या पत्रान्वये १४ व्या वित्त आयोगाच्या अंतर्गत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानासाठी मार्गदर्शक सूचना व आर्थिक मापदंड लागू करुन अतिशय कमी कालावधी झालेला असल्याने या परिस्थितीत नवीन घटकांचा समावेश होवू शकत नाही, १४ व्या वित्त आयोगाचा कालावधी संपण्याअगोदर सदर घटकांचा समावेश करणेबाबत विचार करण्यात येईल असे कळविले आहे. तथापि, अद्यापही सदरहू प्रस्तावास केंद्र शासनाकडून मान्यता मिळालेली नाही.

-----------------------------------

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना**

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री.नितीनकुमार देशमुख, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

(ता. पातूर जि. अकोला) येथील ५ मंडळातील ९४ गावे व अकोट तालुक्यातील ७ मंडळातील, १६७ गावे दुष्काळीत घोषित करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, या दोन्हि तालुक्यातील २६१ गावाकरिता दोन्हि तहसिलदारांनी पीकनिहाय सर्वे व दुष्काळी अहवाल सादर करण्यात येवूनही या दोन्हि तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी अद्यापही मदतीपासून वंचित राहणे. याबाबत शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित मदत उपलब्ध करून देऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

---

## मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

शासन निर्णय महसुल व वन विभाग एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७,दि. ३१.१०.२०१८ अन्वये खरीप हंगाम २०१८ मध्ये दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार अकोला जिल्हयातील ५ तालुक्यात दुष्काळ घोषित करण्यात आला होता. त्यानूसार ५ तालुक्यातील २१३८६१ इतक्या बाधित शेतकऱ्यांना रु. १३७.६१ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. शासन निर्णय महसुल व वन विभाग, दि.२१.०२.२०१९ नुसार अकोट व पातूर तालुक्यातील २६१ गावोमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित करुन खालील सवलती लागू करण्यात आल्या आहेत:-

१) जमीन महसुलात सूट.
२) सहकारी कर्जाचे पुर्नगठन.
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती.
४) कृषी पंपाच्या चालु वीज बिलात ३३.५% सूट.
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता.
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर.
८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे

राज्यात खरीप २०१८ च्या हंगामात राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या २६८ महसुली मंडळे व दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या ५४४९ गावांतील ३३% पेक्षा अधिक नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करण्याकरिता अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याने रू.२८५८.४० कोटी इतका अतिरिक्त निधी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनास दि.२१ नोव्हेंबर, २०१९ रोजी ज्ञापन पाठविण्यात आले आहे. यामध्ये अकोला जिल्ह्यातील क्षेत्रासाठी रू.७८.५६ कोटीची मागणी करण्यात आली आहे.



******

## लक्षवेधी सूचना

## सन २०१९ चे (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री. अमित साटम, प्रशांत ठाकूर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. अमीन पटेल, विजय वडेट्टीवार, असलम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. सुनिल केदार, अजय चौधरी, अबू आझमी, सुनिल प्रभू, रईस शेख, राम सातपुते, डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रामाणे आहे.

"देशात प्रगतीशील राज्य म्हणून लौकीक असलेले महाराष्ट्र राज्य आता सायबर गुन्हयांमध्येही आघाडीवर असल्याचे समोर येणे, गेल्या दहा महिन्यांत ऑनलाईन गैरव्यवहार, फसवणूकीच्या तब्बल २,७८९ गुन्हयांची नोंद राज्यातील विविध पोलीस ठाण्यात झाली असणे, साधारणपणे दररोज १० सायबर गुन्हयांच्या तक्रारी राज्यभरातील विविध पोलीस ठाण्यात दाखल होत असणे, दिनांक १ जानेवारी, २०१५ ते दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०१९ या कालावधीत एकुण १०,१३९ गुन्हे दाखल झाले असणे, माहिती अधिकार तंत्रज्ञान कायद्यांतर्गत या वर्षी दिनांक १ जानेवारी ते दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०१९ या दहा महिन्यामध्ये सार्वधिक ९८६ गुन्हे ऑनलाईन बँकिंगचे असणे, त्यानंतर डेबिट, क्रेडीट कार्डच्या फसवणूकीबाबत ८३३ तक्रारी व त्या खालोखाल सोशल मीडीयाव्दारे फसवणूक झालेले ७७९ गुन्हे नोंदविण्यात आलेले असणे, या मध्ये फेसबूक व व्हॉटसअँपव्दारे फसवणूकीचे ५४९ तक्रारी दाखल झाल्या असणे, राज्यभरात डेबिट, क्रेडीट, गुंतवणूक फसवणूकीबरोबरच नोकरी, विवाह नोंदणीबरोबरच सोशल मीडीयातील गुन्हयांच्या प्रमाणाचा आलेख सातत्याने वाढत असणे, त्यावर प्रतिबंधासाठी उपाययोजना केल्या जात असल्या, तरी त्याला मर्यादा पडत असणे, याबाबत सर्वसामान्य नागरीकामध्ये पसरलेले भिती, सायबर गुन्हयांचे प्रमाण रोखण्याबाबत शासनाने करावयाच्या उपाययोजना व प्रतिक्रिया"

## मा. मंत्री(गृह) यांचे निवेदन

सायबर गुन्ह्यांसंदर्भात १ जानेवारी ते ३१ ऑक्टोबर २०१९ या कालावधित फसवणुकीच्या एकुण २१७७ एवढ्या गुन्ह्यांची नोंद राज्यातील विविध पोलीस ठाण्यात झाली आहे. तसेच १ जानेवारी २०१५ ते ३१ ऑक्टोबर २०१९ या कालावधीत एकुण ९८९६ गुन्हे दाखल झालेले आहेत.

माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत या वर्षी १ जानेवारी ते ३१ ऑक्टोबर या दहा महिन्यांमध्ये एकुण १०८५ गुन्हे ऑनलाईन बँकिंगचे दाखल झालेले आहेत. तसेच डेबिट, क्रेडीट कार्डच्या फसवणूकीबाबत ८८० तक्रारींची नोंद झालेली आहे. तसेच सोशल मीडीयाव्दारे फसवणूक झालेले ८४० गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत व या मध्ये फेसबूक व व्हॉटसॲपव्दारे फसवणूकीचे ५९० तक्रारी दाखल झाल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यात वाढत्या सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्याकरिता आणि गुन्ह्यांच्या तपासावर नियंत्रण व देखरेख करण्याच्या उद्देशाने शासन निर्णय दि.०८.०२.२०१६ अन्वये विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र सायबर यांचे नियंत्रणाखाली महाराष्ट्र सायबर ही स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आली.

राज्यात सर्व जिल्हे व पोलीस आयुक्तस्तरावर एकूण ४७ सायबर लॅब दिनांक १५.०८.२०१६ पासून सुरु करण्यात आल्या त्या पैकी ४३ सायबर लॅब्सना सायबर पोलीस ठाणे म्हणून घोषित करण्यात

आले. त्यापैकी सध्या ३७ सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित आहेत. या सर्व पोलीस सायबर लॅब / सायबर ठाण्यांना, गुन्ह्यांच्या तपासाकरिता अत्याधुनिक यंत्रसामग्री (सॉफ्टवेअर व हार्डवेअर) उपलब्ध करण्यात आली आहे.

इंटरनेट सहज उपलब्ध झाल्यामुळे इंटरनेट संसाधनांचा वापर वाढलेला आहे. स्मार्ट मोबाईल मुळे प्रत्येकाला ऑनलाईन व्यवहार करणे सहज शक्य झालेले आहे. सोशल नेट्वर्किंग साईट मुळे प्रत्येकाचे ऑनलाईन संवाद संपर्क वाढले आहेत. कॅशलेस व्यवहारांमुळे बँकेचे ऑनलाईन व्यवहार करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचबरोबर सायबर गुन्ह्यांचा तपास करतेवेळी असे निर्दशनास आले आहे की बहुतांश गुन्हेगार हे बाहेरच्या राज्यामध्ये तसेच बाहेरच्या देशामध्ये असून सायबर गुन्ह्याशी संबंधित सर्व्हर बाहेरच्या देशात आहेत. त्यामुळे सर्व्हर कंपन्यांकडून गुन्हेगारविषयक माहिती घेत असताना संबंधित देशातील कायद्यांप्रमाणे नियमांची पूर्तता करून माहिती मिळेपर्यंत थांबावे लागते. परदेशातील कंपन्यांकडून माहिती मिळविताना काही करार देखील करावे लागतात. या कारणांमुळे गुन्ह्याचा तपास क्लिष्ट स्वरूपाचा होतो तसेच तो विहित वेळेत पूर्ण होऊ शकत नाही.

सायबर क्राईमच्या गुन्ह्यांना रोखण्यासाठी महाराष्ट्र सायबर या कार्यालयाकडून विविध जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले आहेत. या जनजागृती कार्यक्रमातून सामान्य नागरिक, प्रशासकीय सेवेतील अधिकारी आणि कर्मचारी, प्रसारमाध्यम प्रतिनिधी, शिक्षक आणि विद्यार्थी असे एकूण २४,८८० लोकांना जनजागृती कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्यात आले. तसेच संपूर्ण महाराष्ट्रातील सायबर गुन्ह्यांचा तपास अधिक प्रभावीपणे होण्यासाठी विविध पोलीस घटकातील एकूण ३,१६९ पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

क्रेडिट व डेबिट कार्ड तसेच इंटरनेट बँकिंग वापरासंदर्भात लोकांमध्ये जागरुकता यावी याकरिता सायबर जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले व सायबर गुन्हे टाळण्यासाठी माहितीपत्रके प्रसारित करण्यात आली.

--------------------